अध्याय पांचवा.

श्रीगणेशायनमः ।। ओं नमो सद्गुरु देवा उदारा । ह्मणतां कृपण तूं खरा । मागुतें आपुलिया घरा । दुजेपणें दारा येवों नेदिसी ।। १ ।। अवचटें मागतयासी । जैं भेटी होय तुजसी । तैं घोट भरूं धांवसी । देखतांचि घेसी जीवें त्यातें ।। २ ।। जे जे मागों येती तुजपासीं । तें बांधोनि ऐक्यतेमाजीं सूदसी । शेखीं त्यांचे सोडवणेसी । भेटी दुसऱ्यासी स्वप्नींही नव्हे ।। ३ ।। अणुमात्र तुझी प्राप्ती । अवचटें चढे ज्याचे हातीं । त्याचिये संसारसंपत्ती । सर्वस्वें निश्चितीं नाडिसी तूं ।। ४ ।। मैंदाचा विडा घेतां । तो प्रवर्ते आपुले घाता । तेवीं तुझी प्रसन्नता । झालिया जीविता स्वयें नाशी ।। ५ ।। जे जे तुजपें मागों आले । ते ते सर्वस्वें नागवले । शेखीं नागवे तुवां केले । निर्लज्ज जाले तिहीं लोकीं ।। ६ ।। ऐशी तुझी निर्वाणगती । त्या तुझी उदार किर्ती । घडे म्हणशी कैशा रीतीं । ते अगाध स्थिति अवधारीं ।। ७ ।। मागें उदार वाखाणिले । तेही आपणियांऐसे केले । मग सर्वस्व आपुलें । दान दिधलें दातृत्वें ।। ८ ।। षड्गुणैश्वर्यवैभवेंसीं । आपणियातें दाना देसी । दिधलें तें घेवों नेणसी । कदाकाळेंसीं कल्पांतीं ।। ९ ।। आपणियां दिधलें दान । यालागीं तूं दासांअधीन । मग त्यांचेनि छंदें जाण । सर्वस्वें आपण नाचसी ।।१०।। बळीनें सर्वस्व केलें दान । शेखीं तूं झालासी त्याअधीन । त्याचें द्वारपाळपण । अद्यापि आपण चालविसी ।। ११ ।। धर्मे अर्पिलें अग्रपूजेसी । शेखीं तूं त्याची सेवा करिसी । नाना संकटें स्वयें सोशिसी । अंगें काढिसी उच्छिष्टें ।। १२ ।। तुझा निजभक्तु अंबऋषी । त्याचें गर्भ-

---

हे ॐकाररूप देवा सद्गुरो ! तुला नमस्कार असो. तुला उदार म्हणावें तर तूं खरोखर कृपण आहेस. कारण तूं याचकाला आपल्या दारांत दुजेपणानें उभा राहूं देत नाहींस. १ तुझी व याचकाची अकस्मात् गांठ पडतांच तूं त्याचा जीव घेण्यास धांवतोस व त्याला पहातांच तूं त्याच्या जीवाचें स्वतःशीं तादात्म्य करितोस. २ जेवढे तुझ्यापाशीं मागावयास येतात, त्या सर्व भक्तांना तूं सायुज्य मुक्ति देऊन आपल्या ऐक्यानें बांधून टाकितोस. त्यामुळें शेवटीं त्यांचीं सोडवणूक किंवा दुसऱ्या कोणाशीं भेट स्वप्नांतहि होत नाहीं. ३ ऐक्यभावानें त्यांचा जीवपणा मावळून जातो व जीव आणि परमात्मा एकरूप होतात. तुझी आणुमात्रप्राप्ति सहज जरी झाली तरी त्यांच्या संसारपाशाचा तूं निश्चयानें नाश करितोस. ४ ठकानें दिलेला विडा खाल्ला कीं, आपल्या जीवाचाच घात होतो, त्याप्रमाणें तूं प्रसन्न झालास कीं, त्याचा जीवपणा नाहींसा होतो. ५ जेवढे म्हणून तुझ्यापाशीं मागायला आले, तेवढे सगळे सर्वस्वाला मुकले व शेवटीं तूं त्यांना पूर्ण उघडें केल्यामुळें ते तिन्ही लोकांत लज्जारहित होऊन हिंडूं लागले. ६ पण अशा तुझी 'उदार' म्हणून ख्याति कशी होणार ! असें जर म्हणशील तर तेंहि अपूर्व वर्णन ऐक. ७ पूर्वी ज्यांची 'उदार' म्हणून कीर्ति झाली होती त्यांनाहि तूं आत्मरूप करून टाकिलेस आणि मग त्यांना मोठ्या औदार्यानें आपलें सर्वस्व दान केलेंस. ८ आपल्या षड्गुण-ऐश्वर्यासह तूं स्वतःचेंच दान केलेंस व तूं एकदां दिलेलें दान कधीं कल्पान्तींहि परत घेत नाहींस. ९ तूं भक्तांना स्वतःचेंच दान दिलेलें असल्यामुळें त्यांच्या अधीन होतोस व त्यामुळें तूं त्यांच्याच तंत्रानें नाचत असतोस. १० बळीनें तुला सर्वस्व दान दिलें खरें, पण शेवटीं तूंच त्याच्या अधीन झालास व अद्यापि त्याच्या द्वारपाळाचें काम चालवीत आहेस. ११ धर्मानें तुला अग्रपूजेचा मान दिला, पण अखेरीस तूंच त्याची सेवा करूं लागलास. स्वतः अनेक संकटें सोशिलींस व आपल्या हातांनीं त्याच्या घरचीं उष्टीं काढिलींस. १२ तुझा प्रिय भक्त अंबर्षि, त्याचे गर्भवास तूं सोशिलेंस. हे श्रीकृष्णा ! गोपाळांनीं तुझें संगोपन

वास तूं सोशिसी। तुज गौळिये राखिती हृषीकेशी। शेखीं त्या गोपाळांसी रक्षिसी ॥ १३ ॥ एवं स्वस्वरूपता द्यावयासी। उदारत्व तुजपासीं। हें न ये गा आणिकांसी। हृषीकेशी कृपाळुवा ॥ १४ ॥ तो तूं परम उदार ऐसा। राया रंका समभावें सरिसा। भावो तेथ भरंवसा। तूं आपैसा आतुडसी ॥ १५ ॥ त्या तुझिया प्राप्तीलागीं। कपाटें सदा सेविती योगी। एक ते झाले भोगविरागी। एक ते त्यागी सर्वस्वें ॥ १६ ॥ एक हिंडती दशदिशे। एक तुजलागीं झाले पिसे। परी तुझी भेटी स्वप्नींही दिसे। ऐसा न दिसे क्षण एक ॥ १७ ॥ ऐशियाही तुझी प्राप्ती। सुलभ असे एके रीतीं। जरी संतचरणीं रंगती। अतिप्रीती सप्रेम ॥ १८ ॥ संतचरणीं जो विनटला। तो निजप्राप्तीसी पावला। संतस्वरूपें अवतरला। स्वयें संचला परत्मात्मा ॥ १९ ॥ यालागीं जीं जीं संतांचीं रूपें। तीं तीं श्रीहरीचीं स्वरूपें। म्हणोनि संतांचिये कृपे। अतिसाक्षेपें अर्जावें ॥ २० ॥ ते ज्ञानार्थाचे परम पिसे। यालागीं ग्रंथाचेनि मिसें। त्यांचे चरण अनायासें। सावकाशें वंदीन ॥ २१ ॥ संतकरुणाअवलोकन। तें मज नेत्रींचें अंजन। चरणकृपा पाहतां जाण। श्रीजनार्दन प्रकाशे ॥ २२ ॥ तया जनार्दनाचिये खेवें। गुरुत्वाचेनि आडनांवें। रिघालों निजस्वभावें। जीवेंभावें भजनासी ॥ २३ ॥ भज्य-भजका-भजना। एके अंगीं त्रिविध भावना। दावूनियां जगज्जीवना। जनीं जनार्दना निजभक्ती ॥ २४ ॥ हे अभेदभक्ती चोखडी। परम ऐक्यें भजनगोडी। अधिकाधिक चढोवढी। वाढे आवडी निजभक्तां ॥ २५ ॥ देवो आपली सर्वस्वजोडी। वेंची भक्तांचिये वोढी। ऐसी अभेदभक्तीची गोडी। पढियें गाढी गोविंदा ॥ २६ ॥ यालागीं भक्तांचा शरीरभार। स्वयें वागवी श्रीधर। आपुलेनि अंगें परपार। पाववी साचार निजभक्तां ॥ २७ ॥ निजभक्तांचा देहभावो। निजांगें वागवी देवाधिदेवो। तरी अभक्तांचा देहो। वागवावया पहा हो काय आन आहे ॥ २८ ॥

केलें, पण शेवटीं तूंच गोपाळांचें रक्षण केलेंस. १३ याप्रमाणें आत्मसात् करण्याचें औदार्य एकट्या तुजपाशींच आहे. तें इतर कोणामध्यें दिसत नाहीं. हे दयाळा इंद्रियदमना! १४ असा तूं अत्यंत उदार आहेस. राजा व रंक या दोघांनाहि तूं समभावानें सारखाच आहेस. जेथें श्रद्धा असते तेथें तूं खात्रीनें सांपडतोस. १५ त्या तुझ्या प्राप्तीसाठीं योगी निरंतर पर्वताच्या गुहेंत जाऊन रहातात. कोणी भोगांविषयीं विरक्त होतात तर कोणी सर्वस्व त्याग करितात. १६ कोणी दाही दिशांतून भटकत फिरतात, तर कोणी तुझ्यासाठीं वेडे होतात. परंतु त्यांना तुझी भेट स्वप्नांतहि क्षणभरसुद्धां होत नाहीं. १७ अशा योग्यांनाहि तुझी प्राप्ति होण्याचा एक सुलभ उपाय आहे. ते जर संतांच्या चरणीं अनन्य भक्तीनें व प्रेमभावानें तल्लीन होतील तर त्यांना तुझी प्राप्ति होईल. १८ जो संतचरणीं लीन होतो तोच आत्मस्वरूपाला प्राप्त होतो. संतस्वरूपानें अवतरतो व स्वतःच परमात्मा होऊन रहातो, १९ यास्तव जेवढे संत आहेत, ते सर्व श्रीहरीचें स्वरूपच आहेत. म्हणून दीर्घप्रयत्नानें संतांची कृपा संपादावी. २० त्यांना ज्ञानार्थ ऐकण्याचें फार वेड आहे. यास्तव या ग्रंथाच्या निमित्तानें त्यांच्या चरणांना मी अनायासें सावकाश वंदन करितो. २१ संतांची कृपादृष्टि हेंच माझ्या डोळ्यांचें अंजन आहे. चरणकृपेनें पहातां श्रीजनार्दनस्वामी प्रकट होतात. २२ त्या जनार्दनाच्या सेवेला गुरूचें आडनांव घेऊन मी जीवाभावानें सहज भजन करावयाला निघालों. २३ पण आतां भजन, भक्त व भजनाचा विषय हे तिन्ही भाव माझ्या एकामध्येंच दाखवून जनांतील जनार्दनरूप जगज्जीवनाची मी भक्ति करूं लागलों आहें. २४ हीच उत्तम अभेदभक्ति आहे. यांत परम ऐक्यामुळें भजनाला गोडी येते व भक्ताची आवड चढाओढीनें अधिक वाढूं लागते. २५ भक्तांच्या ओढीनें देव आपलें सांठविलेलें सर्वस्व खर्च करितो. अशी अभेदभक्तीची गोडी आहे. ती गोविंदाला फार आवडते. २६ म्हणूनच देवाधिदेव श्रीधर भक्तांचा योगक्षेम स्वतः चालवितो. (सु. गी. ९-२२. पृ. १८४) आपल्या भक्तांना तो स्वतः भवसागराच्या पैलतीरावर नेऊन सोडितो. २७ आपल्या भक्तांचा योगक्षेम जर भगवान् स्वतः चालवितो, तर मग अभक्तांचा भार वहाणारा दुसरा कोणी आहे कीं काय! २८ (असें जर म्हणशील तर ऐक.) भक्तांना देहाभिमान नसतो, त्यामुळें देवाला त्यांचा

भक्तां नाहीं देहअहंता । यालागीं देवो वागविता । पूर्ण देहाभिमान अभक्तां । त्यांसी अतिबद्धता या हेतू ॥ २९ ॥ यालागीं जो निरभिमान । तोचि भगवद्भक्त संपूर्ण । ज्याच्या अंगीं देहाभिमान । त्यासी भक्तपण कदा न घडे ॥ ३० ॥ निजभक्त तारितां कौतुकें । त्याची रोमावळी केवीं दुखे । निर्भय करोनि पूर्ण हरिखें । देवो निजसुखें निजभक्तां तारी ॥ ३१ ॥ यालागीं निरभिमानता । जे विनटले भक्तिपथा । ते पावो देवोनि विघ्नांचे माथां । पावती तत्वतां भगवत्पद ॥ ३२ ॥ भक्तांची ऐशी स्थिती । तरी अभक्तां कवण गती । तेंचि पुसावया नृपती । प्रश्नार्थीं प्रवर्ते ॥ ३३ ॥ पंचमामाजीं निरूपण । अभक्तांची गति लक्षण । युगायुगीं पूजाविधान । सांगेल पावन हरीचें ॥ ३४ ॥ अवतारचरित-पुरुषार्थु सांगोन संपला चतुर्थु । आतां अभक्तांचा वृत्तांतु । राजा पुसतु मुनीसी ॥ ३५ ॥

राजो०—भगवन्तं हरिं प्रायो न भजन्त्यात्मवित्तमाः । तेषामशान्तकामानां का निष्ठाऽविजितात्मनाम् ॥१॥

राजा ह्मणे जी मुनिश्वरा । जो भगवद्भजनीं पाठिमोरा । ऐशिया अभक्ता नरा । कोण दातारा गति त्यासी ॥ ३६ ॥ जे कामालागीं अतिउद्भट । जे सक्रोध क्रोधें तेजिष्ठ । जे अतिलाभें लोभिष्ठ । जे परम श्रेष्ठ प्रपंचीं ॥३७॥ जे गर्वाचे अग्रगणी । जे अहंकाराचे चूडामणी । जे विकारांची प्रवाहश्रेणी । जे उघडली खाणी विकल्पांची ॥ ३८ ॥ ज्यांचे सद्बुद्धीआड आभाळ । महामोहाचें सदा सबळ । जे छळणार्थीं अतिकुशळ । जे अतिप्रबळ प्रलोभें ॥ ३९ ॥ दिवसा न देखती निश्चितें । ते अंधारी देखती दिवाभीतें । तेवीं नेणोनि

भार वहावा लागतो. परंतु अभक्तांना देहाभिमान फार असतो, त्यामुळें ते संसारांत अत्यंत बद्ध होतात. २९ यास्तव जो निरभिमानी असतो तोच खरा भगवद्भक्त होय. ज्याला देहाभिमान आहे, त्याला केव्हांहि भक्त होतां येणार नाहीं. ३० देव आपल्या भक्तांचें सहज लीलेनें रक्षण करितेवेळीं भक्ताच्या केंसाला देखील धक्का लावीत नाहीं. देव आपल्या भक्तांना निर्भय करून पूर्ण आनंदानें त्यांचें रक्षण करितो. ३१ यासाठीं अभिमान टाकून जे या भक्तिमार्गास लागले ते विघ्नांच्या मस्तकावर पाय देऊन भगवत्पदाला प्राप्त झाले. ३२ भक्तांची जर अशी स्थिति आहे, तर मग अभक्तांची काय गति होते, हें विचारण्यासाठीं राजा प्रश्न करण्यास प्रवृत झाला. ३३ या पांचव्या अध्यायांत अभक्तांची गति व त्यांचें लक्षण यांचें निरूपण करून वेगवेगळया युगांतील श्रीहरीचें पवित्र पूजाविधान सांगितलें आहे. ३४ अवतारचरित्रें व त्यांचा पराक्रम यांचें वर्णन करून चवथा अध्याय संपविला. आतां राजा मुनीला अभक्तांचा वृत्तान्त विचारीत आहे. ३५.

[या पांचव्या अध्यायांत अभक्तांची निष्ठा कशी असते व निरनिराळया युगांत त्यांचा पूजाविधि कोणत्या प्रकारचा असतो, या दोन प्रश्नांचें उत्तर चमसमुनि सांगतात.]

—'तुझी सेवा करणारांना देव पुष्कळ विघ्नें करितात. हरिभक्त विघ्नांच्या मस्तकावर पाय देऊन परम गतीला जातात; पण अभक्तांना मात्र विघ्नें होतात' अ. ४–१०, असें पूर्वीं सांगितलें आहे. तेव्हां त्या अभक्तांची गति काय होते, असें राजा मुनीस विचारितो.—

राजा उवाच—राजा म्हणाला, आत्मवित्तमाः—हे आत्मवेत्त्यांतील श्रेष्ठ मुनिवरहो, ये **भगवंतं हरिं**-जे भगवान् हरीला, **प्रायः न भजंति**– प्रायः भजत नाहींत. **तेषां अविजितात्मनां अशान्तकामानां का निष्ठा**—त्या अजितेंद्रिय व ज्यांचे काम शान्त झालेले नाहींत अशा पुरुषांची निष्ठा कोणती ? त्यांना कोणत्या फलाची प्राप्ति होते ? १.

राजा म्हणाला, हे मुनिश्रेष्ठा, जो भगवद्भजनाकडे पाठ फिरविणारा अभक्त पुरुष असतो, त्याची गति काय होते ? ३६ ज्यांच्या मनांत काम अति उत्कट, जे क्रोधामुळें तेजस्वी असतात, अतिलोभानें ग्रस्त असतात, प्रपंचांत अति निष्णात असतात, ३७ जे गर्वाचे मूर्तिमंत पुतळेच, अहंकाराचे मुकुटमणि, विकारांची वहाती नदीच, ज्यांनीं विकल्पांची जणुंकाय खाणच उघडली आहे, ३८ ज्यांच्या सद्बुद्धीच्या आड मोहाचा पडदाच पडला आहे, महा-मोहानें ज्यांची बुद्धि ग्रासून टाकिली आहे, जे छळ करण्यांत अतिकुशल, ज्यांचा विषयमोह अत्यंत प्रबल आहे, ३९ वटवाघळांना जसें दिवसां दिसत नाहीं, पण रात्रीं मात्र स्पष्ट दिसतें, त्याप्रमाणें ज्यांना परमार्थ दिसत नाहीं, प्रपंच

परमार्थातें । जे अतिज्ञाते प्रपंचीं ॥ ४० ॥ जे नेणती आत्महित । ज्ञान विकूनि कामा पोशित । ऐसे जे कां अभक्त । त्यांची गति निश्चित मज सांग ॥ ४१ ॥ तुम्हांऐसे सद्बुद्धी । चालते बोलाचे उदधी । भाग्यें लाधलों ज्ञाननिधी । हा प्रश्न त्रिशुद्धी सांगावा ॥ ४२ ॥ राजा साक्षेपें बहुवस । पुसे अभक्तगतिविन्यास । तो सांगावया चमस । सावकाश सरसावला ॥ ४३ ॥

चमस उवाच–मुखबाहूरुपादेभ्यः पुरुषस्याश्रमैः सह । चत्वारो जज्ञिरे वर्णा गुणैर्विप्रादयः पृथक् ॥ २ ॥

जो कां जगाचा जनकु । मुख्य गुरुत्वें तोचि एकु । त्यासी न भजे अविवेकु । तो नाडला लोकु सर्वस्वें ॥ ४४ ॥ पुरुषापासूनि जन्मले जाण । चाऱ्ही आश्रम चाऱ्ही वर्ण । त्यांचे उत्पत्तीचें स्थान । ऐक संपूर्ण नृपनाथा ॥ ४५ ॥ मुखीं वेदविद ब्राह्मण । बाहू जन्मले राजन्य । ऊरू जन्मले वैश्यवर्ण । चरणीं जन्मस्थान शूद्रवर्णा ॥ ४६ ॥ मूळीं अवघे तिन्ही गुण । गुणयोगें वर्ण जाण । त्रिगुणीं चारी वर्ण । जन्मलक्षण घडे कैसें ॥ ४७ ॥ सत्वगुणें शुद्ध ब्राह्मण । सत्वरजमिश्रें राजे जाण । रजतमें वैश्यवर्ण । केवळ तमोगुण शूद्रवर्ण ॥ ४८ ॥ क्षत्रिय वैश्य आणि ब्राह्मण । द्विजन्में हे तिन्ही वर्ण । त्यांसी गायत्री वेदाध्ययन । शूद्र ते जाण संस्काररहित ॥ ४९ ॥ ब्रह्मचर्य आणि गार्हस्थ्य । तिहीं वर्णा अवश्य प्राप्त । चहूं आश्रमां आश्रयभूत । जाण निश्चित ब्राह्मण ॥ ५० ॥ गार्हस्थ्य पुरुषाच्या चरणीं । ब्रह्मचर्य हृदयस्थानीं । वक्षःस्थळीं वसती वनीं । शिरोमणी संन्यास ॥ ५१ ॥

मात्र चागला जाणतां येतो ४० ते आत्महित जाणत नाहींत तर ज्ञान विकून कामाचें पोषण करितात, अशा अभक्तांची गति काय होते, तें मला सांग. ४१ बुद्धिमान, जणुंकाय चालते बोलते ज्ञानसागर, व ज्ञानाचा मोठा सांठाच असे तुम्ही मोठ्या भाग्यानें मला लाधलां आहां! तरी या प्रश्नाचें उत्तर सांगा. ४२ याप्रमाणें राजानें अभक्तांच्या गतीचें लक्षण अनेक आक्षेपपूर्वक विचारिलें असतां तें सांगण्यास चमसमुनि पुढें सरसावला. ४३.

—आपला जनक, गुरु व भगवान् यांचा अनादर केल्यामुळें गुरुद्रोहाचें पातक लागतें; त्यामुळें अभक्त दुर्गतीला जातात. हें सांगण्यासाठीं चमसमुनि भगवानापासून वर्णाश्रमांची उत्पत्ति सांगतो—

चमसः उवाच– चमसमुनि म्हणाला, पुरुषस्य–भगवानाच्या, मुखबाहूरुपादेभ्यः–मुख, बाहु, मांड्या, पाय यांपासून, गुणैः पृथक्–गुणांनी पृथक् केलेले, विप्रादयः चत्वारः वर्णाः–ब्राह्मणादि चार वर्ण, आश्रमैः सह जज्ञिरे–आश्रमांसह उत्पन्न झाले. [भगवानाच्या मुखादि अवयवांपासून सत्त्वगुणानें ब्राह्मण, सत्त्व-रजानें क्षत्रिय, रज-तमानें वैश्य आणि तमानें शूद्र असे चार वर्ण आश्रमांसह उत्पन्न झाले.] २.

जो सर्व जगताचा जनक, तोच एक मुख्य गुरु होय. त्यास जो अविवेकी पुरुष भजत नाहीं, तो सर्वस्वाला मुकला असें समजावें. ४४ पुरुषापासून चार वर्ण व चार आश्रम यांची उत्पत्ति झाली. हे राजा, त्यांच्या उत्पत्तीचीं स्थानें सांगतों, ती ऐक. ४५ त्या परमपुरुषाच्या मुखापासून ब्राह्मण, बाहूंपासून क्षत्रिय, मांड्यांपासून वैश्य आणि पायांपासून शूद्र झाले. ४६ सत्त्व, रज व तम हे तीनच गुण मूळचे. या तीन गुणांपासून चार वर्ण झाले. तेव्हां या तीन गुणांपासून वर्णांची उत्पत्ति कशी झाली? ४७ सत्त्वगुणापासून शुद्ध ब्राह्मण, सत्त्व आणि रज यांच्या मिश्रणानें क्षत्रिय, रज व तम मिळून वैश्य, आणि केवळ तमोगुणापासून शूद्र वर्ण निर्माण झाला. ४७ ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे तीन वर्ण द्विजत्वामुळें म्हणजे उपनयनानें होणाऱ्या विद्यासंस्काररूप दुसऱ्या जन्मामुळें गायत्री व वेदाध्ययनाचे अधिकारी झाले आणि शूद्र संस्काररहित आहेत. ४९ ब्रह्मचर्याश्रम व गृहस्थाश्रम हे दोन आश्रम या तीन वर्णांना अवश्य आहेत. ब्राह्मण चारी आश्रमांचा आश्रयभूत आहे. ५० गार्हस्थ्य त्या परम पुरुषाच्या चरणांमध्यें रहातें, ब्रह्मचर्य हृदयांत रहातें, वानप्रस्थ वक्षस्थळीं रहातें व संन्यासाश्रम हा तर भगवानांचा शिरोमणीच आहे. ५१.

य एषां पुरुषं साक्षादात्मप्रभवमीश्वरम्। न भजन्त्यवजानन्ति स्थानाद्भ्रष्टाः पतन्त्यधः ॥ ३ ॥

हे ब्राह्मणादि वर्ण पहा हो। ज्यापासोनि जन्मप्रभावो। तो न भजतां देवाधिदेवो। उत्तमदेहो अधःपाती ॥ ५२ ॥ पूर्वोत्तर मीमांसा दोनी। नानाशास्त्रार्थ कडसणी। स्वरूप बोलती निर्वचूनी। एवं शब्दज्ञानी अतिचतुर ॥ ५३ ॥ यापरी जे पंडित। ज्ञानाभिमानें अतिउन्मत्त। तेणें अभिमानेंचि येथ। भजनीं निश्चित विमुख केले ॥ ५४ ॥ एक अज्ञानी सर्वथा। स्वप्नीं नेणती परमार्था। ते नेणपणेंचि तत्वतां। श्रीजगन्नाथा न भजती ॥ ५५ ॥ शेळी उंसाची चवी गाढी। नेणोनि पाचोळा करेडी। तेवीं नेणानि हरिभक्तीची गोडी। अज्ञानें बापुडीं विषयलुब्ध ॥ ५६ ॥ आलोडूनि वेदशास्त्रार्थ। ज्ञातेपणें जे पंडित। गर्वे हेळसिती भक्तिपंथ। अतिउन्मत्त ज्ञातृत्वें ॥ ५७ ॥ जेवीं ज्वरिताचें मुख। दूध मानी कडू विख। तेवीं ज्ञानगर्वे पंडित देख। ठेले विमुख हरिभजनीं ॥ ५८ ॥ यापरी ज्ञानाभिमानी। विमुख झाले हरिभजनीं। ते जरी वर्णांमाजीं अग्रणी। तरी अधःपतनीं पडतील ॥ ५९ ॥ हो कां वर्णांमाजीं अग्रणी। जो विमुख हरिचरणीं। त्याहूनि श्वपच श्रेष्ठ मानीं। जो भगवद्भजनीं प्रेमळु ॥ ६० ॥ आम्ही मुक्त हें मानुनी। जे विमुख भगद्भजनीं। ते पचिजती अधःपतनीं। तिर्यग्योनीं जन्ममरणें ॥ ६१ ॥ मनुष्यदेहीं जे भजननष्ट। ते होती गा स्थानभ्रष्ट। अधःपातें भोगिती कष्ट। अतिउद्भट यातना ॥ ६२ ॥ ज्ञानाभिमानें जे न भजती। ते प्रौढपतनीं पचिजती। अज्ञानांही तेचि गती। सर्वथा नृपती म्हणों नये ॥ ६३ ॥

एषां–त्या वर्णांतील, ये साक्षात् आत्मप्रभवं ईश्वरं पुरुषं न भजन्ति–जे साक्षात् आपल्या उत्पत्तीचें स्थान असा जो ईश्वर त्याला न जाणतां भजत नाहींत व, अवजानन्ति– जे त्याला जाणूनहि अवज्ञा करितात, ते स्थानात् भ्रष्टाः–ते आपल्या स्थानापासून च्युत होऊन, अधः पतन्ति–अधोगतीला जातात. [आपला जन्म ज्याच्यापासून झाला आहे, त्याचें भजन न केल्यामुळें त्यांच्याकडे कृतघ्नता येते व त्यामुळें ते आपल्या वर्णाश्रमापासून भ्रंश पावतात.] ३.

हे ब्राह्मणादिकवर्ण पहा! ज्याच्यापासून आपली उत्पत्ति झाली त्या देवाधिदेवाला ते भजत नाहींत; त्यामुळें उत्तम देह प्राप्त होऊनहि त्यांचा अधःपात होतो. ५२ पूर्व व उत्तर या दोन्ही मीमांसा व विविधशास्त्रें यांच्या स्वरूपाचें निरूपण उत्तम प्रकारें करितात. शब्दज्ञानामध्यें अति चतुर, ५३ मोठे पंडित, पण ज्ञानाभिमानानें अति उन्मत्त झाल्यामुळें केवळ विद्याभिमानानेंच त्यांना भगवद्भक्तीपासून सर्वथा विमुख केलेलें असतें. ५४ दुसरे कित्येक केवळ अज्ञानी असतात. परमार्थाला स्वप्नांतहि जाणत नाहींत. त्यामुळें श्रीजगन्नाथाला भजत नाहींत. ५५ ऊंसामध्यें काय गोडी आहे, हें न जाणतां शेळी पाचोळाच चघळीत बसते, त्याप्रमाणें हरिभक्तीची गोडी न जाणतां बिचारे अज्ञजन विषयांमध्यें लुब्ध होतात. ५६ वेदशास्त्रार्थाचें मंथन करून ज्ञातेपणाच्या अभिमानानें जे आपल्याला पंडित समजतात ते गर्वानें भक्तिपंथाचा अनादर करितात. ५७ ज्याप्रमाणें ज्वरिताचें मुख दुधालाहि कडू मानतें, त्याप्रमाणें पंडित ज्ञानगर्वानें हरिभजनापासून विमुख होतात. ५८ त्यामुळें ते जरी वर्णांमध्यें अतिश्रेष्ठ असले तरी त्यांचा अधःपात होतो. ५९ भगवद्भजनामध्यें मोठ्या प्रेमानें आसक्त होणारा चांडाळहि हरिभजनविमुख ब्राह्मणश्रेष्ठाहून उत्तम आहे, असें तूं समज. ६० 'आम्ही मुक्त आहों' असें मानून जे भगवद्भजन सोडितात, ते पश्वादि हीन योनींत पडून जन्म-मरणांचा सतत अनुभव घेतात. ६१ मनुष्यदेह मिळाला असूनहि जे ईश्वरभजन करीत नाहींत ते स्थानभ्रष्ट होऊन भयंकर यातना भोगितात. ६२ पण हे राजा, ज्ञानभिमानानें जे ईश्वरभजन करीत नाहींत त्यांचाहि जर अधःपात होतो, तर अज्ञानांचीहि तीच गति होत असली पाहिजे असें मात्र तूं समजूं नकोस. ६३.

दूरे हरिकथाः केचिद्दूरे चाच्युतकीर्तनाः। स्त्रियः शूद्रादयश्चैव तेऽनुकम्प्या भवादृशाम् ॥ ४ ॥

एका पित्याचे दोघे अर्भक । एक प्रबुद्ध एक बाळक । पित्यासी अवमानितां देख । ताडी जनक प्रबुद्धासी ॥ ६४ ॥ बाळक पित्याचे माथां चढे । जरी लाता हाणी तयाकडे । तरी त्यासी दोषु न घडे । दोषांचें सांकडें सज्ञानासी ॥ ६५ ॥ ज्ञात्यांपासोनि भजन ठाके । ते कवळिजती महादोखें । अज्ञानें तरती भाविकें । साधुकृपामुखें अनुगृहीतां ॥ ६६ ॥ अज्ञाना नाहीं विशेष बाधु । तो साधुविश्वासें होय शुध्दु । ज्ञानाभिमानियां भाव विरुध्दु । यालागीं सुबुध्दु दोष बाधी ॥ ६७ ॥ अज्ञानी विश्वासें साधु वंदी । ज्ञानाभिमानी दोहींतें निंदी । यालागीं त्यातें त्रिशुद्धी । अवश्य बाधी अतिदोष ॥ ६८ ॥ साधु-विश्वासें अज्ञान फिटे । ज्ञानाभिमानियां विकल्प मोठे । त्यांसी विश्वास कदा न घटे । अभिमानहठें अधःपात ॥ ६९ ॥ एवं विचारितां नेटेंपाटें । अहंतेचें बंधन मोटें । अभिमानाऐसें नाहीं खोटें । दुजें वोखटें त्रिलोकीं ॥ ७० ॥ अभिमानु ईश्वरा बाधी । तोही सबळ कीजे सोपाधी । अभिमानें देहबुद्धी । बाधक त्रिशुद्धी सुरनरांसी ॥ ७१ ॥ यालागीं जे अज्ञान जन । ज्यांसी नाहीं ज्ञानाभिमान । तेही विश्वासल्या संपूर्ण । साधु सज्जन अनुग्रहो करिती ॥ ७२ ॥ ज्यासी म्हणती नीच वर्ण । स्त्रीशूद्रादि हीन जन । ज्यासी कां दूरीं शास्त्रश्रवण । ज्यासी दूरी श्रवण वेदोक्त ॥ ७३ ॥ त्यांसी जालिया सद्भावो संपूर्ण । ते होतु कां हीन जन । परी संतकृपेसी आयतन । विश्वासें पूर्ण अधिकार झाला ॥ ७४ ॥ ऐसे पूर्ण भावार्थी । त्यांसी तुम्हांऐशा

—त्यांतील जे अज्ञ आहेत ते तुमच्या सारख्यांच्या अनुग्रहास पात्र आहेत, असे चमस पुढील श्लोकांत सांगतो—

केचित् दूरे हरिकथाः—कोणी हरिकथेपासून दूर रहातात, **केचित् च दूरे अच्युतकीर्तनाः**—कोणी हरिकीर्तनापासून दूर रहातात, **स्त्रियः शूद्रादयः च एव**—स्त्रिया आणि शूद्रादिकहि हरिकथा व हरिकीर्तन यांपासून दूर असतात. ते **भवादृशां अनुकम्प्याः**—ते तुमच्या सारख्यांच्या अनुकंपेस पात्र आहेत. [वर सांगितलेल्या लोकांतील कित्येकांना हरिकथा कधीं ऐकण्या-सहि सांपडत नाहीं; त्यामुळेंच ते अच्युताच्या कीर्तनापासून दूर असतात. स्त्रिया व शूद्रादिकहि हरिकथाश्रवण व अच्युत-श्रवण यांस पारखे झालेले असतात. यास्तव ते सर्व तुमच्या सारख्यांच्या दयेस पात्र आहेत.] ४.

एका पित्याचीं दोन मुलें. त्यांतील एक जाणतें व दुसरें तान्हें. जाणत्या मुलानें पित्याचा अपराध केला कीं तो लगेच त्याला ताडन करितो; ६४ परंतु तान्हें बाळ पित्याच्या मस्तकावर चढून जरी लाथा हाणूं लागलें तरी त्याला कांहीं दोष लागत नाहीं. सज्ञानालाच दोषाचें वावडें असतें. ६५ ज्ञात्यापासूनच भजन दूर रहातें म्ह० ते ज्ञानाभिमानानें भजन करीत नाहींत. त्यामुळें त्यांस मोठा दोष लागतो. परंतु साधूंच्या कृपानुग्रहानें अज्ञानीजन आपल्या भावनेनेंच तरून जातात. ६६ अज्ञानाला विशेष बाध नाहीं. तो दृढ श्रद्धेनेंच शुद्ध होतो. ज्ञानाभिमान्याचा भाव श्रद्धेला ढळवितो, त्यामुळें तो दोषी होतो. ६७ अज्ञ मनुष्य श्रद्धेनें साधूला वंदन करितो. ज्ञानाचा अभिमान असणारा त्या दोहोंचीहि म्ह० श्रद्धा व साधु यांची निंदा करितो. त्यामुळें तो खरोखर अतिदोषी होतो. ६८ दृढ श्रद्धेनें अज्ञान नाहींसें होतें. ज्ञानाभिमान्याच्या मनांत विकल्पच फार असतात. त्याचा कोठेंच विश्वास नसतो. त्यामुळें अभिमानाच्या आग्रहानें त्याचा अधःपात होतो. ६९ याप्रमाणें निश्चयपूर्वक विचार केला असतां अहंतेचें बंधन फार मोठें दिसतें. अभिमानासारखें खोटें व वाईट या त्रिभुवनांतहि दुसरें कांहीं नाहीं. ७० अभिमान ईश्वरालाहि बाधतो. त्या समर्थालाहि उपाधियुक्त करितो. अभिमानामुळें देव व मनुष्यें यांना देहबुद्धि बाधक होते. ७१ यास्तव जे अज्ञ-लोक, ज्यांना ज्ञानाभिमान नाहीं, पूर्ण विश्वास ठेविला असतां, त्यांवर साधु व सज्जन अनुग्रह करितात. ७२ ज्यांना नीचवर्ण म्हणतात, असे जे स्त्री, शूद्र व इतर हीन जन आहेत, ज्यांना वेदोक्त शास्त्रश्रवणाचा अधिकार नाहीं, ७३ त्यांचा पूर्ण सद्भाव असतो, ते जरी हीन मानलेले असले, तरीहि संतकृपेला पात्र झाल्यावर श्रद्धेमुळें ते पूर्ण अधिकारी होतात. ७४ असे जे पूर्ण भावार्थी जन आहेत, त्यांना कृपेच्या साक्षात् मूर्तीच असे तुमच्यासारखे दयाळु साधुसंत

साधुसंतीं । अनुग्रहोनि तारिती । कृपामूर्ती कृपाळुवा ॥ ७५ ॥ अज्ञानी यापरी तरती । परी ज्ञानाभिमान ज्यांच्या मतीं । ते ब्रह्मादि कां न तरती । त्यांचीही स्थिती मुनी सांगे ॥ ७६ ॥

विप्रो राजन्यवैश्यौ च हरेः प्राप्ताः पदान्तिकम् । श्रौतेन जन्मनाऽथापि मुह्यन्त्याम्नायवादिनः ॥ ५ ॥

अज्ञान जे नीच वर्ण । भावें धरोनि संतचरण । निजनिश्वासें संपूर्ण । जन्ममरण निरसती ॥ ७७ ॥ येर द्विजन्मे जे कां तिन्ही । स्वभावें प्राप्त हरिचरणीं । आम्ही अधिकारी वेदज्ञानी । जन्माभिमानी अतिगर्वी ॥ ७८ ॥ जन्माभिमान कर्माभिमान । अग्रपूज्यत्वें पूज्याभिमान । अल्पमात्र वेदींचें ज्ञान । तो वेदाभिमान वाढविती ॥ ७९ ॥ ज्यासी प्राप्त उपनयन । ज्यासी प्राप्त गायत्री पूर्ण । ज्यासी हरीचें आवडे भजन । त्याचे धरितां चरण हरि भेटे ॥ ८० ॥ ऐसे उत्तम जे ब्राह्मण । त्यांसी वेदवादें ज्ञानाभिमान । तेणें गर्वें पडे मोहन । तेंचि नारायण विशद सांगें ॥ ८१ ॥

कर्मण्यकोविदाः स्तब्धा मूर्खाः पण्डितमानिनः । वदन्ति चाटुकान्मूढा यया माध्व्या गिरोत्सुकाः ॥ ६ ॥

अनुग्रह करून तारितात. ७५ याप्रमाणें अज्ञ तरतात; पण ज्यांना ज्ञानभिमान असतो ते ब्रह्मादिकहि कां तरत नाहींत, त्याचें कारण मुनि राजाला सांगतो. ७६.

—थोड्याशा ज्ञानानें जे दुरभिमानी झालेले असतात ते तर सर्वथा उपेक्षणीयच आहेत, अशा आशयानें चमस म्हणतो—

विप्रः राजन्यवैश्यौ च–ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य, **श्रौतेन जन्मना**–उपनयनाख्य जन्मानें, **हरेः पदान्तिकं प्राप्ताः अपि**–हरिभजनांच्या उत्तम अधिकारास प्राप्त झालेले असूनहि, **अथ आम्नायवादिनः मुह्यन्ति**–वेदांतील अर्थवादामध्यें आसक्त होऊन मोहित होतात. [ब्राह्मणादि त्रैवर्णिक द्विजत्व सिद्ध करणारें उपनयन व अध्ययनादि यांच्या योगानें हरीच्या पदासमीप जरी पोंचलेले असेल, म्ह० त्यांना हरिचरणभजनाचा उत्तम अधिकार जरी प्राप्त झालेला असला तरी ते कर्मफलामध्यें आसक्त होतात. कारण वेदांतील फलार्थवाद त्यांना फलाचा मोह पाडितात. गीतेंतील 'यां इमां०' इत्यादि तीन श्लोकांत हेंच सांगितलें आहे. सु. गी. २–४२, पृ. ३९] ५.

अज्ञ असे जे हीन वर्ण ते श्रद्धेनें संतचरण धरून, त्यांवर पूर्ण विश्वास ठेवून, जन्ममरणांचें उल्लंघन करितात. ७७ परंतु जे त्रैवर्णिक द्विज, त्यांस स्वभावतःच हरिचरणांची प्राप्ति असूनहि ते 'आम्ही वेदार्थज्ञानाचे अधिकारी' या जन्माभिमानानें अति गर्विष्ठ बनतात. ७८ त्यांना आपल्या जन्माचा, कर्मांचा व अग्रपूजेच्या मानामुळें पूज्यत्वाचा अभिमान फार असतो आणि त्यांना वेदाचें जें लेशमात्र ज्ञान असतें, तें त्यांच्या वेदाभिमानालाहि वाढवितें. ७९ ज्यांचें उपनयन होतें, ज्यांस गायत्री मंत्राचा पूर्ण अधिकार आहे, ज्यांस हरिभजनाची आवड आहे, ज्यांचें चरण धरिलें असतां हरि भेटतो, ८० असे जे उत्तम ब्राह्मण त्यांना वेदाच्या अनुवादामुळें ज्ञानाभिमान इतका असतो कीं त्या गर्वामुळें त्यांना मोह पडतो. तेंच आतां मुनि विशद करून सांगतो. ८१.

—भक्तिमार्गाच्या दृढतेसाठीं त्यांच्या मोहाचें वर्णन करणारा मुनि त्यांची निंदा करितो—

कर्मणि अकोविदाः–कर्माचें तत्त्व न जाणणारे, **स्तब्धाः**–कोणापुढें नम्र न होणारे, **मूर्खाः**–मूर्ख, **पण्डितमानिनः**–पंडितंमन्य, **यया माध्व्या गिरा उत्सुकाः**–ज्या आपात रमणीय वाणीनें उत्सुक होत्साते, **मूढाः चाटुकान् वदन्ति**–मूढ त्या वाणीनें प्रियशब्द बोलतात. [कर्म ज्या प्रकारें बंधक होणार नाहीं त्याप्रकारें तें कसें करावें हें न जाणणारे, व दुसऱ्या तज्ज्ञांना न विचारणारे, कारण ते मोठे अभिमानी असतात, कोणापुढें नम्र न होण्याचा त्यांचा स्वभावच असतो. कारण ते मूर्ख असूनहि आपण मोठे पंडित आहोंत असें समजतात. त्यामुळें 'आम्ही सोमपान करून अमृत झालों आहों, चातुर्मास्य याग करणारांना स्वर्ग हें अक्षय्य फल मिळतें, ज्या स्वर्गांत शीत, उष्ण, ग्लानि व शत्रूहि नसतात,' इत्यादि मधुर वाणीनें उत्सुक व मूढ होत्साते 'अप्सरांबरोबर आम्ही विहार करूं' इत्यादि प्रिय शब्द बोलतात.] ६.

न कळे विधिविधानमंत्र । कोणे कर्मीं कैसें तंत्र । नेणोनियां गर्व थोर । ताठा अपार ज्ञातृत्वाचा ॥ ८२ ॥ गारोडियासी विद्या थोडी । परी सर्वांगीं बिरुदें गाढीं । कां जाणी जाणपणें जोडी । कडोविकडी आसनपूजा ॥ ८३ ॥ देऊनि पतंगाचें ढाळ । स्फटिकाअंगीं माणिककीळ । तैसे मूर्खही केवळ । मिरविती प्रबळ ज्ञानाभिमान ॥ ८४ ॥ आपण विधान नेणती । शेखीं सज्ञानाही न पुसती । कर्म आपमती करिती । लौकिकीं स्फीति वाढवावया ॥८५ ॥ मिथ्या मधुर शब्दें चाटुक । जे भोगी अणुमात्र नाहीं सुख । तरी इहामुत्र भजविती लोक । अप्सरादिकभोगालिप्सा ॥ ८६ ॥ येथ भोग भोगावे चोखडे । आणि पुढें स्वर्गभोग जोडे । येणें वचनें बापुडे । यागाकडे धांवती ॥८७॥ कर्ता सर्वस्वें नागवो । परी आचार्यत्व आम्हां येवो । ऐशी यांची बुद्धी पहा हो । यागप्ररोहो आरंभिती ॥ ८८ ॥ पावावया अतिप्रतिष्ठा । नाना कर्मांच्या कर्मचेष्टा । करूनि दाविती खटपटा । कर्मारंभु मोटा । आरंभुनी ॥ ८९ ॥ नातरी जैसा मद्यपानी । मद्यरसा अमृत मानी । या वचनगोडिया मद्यपानीं । प्रवर्तिजे जनीं स्वादलिप्सा ॥ ९० ॥ तें सेविलिया काय जोडे । स्थितिसावधानता बुडे । मग दुर्भगत्व रोकडें । पिशाचत्व गाढें अंगीं वाजे ॥ ९१ ॥ तैसें केवळ पतनात्मक । त्या नांव म्हणती स्वर्गसुख । जाणोनि प्रवर्तती ते मूर्ख । फळकामुक अभिलाषी ॥ ९२ ॥ उंडणी लंघूं न शके भिंतींसी । तरी चढों रिघते सायासीं । चढतां पडे आपैसी । तेवीं स्वर्गसुखासी दृढ पतन ॥ ९३ ॥ कर्माभिनिवेशपडिपाडें । कामलोभ दृढ वाढे । तेणें दांभिक करणें घडे । क्रोधाचें चढे महा भरितें ॥ ९४ ॥

रजसा घोरसङ्कल्पाः कामुका अहिमन्यवः । दाम्भिका मानिनः पापा विहसन्त्यच्युतप्रियान् ॥ ७ ॥

त्यांस विधि, विधान, मंत्र कळत नाहींत. कोणत्या कर्मांत कोणतें तंत्र हें ठाऊक नाहीं. तरीहि आपल्या ज्ञातृत्वाचा गर्व मात्र फार असतो. ८२ गारुड्यांना जशी विद्या थोडी असते, पण मोठमोठे चांद, ताईत यांचें अवडंबर फार असतें, तसा हा या ज्ञातृत्वाची आपल्याला एक जोडच मिळाली आहे असें समजून पाद्या-सनादि पूजा चढाओढीनें करून घेतो. ८३ स्फटिकाला निरनिराळ्या रंगांचीं पुटें देऊन त्याला जसें माणिकाचें स्वरूप आणावें, तसेंच हे मूर्खहि प्रबल ज्ञानाभिमानानें मिरवितात. ८४ ते स्वतः कर्माचें विधान जाणत नाहींत आणि गर्वामुळें तज्ज्ञांनाहि विचारीत नाहींत. लौकिकांत आपली प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं आपल्या मतानेंच कर्म करितात. ८५ मिथ्या गोड गोड शब्दांनीं मोहित होतात. ज्या भोगांमध्यें यत्किंचित्हि सुख नाहीं अशा अप्सरादिभोगांच्या इच्छेनें ऐहिक व पारलौकिक भोगांचीं साधनें स्वतः करितात व दुसऱ्यांकडून करवितात. ८६ या लोकीं उत्तम भोग मिळतात आणि परलोकीं स्वर्गभोगहि जोडतो या वचनानें विचारे भोळे लोक यज्ञयाग करण्यास धांवतात. ८७ कर्ता यजमान सर्वस्वी नागवेना कां, पण आम्हांला आचार्यत्व मिळो म्हणजे झालें, अशी त्यांची बुद्धि असते पहा. स्वतःच्या प्रतिष्ठेसाठीं ते यज्ञ आरंभितात. ८८ मोठें कर्मारंभाचें अवडंबर आरंभून अनेक कर्मांच्या चेष्टा करून दाखवितात. ८९ मद्यपी जसे मद्यालाच अमृत समजतात व आपल्या मधुरवचनानें लोकांनाहि मद्याचा स्वाद घ्यावयास लावितात, ९० त्याचें सेवन केलें म्हणजे काय होतें, तें पहा. स्वतःचें भान नाहींसें होतें, रोकडा करंटेपणा येतो व अगांत पूर्ण पिशाचत्व संचारतें, ९१ त्याप्रमाणें जें केवल पतनच त्यास स्वर्गसुख असें नांव आहे. परंतु हें जाणूनहि फलाची इच्छा ठेवणारे मूर्ख त्यांत प्रवृत्त होतात. ९२ अळी भिंतीचें उल्लंघन करूं शकत नाहीं, मोठ्या सायासानें ती जों वर चढूं लागते, तों खालीं पडते, त्याप्रमाणें स्वर्गसुखांत पतन निश्चित आहे. ९३ कर्माच्या अभिलाषाची अत्यंत हांव ठेविली असतां, काम व लोभ वाढत जातो. त्यामुळें मनुष्य दांभिक होतो व त्याला क्रोधाचें तर भरतेंच येतें. ९४.

—शिवाय कर्मांच्या अभिनिवेशानें त्यांचे काम, क्रोध, दंभादिक वाढतात, असें यापुढील तीन श्लोकांनीं सांगतो—

रजसा घोरसंकल्पाः–रजोगुणाच्या प्राधान्यानें त्यांचा संकल्प घोर असतो, कामुकाः–ते मोठे विषयी असतात, अहिमन्यवः–सापासारखे ते क्रोधी असतात, दांभिकाः मानिनः पापाः–मोठे दांभिक व मानी असलेले ते पापी, अच्युतप्रियान् विहसन्ति–भगवान् ज्यांना प्रिय आहे अशा भक्तांना हंसतात. ७.

ते काय करितील बापुडे । शुद्ध सत्वें सांडिलें कुडें । मग रजोगुणें कामाकडे । झाले धडफुडे अतिकामी ॥ ९५ ॥ तेव्हां उर्वशीच्या अतिआवडी । स्वर्गभोगाची अतिगोडी । यालागीं यागपरवडी । पुण्याची जोडी जोडूं धांवे ॥ ९६ ॥ तेथ मंत्रतंत्रद्रव्यशुद्धी । नाहीं यागयजनविधी । तेणें स्वर्ग नव्हेचि त्रिशुद्धी । ठकले दुर्बुद्धी अविहिताचारें ॥ ९७ ॥ तया अलब्ध कामासाठीं । सर्वांगीं क्रोधु उठी । जेवीं परिपाकापाठीं । धरी कडुवटी आंबिलकांजी ॥ ९८ ॥ जंवजंव पिकिजे कोरिफडें । तंव तंव कडूपण गाढें । तैसा कामनाशापुढें । क्रोध वाढे अत्युग्र ॥ ९९ ॥ क्रोध काळिया नाग खरा । देतु द्वेषाचा फुंकारा । घाली पूज्यतेच्या आकारा । घाली धुधुःकारा साधुनिंदेचा ॥ १०० ॥ ऐसा क्रोधाचा बसौटा । होय तमाचा चोहटा । मग दंभाचे नाणवटा । हीनकसाचा खोटा विकरा मांडी ॥ १ ॥ मग जो जो भेटे प्राणिया । त्यासी अभिचारयोगक्रिया । लावूनि बाहेर मुदिया । पापाचारें पापिया प्रवृत्ति मांडी ॥ २ ॥ स्वधर्माचे फाडोवाडें । प्रतिपदीं पाटा पडे । अधर्माची खाणी उघडे । समूळ कुडें कर्माचरण ॥ ३ ॥ तेणें पापाचार पिके । गगनचुंबित जाहलीं टेंकें । मग अधमोत्तम एकें तुकें । घालिती यथासुखें अधर्मघालणी ॥ ४ ॥ तेथ ठाणें देऊनि अभिमाना । वाढविती ज्ञानाभिमाना । मग निंदिती साधुजना । विपुळती सज्जना उपहासयुक्त ॥ ५ ॥ जगीं सर्वत्र पाहती दोष । अक्षपि देखिल्या निर्दोष । तरी करूनियां उपहास । करिती सावकाश असदारोपणें ॥ ६ ॥ यापरी अभिमानविदां । पापबुद्धीची दृढ बाधा । सहजानुवादें सदा । साधुनिंदा अनुवादती ॥ ७ ॥ जे कां हरीतें आवडती । जे सदा करिती हरिभक्ती । त्यांतें सदा उपहासिती । अनुवादती गुणदोष ॥ ८ ॥ द्विज स्मरती हरिनाम । त्या नांव म्हणती अधर्म । ऐकोनिही नामकीर्तनसंभ्रम । म्हणती हें परम महापाप ॥ ९ ॥ ऐसा जो हरिनामातें निंदी । हरिकीर्तनीं दुर्बुद्धी । तो खळ जाणावा त्रिशुद्धी । भजनापवादी दुर्जन ॥ ११० ॥

ते तरी बिचारे काय करतील ! शुद्ध सत्त्वगुणानें खरोखरच सोडलें तेव्हां रजोगुणामुळें ते कामाविषयीं उत्सुक होऊन अतिकामी बनले. ९५ त्यामुळें उर्वशीसारख्या अप्सरांची अत्यंत आवड उत्पन्न झाली. स्वर्गभोगांची गोडी लागली. त्यासाठीं यज्ञ-यागाची परवड सुरू झाली व ते पुण्याची जोड जोडावयास धांवूं लागले. ९६ तेथें मंत्र, तंत्र, द्रव्यशुद्धि, यागविधि हें कांहीं नाहीं. त्यामुळें स्वर्ग तर नाहींच नाहीं; पण ते मूढ अविहित आचारानें फुकट फसले मात्र. ९७ आपल्या कामाची तृप्ति न झाल्यामुळें त्यांच्या सर्व अंगामध्यें क्रोध संचारितो. म्हणजे आंबिल, पेज इत्यादि शिळी झाली म्हणजे जशी कडू होतात, तशी त्यांची परिणामी स्थिति होते. ९८ कोरफड जशी जशी पिकूं लागते, तशी तशी अतिशय कडू होऊं लागते; त्याप्रमाणें कामुकाच्या कामाला जसा जसा प्रतिबंध होऊं लागतो, तसा त्याचा अति उग्र क्रोध वाढतो. ९९ क्रोध खरोखरच काळिया नागच आहे. तो पूज्यतेवर द्वेषाचा फूत्कार सोडीत असतो. साधुनिंदेचा धुडगुस घालितो. १०० क्रोधाचा आश्रय हा असा आहे. तेथें तमाचा चवाठा असतो व दंभाचा सराफकट्टा असतो आणि हिणकस सोन्याचा व्यापार चालतो. १ मग त्याला जो जो मनुष्य भेटतो त्याला जारण-मारण इत्यादि क्रियांचा नाद लावून त्याच्या हातून पापाचरण करवून पापाची प्रवृत्ति वाढवितो. २ मोठ्या आवडीनें स्वधर्माचे गोडवे गातो; पण अधर्माची खाण उघडितो. कारण त्याचें सर्वच कर्माचरण समूल मिथ्या असतें. ३ त्यामुळें पापाचरण पिकतें. त्यांचीं शिखरें गगनचुंबित होतील इतकीं उंच वाढतात आणि मग अधम, उत्तम हे सगळे सारखाच अधर्माचा गोंधळ घालितात. ४ तेथें अभिमान आपलें ठाणें देतो आणि ज्ञानाभिमान वाढवितो; त्यामुळें ते साधूंची निंदा करितात व सज्जनांचा उपहास करितात. ५ जगांत सर्वांत दोषदृष्टि ठेवितात, त्यांतहि कोणी निर्दोष आढ‍ळ्यास त्याचा उपहास करून त्याच्यावर खोटाच आरोप करितात. ६ याप्रमाणें जे अभिमानी जन असतात त्यांना पापबुद्धीची दृढ बाधा होते. सहज बोलण्यांतहि साधूंची निंदाच करितात. ७ जे हरीला आवडतात, जे नेहमीं हरिभक्ति करितात, त्यांचा ते सदा उपहास करितात आणि त्यांचे गुण दोषरूपानें प्रकट करितात. ८ द्विज हरिनामाचें स्मरण करितात, त्याला ते अधर्म म्हणतात, नामकीर्तन ऐकून त्याला महापाप म्हणतात. ९ असा जो हरिकीर्तनाविषयीं दुर्बुद्धि ठेवणारा, हरिभजन व्यर्थ आहे असें म्हणणारा, हरिनामाची निंदा करितो, तो खरोखरच खल समजावा. ११०.

वदन्ति तेऽन्योन्यमुपासितस्त्रियो गृहेषु मैथुन्यसुखेषु चाशिषः ।
यजन्त्यसृष्टान्नविधानदक्षिणं वृत्त्यै परं घ्नन्ति पशूनतद्विदः ॥ ८ ॥

स्त्रीकामें अतिकामुक । मैथुनापरतें नाहीं सुख । येणें प्रेमें काममूर्ख । स्त्रिया आवश्यक उपासिती ॥११॥ यापरी मंदबुद्धी । कैसे संवादती शब्दीं । मनुष्यजन्म हेचि सिद्धी । नाना भोगविधी भोगावया स्त्रिया ॥ १२ ॥ जें स्त्रीभोगीं सद्यसुख । तें त्यागविती अतिमूर्ख । वैराग्यमिसें लोक । ठकिले देख महामूढीं ॥ १३ ॥ सांडूनि गृहभोग अंगना । जयां वैराग्यें उद्भट भावना । ते निजकर्में दंडिले जाणा । नागवूनि वना दवडिले दैवें ॥ १४ ॥ काय गृहाश्रमीं देव नसे । मग वना धांवताति पिसे । साचचि देव वनीं वसे । तरी कां मृग ससे न तरती व्याघ्र ॥ १५ ॥ घालोनियां आसनें । देवो भेटतां जरी ध्यानें । तरी बकांचीं पाळिंगणें । कां पां तत्क्षणें नुद्धरती ॥ १६ ॥ एकांत रहिवास विवरीं । तेथचि भेटता श्रीहरी । तरी न तरोनियां उंदिरीं । कां पां घरोघरीं चिंवताती ॥ १७ ॥ देवो सर्वज्ञ चोखडा । तेणें पशुपक्षियां केला जोडा । तोही लोकीं मानूनियां वेडा । त्यागाचा गाढा पाडिला मोटा ॥ १८ ॥ आनंदा उपस्थ एकायतन । हें देवाचें वेदवचन । तेंही न मानूनि अज्ञान । त्यागाचें संपूर्ण मांडिती बंड ॥ १९ ॥ मैथुनीं परम सुख । देवेंचि रचिलें देख । तेंही त्यागोनियां मूर्ख । वीतरागें लोक संन्यासी होती ॥ १२० ॥ जे जगामाजीं केवळ पिशी । ते स्वयें होती संन्यासी । तो स्त्रीताप बाधी त्यांसी । मागतां

—त्यांच्या कामुकत्वाचें वर्णन—

उपासितस्त्रियः ते—ज्यांनीं स्त्रियांची उपासना केली आहे, पण वृद्धांची उपासना केलेली नाहीं, असे ते, मैथुन्यसुखेषु गृहेषु आशिषः अन्योन्यं वदन्ति—विषयसुखच ज्यामध्यें प्रधान आहे, आतिथ्यादि नाहीं, अशा गृहस्थाश्रमाविषयींच आशा परस्पर सांगतात. (मला आतां हें वित्तादि मिळालें, आणखीहि मी मिळवीन, आतां इतकें धन मजपाशीं आहे, पुढल्या वर्षी आणखी जास्त होईल इत्यादि मनोरथ ते परस्परांस सांगतात. त्यांच्या दांभिकत्वाचें वर्णन—) असृष्टान्नविधानदक्षिणं—ज्यांत अन्नदान नाहीं, विधि नाहीं व दक्षिणाहि नाहीं असे याग करितात. अतद्विदः वृत्त्यै परं पशून् घ्नन्ति—हिंसा दोष न जाणणारे ते मूढ केवल आपल्या उपजीविकेसाठीं पशूंना मारितात. ८.

स्त्रीविषयीं अतिशय कामुक व याच्या पलीकडे दुसरें सुखच नाहीं, अशा आसक्तीनें काममूर्ख झालेले ते स्त्रियांची उपासना अवश्य करितात ११ आणि ते मंदबुद्धि कसें बोलत असतात तें पहा—ते म्हणतात. मनुष्यजन्म हीच सिद्धि, अनेक भोग भोगण्यासाठींच स्त्रिया आहेत. १२ स्त्रीभोगांत असलेलें साक्षात् सुख हे मूढ लोक वैराग्याच्या मिषानें लोकांकडून टाकवितात व त्यांना ठकवितात. १३ स्त्री, पुत्र, गृह, वित्त यांना सोडून ज्यांना उत्कट वैराग्य आलेलें असतें त्यांना त्यांच्या पूर्वकर्मानेंच तो दंड केलेला असतो. त्यांचें दैव त्यांना सर्वस्वीं नागवून वनांत पाठवितें. १४ गृहस्थाश्रम्यांच्या घरांत काय देव नसतो ! म्हणून हे मूर्ख वनांत धांवतात ! देव जर खरोखर वनांत बसलेला असतां, तर मग हरिण, ससे, वाघ इत्यादि पशु कां तरून गेले नसते ! १५ आसनें घालून ध्यानानें जर देव भेटता तर मग बगळ्यांचा समुदाय तत्काळ कां उद्धारला नसता ! १६ एकांतांतील गुहेंत जर श्रीहरि भेटत असता तर भग उंदरांचा उद्धार तेव्हांच झाला असता ! ते घरोघर चूं चूं करीत कां राहिले असते ! १७ देव मोठा सर्वज्ञ जर आहे तर त्यानें पशुपक्ष्यांचीं जोडपीं कशाला उत्पन्न केलीं असता ! पण त्यालाहि लोकांनीं वेडा मानून सर्वस्वाचें मोठें अवडंबर माजविलें आहे. बृहदारण्यक उपनिषदांत १८ (अ. २. ४. ११)— समुद्र जसा सर्व जलांचा आधार त्याप्रमाणें उपस्थ इंद्रिय हें सर्व आनंदाचा एक आधार आहे, असें म्हटलें आहे हें देवांचें वेदवचन आहे, पण तेंहि मिथ्या मानून त्यागाचें मोठें बंड माजवितात. १९ देवानेंच स्त्रीसंगांत परमसुख ठेविलें असून मूर्ख लोक त्याचा त्याग करितात व आसक्ति सोडून संन्यास घेतात. १२० जे जगांत मूर्ख असतात तेच संन्यासी होतात.

भिकेसी पोट न भरे ॥ २१ ॥ त्यागोनियां निजस्त्रियेसी । कर्मत्यागें होती संन्यासी । देवें दंड देऊनि त्यांसी । लाविले भिकेसी दारोदारीं ॥ २२ ॥ हातावरी पावले दंड । खाडमिशा केलें मुंड । हिंडती भगवीं गुंडगुंड । हा स्त्रीशापें वितंड विटंबु केला ॥ २३ ॥ घेऊनियां दोहीं हातीं । उदंड गांडीसी लाविती माती । त्रिकाळ जळीं बुडविजती । ऐशी स्त्रीशापें ख्याती लाविली त्यांसी ॥ २४ ॥ लंगोटी लाविली गांडीसी । झोळी लाविली हातासी । त्याहीवरी दंड देऊनि त्यांसी । स्त्रीपापें संन्यासी लाविले भिके ॥ २५ ॥ स्त्रीसुखापरतें नाहीं सुख । स्त्रीत्यागापरता नाहीं दोख । हेंचि नेणोनियां मूर्ख । दंडिलें अनेक वैराग्यत्यागें ॥ २६ ॥ स्त्रीसंगेंवीण विविध भोग । ते जाणावे अतिउद्वेग । निजभाग्यें जे सभाग्य सांग । ते स्त्रीयोगें भोग भोगिती नाना ॥ २७ ॥ हेंचि देवाचें प्रसन्न होणें । जे सदा इष्ट भोग भोगणें । ते भोग जेणें त्यागणें । तेंचि क्षोभणें देवाचें ॥ २८ ॥ स्त्रियादि भोग त्यागिले रोकडे । पुढें निजमोक्ष हें वचन कुडें । यापरी भोळे लोक बापुडे । वैराग्यवादें फुडें नाडिले येथ ॥ २९ ॥ ऐसऐसिया अनुवादा । करिती परस्परें संवादा । म्हणती त्यागाची बुद्धि कदा । आम्हांसी गोविंदा देऊं नको ॥ १३० ॥ त्याग करोनि भीक मागणें । यापरीस भले मरणें । मुक्ति देखिली नाहीं कोणें । आपदा भोगणें जगु देखे ॥ ३१ ॥ कोणासी तरी मुक्ती । कोठें तरी देखिजेती । तरी ते साच मानूं येती । मिथ्या वदती वैराग्यत्यागा ॥ ३२ ॥ ऐशी त्यागाची करूनि निंदा । भोग भोगावे म्हणती सदा । ऐसऐशिया आशीर्वादा । देती सदा स्वाध्यायासी ॥ ३३ ॥ स्त्रीसुख परम मानून । स्वयें सदा होती स्त्रैण । मग जागृती सुषुप्ति स्वप्न । स्त्रियेचें ध्यान अहर्निशीं ॥ ३४ ॥ नाहीं सद्गुरूचें भजन । नाहीं वृद्धांसी पूजन । नाहीं अतिथींसी अन्न । स्त्रीआधीन सर्वस्वें ॥ ३५ ॥ स्त्रीयेचें दुखवूं नेदी मन । कदा नुल्लंघी स्त्रियेचें वचन । नित्य स्त्रियेचें अनुसंधान । सद्भावें उपासन स्त्रियेचें सदा ॥ ३६ ॥ नाहीं कुलदेवता

पण मागून त्यांना स्त्रीताप पीडा देतो, व भीक मागूनहि पोट भरत नाहीं. २१ स्वस्त्रीचा त्याग करून कर्मत्यागानें जे संन्यास घेतात, त्यांना दारोदार भिक्षा मागत फिरण्याची देव शिक्षाच करितो. २२ हातांत दंड घेतात, दाढीमिशी काढून टाकितात, भगवें वस्त्र गुंडाळून हिंडतात, स्त्रीशापामुळें ही त्यांची विलक्षण विटंबना होते. २३ स्त्रीशापामुळेंच ते दोन्ही हातांत माती घेऊन ती शरीराच्या निरनिराळ्या भागाला लावितात. दिवसांतून तीन तीन वेळां पाण्यांत बुडी मारितात. २४ लंगोटी नेसतात, हातांत झोळी व त्याच्याहिवर दंड घेतात. याप्रमाणें शापानें संन्याशांना भीक मागण्यास लाविलें आहे. २५ स्त्रीसुखासारखें सुख नाहीं व स्त्रीत्यागासारखा दोष नाहीं. हें न जाणतां अनेक मूर्ख वैराग्य व त्याग यांच्याकडून दंडिले जातात. २६ स्त्रीसंगावांचून जे इतर भोग ते सर्व मोठे उद्वेगच आहेत, असें समजावें. जे निज भाग्यानें मोठे भाग्यवान् असतात तेच स्त्रीबरोबर विविधभोग भोगितात. २७ नेहमीं इष्टभोग भोगणें हाच ईश्वराचा प्रसाद व भोगत्याग हा ईश्वराचा कोप होय. २८ स्त्रियांचे साक्षात भोग टाकून पुढें आतां मोक्ष होणार आहे, हें वचनच मुळीं खोटें आहे. याप्रमाणें धूर्तांनीं वैराग्यवादानें गरीबबिचाऱ्या भोळ्या लोकांना नागविलें. २९ या प्रकारची चर्चा ते आपसांत करितात आणि म्हणतात कीं, हे गोविंदा, त्यागाची बुद्धि आम्हांला कधीं देऊं नकोस. १३० त्याग करून भीक मागण्यापेक्षां मरण पतकरलें. मुक्ति कोणीं पाहिली नाहीं; पण संन्यासानंतर होणारें दुःख मात्र सर्व जगत् पहातें. ३१ अहो, कोणाला मुक्ति मिळालेली तुम्हीं कोठें पाहिली आहे का ! ती जर पाहिली असेल तर ती खरी मानतां येईल; पण हे मूढ वैराग्य व त्याग खोटाच सांगत सुटतात. ३२ याप्रमाणें त्यागाची निंदा करून नेहमीं भोग भोगावे असें ते म्हणतात व अशा प्रकारचें आशीर्वाद आपल्या समानशीलास सदा देतात. ३३ स्त्रीसुखाला श्रेष्ठ मानून स्वतः सदा स्त्रैण (स्त्रीलंपट) होतात व मग जागृति, स्वप्न, सुषुप्ति, यांत सर्वकाळ स्त्रीचेंच चिंतन करितात. ३४ सद्गुरूचें भजन नाहीं. वृद्धांचें पूजन नाहीं, अतिथींना अन्न नाहीं, तर सर्वस्वीं स्त्रीच्या अधीन होतात. ३५ स्वस्त्रीचें मन दुखवीत नाहींत, तिच्या शब्दाबाहेर कधीं जात नाहींत, नित्य तिचेंच चिंतन करीत व तिचीच उपासना सद्भावानें करीत असतात. ३६ कुळदैवत, कुळा-

कुलवृत्ती । नाहीं पिता माता सद्गुरुभक्ती । संपत्ती वोपी स्त्रिये हातीं । आपण सर्वार्थी तीअधीन वर्ते ॥ ३७ ॥ ते स्त्रीभोग भोगावयासी । धनार्जन अर्जावयासी । यागु आरंभी जीविकेसी । केवळ दंभेंसीं उदरार्थ ॥ ३८ ॥

पूर्वश्लोकार्ध ॥ ॥ यजन्त्यसृष्टान्नविधानदक्षिणं वृत्त्यै परं घ्नन्ति पशूनतद्विदः ।

यागें होआवया सर्वसिद्धी । हेही नाहीं दृढ बुद्धी । रोकडी ये जीविकाविधी । उपाय त्रिशुद्धी हाचि केला ॥ ३९ ॥ यज्ञदीक्षेची प्रतिष्ठा । तेणें पूज्य होईन वरिष्ठां । अग्रपूजा माझा वांटा । ऐशिया उत्कंठा आदरी यागु ॥ १४० ॥ ऐशिया नाना विवंचना । आधीं संकल्पूनि मना । मग प्रवर्ते यागयजना । जोडावया धना कृतनिश्चयो ॥ ४१ ॥ न पाहे विधिविधाना । नाहीं आदरू मंत्रोच्चारणा । न करी अन्नसंपादना । कोरडे कणां हवन मांडी ॥ ४२ ॥ मी यज्ञ करितों अंगें । ऐसें जगापासी सांगे । आणि तेणें यागयोगें । चालवी प्रसंगें जीविकायेगु ॥ ४३ ॥ स्वयें नेणती विधिविधाना । आणि न पुसती सज्ञाना । परी पशूंचिया हनना । प्रवर्तती जाणा शठ नष्ट दंभें ॥ ४४ ॥ मग तेथींचा पुरोडाश । सेविती यथासावकाश । आम्ही पवित्र झालों निर्दोष । ऐसाही उल्लास लागती करूं ॥ ४५ ॥ गौणता आवाहनविसर्जना । तेथ कैंची पूजा दक्षिणा । सत्पात्राची अवगणना । करिती हेळणा ज्ञानगर्वें ॥ ४६ ॥ केवळ जीविकेच्या आशा । करूं लागती पशुहिंसा । आम्ही याज्ञिक या आवेशा । पिटिती ठसा तिहीं लोकीं ॥ ४७ ॥ केवळ जीविकेचिया दुराशा । अविधी करिती पशुहिंसा । मज दोष होईल ऐसा । कंटाळा मानसा कदा नुपजे ॥ ४८ ॥

चार, माता, पिता, सद्गुरुभक्ति यांना सोडून आपली संपत्ति तिलाच अर्पण करितात. ३७ आणि आपण तिच्या तंत्रानें वागत असतात. ते स्त्रीभोग भोगण्यासाठीं, धनार्जन करण्यासाठीं व आपलें उदरपोषण करण्यासाठीं केवळ दंभानें यज्ञ आरंभितात. १३८.

यज्ञानें सर्व सिद्धि व्हावी अशीहि त्यांची दृढ बुद्धि नाहीं. केवळ आपली उपजीविका व्हावी म्हणूनच खरोखर त्यांनीं हा उपाय योजिलेला आहे. ३९ यज्ञदीक्षा घेतली म्हणजे माझी प्रतिष्ठा वाढेल, त्यामुळें मी वसिष्ठांनाहि पूज्य होईन, अग्रपूजेचा मान माझ्या वांट्याला येईल, अशा उत्कंठेनें ते यज्ञाचा आदर करितात. १४० अशा प्रकारच्या अनेक विचारांचा मनांत संकल्प करून मग यज्ञ करण्यास ते प्रवृत्त होतात. त्यांत धन मिळविण्याचाच त्यांचा कृतनिश्चय असतो. ४१ ते शास्त्रविधान पाहत नाहींत, आदरानें मंत्रोच्चार करीत नाहींत. अन्न शिजवीत नाहींत. कोरड्या धान्या-चेंच हवन करितात. ४२ मी स्वतः यज्ञ करितों असें सर्व जगाला सांगत सुटतात आणि त्या यागावर स्वतःचा योगक्षेम चालवितात. ४३ स्वतः शास्त्रविधि जाणत नाहींत, तज्ज्ञांना विचारीत नाहींत. पण पशूंचा बळी देण्यास मात्र ते शठ, नष्ट, दंभानें प्रवृत्त होतात. ४४ त्या यज्ञांतील पुरोडाश सावकाश सेवन करितात, आणखी पुनः आम्ही पवित्र व निर्दोष झालों असा जगांत घोष करूं लागतात. ४५ देवतांचें अवाहन व विसर्जन हीं सुद्धां जेथें गौण मानलीं जातात तेथें पूजा कोणाची व दक्षिणा कसली ! उलट सत्पात्राला तुच्छ लेखून ज्ञानगर्वानें त्यांची हेटाळणी करितात. ४६ केवळ उपजीविकेच्या आशेनें पशुहिंसा करितात व ‘आम्ही याज्ञिक’ असा मोठ्या आवेशानें तिन्ही लोकीं डंका पिटतात. ४७ केवळ जीविकेच्या दुराशेनेंच अविधीनें पशुहिंसा करीत असल्यामुळें यांत कांहीं दोष आहे, हा विचार त्यांच्या मनाला कधीं स्पर्शेहि करीत नाहीं. १४८.

श्रिया विभूत्याऽभिजनेन विद्यया त्यागेन रूपेण बलेन कर्मणा ।
जातस्मयेनान्धधियः सहेश्वरान् सतोऽवमन्यन्ति हरिप्रियान् खलाः ॥ ९ ॥

यापरी वर्ततां स्थिती । त्याहीवरी जालिया संपत्ती । तैं गर्वाचा भद्रजाती । तैशिया उन्नतीं डुलों लागे ॥ ४९ ॥ कां लेंडिये आला लोंढा । वाहवी वाळलिया लेंडा । मां मर्कटाचिया तोंडा । मदिरेचा भांडा सांपडे जैसा ॥ १५० ॥ तैसा मी एकु ज्ञाता फुडा । म्हणोनि नाचे तडतडां । सज्ञान आम्हांपुढां । कवण बापुडा आन आहे ॥ ५१ ॥ ऐशियाहीवरी अदृष्टता । रत्नें मोतिलगा वस्तुजाता । गजवाजीनृयानप्राप्तता । तेणें गर्वे इंद्रमाथां मोचे फेडी ॥ ५२ ॥ यज्ञीं यागस्वाहाकारीं । इंद्र आमुची आशा करी । त्याची आम्हांहूनि थोरी । कैशापरी मानावी ॥५३॥ मग शिष्यसुहृत्सज्जनीं । परिवारिल्या सेवकजनीं । मजसमान त्रिभुवनीं । समर्थ कोणी असेना ॥ ५४ ॥ जैशी कां कांटींभोंवती हरळी । तैशी शिष्यांची मांदियाळी । ते महिमेच्या गर्वमेळीं । मानी पायांतळीं ध्रुवमंडळ ॥ ५५ ॥ जैसें विंचुवां विष थोडें । परी प्रबळ वेदनेसी चढे । तेवीं विद्या थोडी परी गाढें । गर्वाचें फुडें अतिभरितें ॥ ५६ ॥ तो अज्ञानांमाजीं सर्वज्ञता । मिरवी आपुली योग्यता । जेवीं अंधारीं खद्योता । सतेजता झगमगी ॥ ५७ ॥ अल्पज्ञाता विद्येसाठीं । वाचस्पतीसी नाणी दृष्टी । जेवीं मुंगी पांखासाठीं । गरुडाचे पृष्ठीं पावो देवों पाहे ॥ ५८ ॥ निखळ तांबियाचें नाणें । देवों रिघे दामोक्यायेसणें । तेणें आपुलेनि दातेपणें । मानी ठेंगणें बळीतें ॥ ५९ ॥ कर्ण दातृत्वें मानिजे फुडा । तोही न मांडे आम्हांपुढां । प्रत्यहीं भारसुवर्णहुडा । उपजे तेणें गाढा दाता

—त्यांच्या मानित्वाचें वर्णन—

श्रिया–धनादिसंपत्तीनें, विभूत्या–ऐश्वर्यानें, अभिजनेन–कुलानें, विद्यया–विद्येनें, त्यागेन–दानानें, रूपेण–रूपानें, बलेन–शरीरसामर्थ्यानें, कर्मणा–कर्मानें, जातस्मयेन–या सर्वांच्या योगानें उत्पन्न झालेला जो गर्व त्यानें, अंधधियः खलाः–ज्यांची बुद्धि अंध झाली आहे असे खल, सहेश्वरान् हरिप्रियान् सतः–ईश्वरासह हरीला प्रिय असलेल्या संतांचा अपमान करितात. धनादिकांच्या योगानें उत्पन्न झालेल्या गर्वानें विवेकहीन झालेले खल ईश्वर व भगवद्भक्त यांचा, अवमन्यन्ति–अवमान करितात. ९.

अशी स्थिति झाली व त्यांतच संपत्तीची भर पडली म्हणजे मग तो गर्वानें मदोन्मत्त हत्तीसारखा डुलूं लागतो. ४९ किंवा ओढ्याला पूर यावा आणि त्यानें वाळलेलें शेण वाहून न्यावें, किंवा माकडाच्या हातीं मद्याचें भांडें सांपडावें व तें त्यानें तोंडाला लावावें, १५० तसें 'मीच काय तो एक खरा ज्ञानी' असें म्हणून तो खैर नाचूं लागतो. आम्ही जे सज्ञान त्या आम्हांपुढें दुसऱ्या बापड्यांची काय कथा ! ५१ त्यांत आणखी जर दैववशात् रत्नें, मोत्यांच्या माळा, हत्ती, घोडे, पालखी, या ऐश्वर्याची प्राप्ति झाली तर मग काय विचारितां ! त्या गर्वानें तो इंद्राच्या डोक्यावरहि लाथा मारूं लागतो. ५२ अहो, यज्ञांत आमच्यापासून स्वाहाकार मिळावा म्हणून इंद्र आशा करीत असतो. त्याची आमच्यापुढें कसली थोरवी आली आहे, असें तो समजतो. ५३ शिष्य, स्नेही, सज्जन व त्यांच्या परिवारांतील सेवकजन, त्यांच्यापुढें तर 'माझ्यासारखा त्रिभुवनांत कोणी समर्थ नाहीं' अशी प्रौढी मिरवितो. ५४ कांट्याभोंवतीं जसें गवत उगवतें, तसा याच्याभोंवतीं शिष्यांचा समुदाय जमतो. या वैभवाच्या गर्वांत तो 'मीं ध्रुवमंडळालाहि पायांखालीं तुडविलें' असें मानितो. ५५ विंचवाच्या नांगींत विष फार थोडें असतें, पण त्याच्या वेदना फार भयंकर; त्याप्रमाणें याला विद्या थोडी असते, पण गर्व मात्र अतिशय असतो. गर्वाचें त्याला भरतेंच येत असतें. ५६ अंधारांत जसा काजवा लुकलुक करून चमकत असतो, तसा अज्ञ लोकांत तो सर्वज्ञ होतो व आपल्या ज्ञानाची प्रौढि मिरवितो. ५७ मुंगीला पंख फुटले म्हणजे ती गरुडाच्या पाठीवरहि पाय देऊं पहाते, त्याचप्रमाणें हा अल्पज्ञ विद्येच्या मदानें बृहस्पतीलाहि तुच्छ लेखितो ५८ एक पैशासारखें तांब्याचें नाणें द्यावयास तयार होतो आणि त्या आपल्या दातृत्वानें बळीलाहि आपल्यापेक्षां कमी लेखितो. ५९ कर्णाला मोठा दाता मानितात, पण आम्हांपुढें तोहि तुच्छ आहे, कर्ण रोज सुवर्णाच्या मोठ्या ढिगांचें दान करीत असे त्यामुळें तो मोठा दाता म्हणून प्रसिद्ध झाला. १६०

कर्णु ॥ १६० ॥ आम्ही निजार्जितें वित्तें । दान देवों सत्पात्रातें । मा दातृत्वें कर्णातें । विशेषु येथें तो कायी ॥ ६१ ॥ सदा अपकारुचि जोडे । त्यासीही अल्प उपकारु घडे । इतुकियासाठीं न उकल पडे । सर्वस्व रोकडें बुडवी सदा ॥ ६२ ॥ एवं अल्प दानासाठीं । दातृत्वाचे त्रिकुटीं । मेघाच्यापरी अतिउद्भटीं । स्वमुखें उठी गर्जतु ॥ ६३ ॥ बरवेपणाचेनि पांगें । मदनासी विटावों लागे । सौंदर्य माझेनि अंगें । दुजे मजजोगें असेना ॥ ६४ ॥ कीं खर बरवेपणासाठीं । राजहंसा नाणी दिठीं । कां आस्वली मानी पोटीं । मीही गोमटी सीतेपरीस ॥ ६५ ॥ तेवीं बरवेपणाचा जाण । थोर चढे देहाभिमान । जेवीं देखोनि हिरवें रान । ल्हैसा संपूर्ण उन्मादे ॥ ६६ ॥ यावरी कांहीं एक पराक्रम । केलिया न मानी तीनही राम । जेवीं गोग्रहणीं संग्राम । शौर्यधर्म उत्तराचा ॥ ६७ ॥ कां अंगींचेनि माजें । रणशूर न मानी दुजें । तैसा बळाचेनि फुंजे । स्वयें गर्जे मुसमुसितु ॥ ६८ ॥ ते आधींच ह्मणविती सज्ञान । त्याहीवरी याज्ञिक हें महिमान । तें याज्ञिक कर्माचरण । दाविती आपण लोकांप्रती ॥ ६९ ॥ आलिया धनिक जनांप्रती । आपुली स्तविती कर्मस्थिती । मग कर्ममुद्रा नानायुक्ती । स्वयें दाविती लौकिका ॥ १७० ॥ ऐशियाही कर्माचारा । ज्ञातृत्वाचा गर्व पुरा । जेवीं दिवाभीतु अंधारा । निघे बाहेरा घुंघातु ॥ ७१ ॥ अजांचें लेंडोरें पेटे । तेथ ज्योतिज्वाळा कदा नुमटे । परी धुरकटलें धुपधुपीं मोटें । धुवें थिकटे दिग्मंडळ ॥ ७२ ॥ यापरी नाना दंभोपाधी । अतिगर्वाच्या उन्मादीं । अंध जाली सद्बुद्धी । तो साधूतें निंदी हरिहरांसहित ॥ ७३ ॥ जेवीं दाटलेनि काविळें । दृष्टीतें करी पिंवळें । मग देखों लागे सकळें । असतां निर्मळें पीतवर्ण ॥ ७४ ॥ तेवीं निंदोपाधी अतिगर्वी । मंद जाली प्रज्ञा आघवी । मग निर्दुष्टीं दोष लावी । शुद्धातें भावी अतिमलिन ॥ ७५ ॥ जो योगियांच्या मुगुटीं । ज्यातें ह्मणती धूर्जटी । त्याची पाहतां राहाटी । दिसे

आम्हीहि स्वतः संपादन केलेलें वित्त देतों, तेव्हां कर्ण व आम्ही यांच्या दातृत्वामध्यें भेद तो काय असें तो म्हणतो. ६१ त्याच्या हातून नेहमीं अपकारच घडत असतो व थोडासा उपकारहि होतो; पण तेवढ्यानें त्याला उमज पडत नाहीं. तो सर्वदा आपलें सर्वस्व उघड उघड घालवीत असतो. ६२ याप्रमाणें थोडेंसें दान करून, दातृत्वाच्या मोठ्या पर्वतावर मेघाप्रमाणें स्वमुखानें मोठी गर्जना करीत सुटतो. ६३ आपल्या सौंदर्यगर्वानें तो मदनालाहि तुच्छ लेखितो. सौंदर्य काय तें माझ्या ठिकाणींच आहे, दुसऱ्या कोणांत नाहीं असें मानितो. ६४ गाढव आपल्या सौंदर्यापुढें राजहंसालाहि तुच्छ मानितो. किंवा अस्वली जशी मनांत म्हणते कीं, मी सीतेपेक्षांहि गोरी आहे, ६५ त्याचप्रमाणें यालाहि आपल्या सौंदर्याचा मोठा अभिमान वाटतो. हिरवें रान पाहून रेडा जसा उन्मत्त होतो तशी त्याची स्थिति होते. ६६आणि अशा स्थितींत त्याच्या हातून जर कां एखादा पराक्रम घडला मग तर काय तो परशुराम, दाशरथिराम व बलराम यांनाहि तुःपदार्थ मानितो. गोग्रहणाच्या युद्धांत उत्तरानें जसें शौर्य दाखविलें तसाच याचा पराक्रम असतो. ६७ जसा एखादा रणशूर शरीरसामर्थ्याच्या मदानें कोणालाहि जुमानीत नाहीं, तसाच हाहि आपल्या सामर्थ्याभिमानानें मुसमुसूं लागतो व मोठमोठ्यांनीं गर्जना करितो. ६८ असले लोक अगोदरच आपल्याला सज्ञान म्हणवितात, त्यांत आणखी 'याज्ञिक' असा आपला महिमा वाढावा म्हणून ते यज्ञकर्म करून लोकांना दाखवितात. ६९ आलेल्या धनिकांपुढें आपल्या कर्मानुष्ठानाचें सविस्तर वर्णन करितात आणि कर्माचीं अनेक चिन्हें विविध युक्तींनींच लोकांना दाखवितात. १७० अशा प्रकारच्या कर्माचरणाबरोबर त्यांना ज्ञातृत्वाचाहि पूर्ण गर्व असतो. त्यामुळें घुबड, अंधकारांत घूं घूं करीत जसें बाहेर पडतें तसेंच हे अज्ञजनांमध्यें आपल्या ज्ञानाचें महत्त्व गात सुटतात. ७१ बकऱ्यांच्या लेंड्यांचा ढीग पेटला म्हणजे त्यांतून ज्वाळा तर एकहि निघत नाहीं, पण धुरानें मात्र दशदिशा भरून जातात. ७२ त्यामुळें विविध दंभोपाधि व भयंकर गर्वाचा उन्माद यांनीं त्यांची सद्बुद्धि अंध होते. असला याज्ञिक हरिहरांसह साधूंची निंदा करूं लागतो. ७३ काविळीनें डोळे पिवळे झाले म्हणजे पांढरे पदार्थहि पिवळे दिसूं लागतात, ७४ त्याप्रमाणें दुसऱ्याची निंदा व अतिगर्व यांनीं बुद्धि मंद झाली म्हणजे मग तो निर्दोषावरहि दोष लादतो व शुद्धांनाहि अति मलिन समजतो. ७५ जो योग्यांचा मुकुटमणि व ज्याला धूर्जटि म्हणतात त्याचेंहि वर्तन पाहिलें असतां तोहि शेवटीं

शेवटीं अतिमंद ॥ ७६ ॥ रागें उमा घालीत आगीं । यालागीं याज्ञिकाचें शिर भंगी । सकामु तरी मोहिनीलागीं । नग्न लागवेगीं पाठीं लागे ॥ ७७ ॥ विष्णु सदाचा कपटी । कांहीं न देखों शुद्ध दृष्टीं । वृंदा पतिव्रता गोमटी । तेणें केली शेवटीं व्यभिचारिणी ॥ ७८ ॥ जेथ विष्णु व्यभिचारराशी । तो वृंदावनीं वृंदेच्या पाशीं । जव्याळ गांठ्याळ मिळती राशी । केवीं साधुत्व त्यांसी मानूं आम्ही ॥ ७९ ॥ साधु मानूं सनत्कुमार । त्यांसीही वैकुंठीं क्रोध थोर । शब्दासाठीं हरिकिंकर । जयविजय वीर शापिले ॥ १८० ॥ श्रेष्ठ मानूं चतुरानन । तोही निलागचि हीन । उमा नोवरी देखोन । ह्मणतां सावधान वीर्य द्रवलें ॥ ८१ ॥ नारद ब्रह्मचारी निजांगें । तोही कृष्णदारा स्वयें मागे । तो कृष्णें ठकविला तत्प्रसंगें । साठी पुत्र वेगें स्नानीं व्याला तो ॥ ८२ ॥ ज्यातें म्हणती सत्य धर्म । तोही केवळ अधर्म । गोत्रवधाचा संभ्रम । हा पूर्ण अधर्म धर्मासी ॥ ८३ ॥ व्यास तरी तो जारपुत्र । तेणेंचि कर्में पाराशर । द्वेषिया वसिष्ठ विश्वामित्र । अतिमत्सर परस्परें ॥ ८४ ॥ साधु ह्मणों दुर्वास ऋषी । तो छळूं गेला अंबरीषासी । पितृद्रोह प्रल्हादासी । साधुत्व त्यासी केवीं मानूं ॥ ८५ ॥ एवं वाखाणिले पुराणीं । तेही साच न मानिती मनीं । मा आतांचे वर्तमानीं । साधु कोणी असेना ॥ ८६ ॥ ऐकोनियां अचाट गोष्टी । येरें धांवती येरांपाठीं । एक करिती तोंडपिटी । अतिचावटी उदरार्थ ॥ ८७ ॥ एक मुद्रावंत आसनीं । एक बैसती बकध्यानीं । परी सत्य माने मनीं । ऐसा साधु कोणी असेना ॥ ८८ ॥ ऐसें आपुलियाचि युक्तीं । साक्षेपें साधूतें निंदिती । साधु असती हे वस्ती । अणुमात्र चित्तीं असेना ॥ ८९ ॥ जे जे हरीचे पढियंते । ते ते नावडती तयातें । जेवीं दाखवितां दर्पणातें । क्षोभे निजचित्तें निर्नासिक ॥ १९० ॥

अतिमंदच ठरतो. ७६ उमा रागानें अग्निकुंडांत उडी घालते म्हणून शंकर याज्ञिक दक्षाचें शिर तोडितो. हा झाला त्याच्या क्रोधाचा प्रकार ! आतां कामाविषयीं पहावें तर मोहिनीच्या मागें दिगंबर होऊन धांवतो. ७७ विष्णु सदाचाच कपटी ! त्याच्यांत शुद्धपणा कांहींच दिसत नाहीं. वृंदा केवढी प्रतिव्रता, पण शेवटीं त्यानें तिलाहि व्यभिचारिणी केली. ७८ आणि जेथें स्वतः विष्णूच व्यभिचाराची राशी बनला व तो वृंदेपाशीं वृंदावनांत अनेक प्रकारचे विलास करीत राहिला तेथें त्याच्या साधुत्वालाहि आम्ही काय मान देणार ! ७९ बरें सनत्कुमाराला साधु म्हणावें तर त्यालाहि वैकुंठांत केवढा क्रोध आला ! नुसत्या एका शब्दासाठीं त्यानें जय-विजय या नांवाच्या वीर हरिकिंकरांना शाप दिला. १८० ब्रह्मदेवाला श्रेष्ठ मानावें तर तोहि सर्वथा हीन आहे. कारण शंकराच्या लग्नांत 'उमा' या नवरीला पाहून सावधान म्हणत असतांनाच त्याचें ब्रह्मचर्य ढासळलें. ८१ नारद मोठा ब्रह्मचारी पण तो कृष्णाजवळ त्याची बायको मागूं लागला, त्याप्रसंगीं कृष्णानें पण त्याला चांगलेंच फसविलें. स्नान करीत असतांच त्याला साठ पुत्र झाले. ८२ ज्याला साक्षात् धर्म म्हणतात तोहि केवल अधर्म आहे. कारण त्याला आपल्या कुलाची हिंसा करण्याचा दोष निःसंशय लागला आहे. ८३ व्यास तर शुद्ध जारपुत्रच. पराशराच्या जारकर्मामुळेंच तो पाराशर झाला. वसिष्ठ आणि विश्वामित्र हे एकमेकांचे शत्रु होते. ८४ दुर्वासऋषीलाच साधु म्हणावें तर त्यानें अंबरीषाला छळिलें. पितृद्रोही प्रल्हादाला तरी साधु कसें म्हणावें ! ८५ याप्रमाणें पुराणांमध्यें ज्यांची स्तुति केली आहे, त्यांनाहि जर ते खरे साधु मानीत नाहींत तर मग वर्तमानसमयीं त्यांना कोणीच साधु दिसत नाहींत, ८६ यांत आश्चर्य कसलें ! अहो, पुराणांतल्या अशा अचाट गोष्टी ऐकून हे धार्मिक लोक शेळ्यांप्रमाणें एकमेकांच्या मागें धावूं लागतात. पोटासाठीं तेहि अशी अचकटविचकट वाचाळता करितात. ८७ कोणी मुद्रा लावून आसनावर बसतात व कोणी बकासारखें ध्यान करितात, पण आम्हांला त्यांत एखादा तरी कोणी खरा साधु असेल असें मुळींच वाटत नाहीं. ८८ याप्रमाणें आपल्याच युक्तींनीं ते साधूंची आक्षेपपूर्वक निंदा करितात. या त्रिभुवनांत कोणी साधु आहेत, ही कल्पना त्यांच्या चित्ताला स्पर्शहि करीत नाहीं. ८९ हरीचे जे आवडते ते यांचे नावडते. ज्याप्रमाणें नकट्याला आरसा दाखविला असतां राग येतो, त्याप्रमाणेंच साधूंचें नांव काढतांच यांचें पित्त खवळतें १९०.

ज्या ईश्वराचेनि वर्तिजती । तो ईश्वरू आहे हें न मनिती । तो ईश्वर आहे कोणे स्थिती । ऐक तुजप्रती सांगेन राया ॥ ९१ ॥

सर्वेषु शश्वत्तनुभृत्स्ववस्थितं यथा स्वमात्मानमभीष्टमीश्वरम् ।
वेदोपगीतं च न शृण्वतेऽबुधा मनोरथानां प्रवदन्ति वार्तया ॥ १० ॥

जो सर्व भूतांचे ठायीं । निरंतर अंतर नाहीं । समसाम्यें सर्वदा पाहीं । उणापुरा कदाही कल्पांतीं नव्हे ॥ ९२ ॥ जो सर्वांमाजीं असे सर्वदा । परी सर्वपणा नातळे कदा । जेवीं पद्मपत्र जलस्पंदा । अलिप्त बुद्बुदा असोनि संगें ॥ ९३ ॥ तेवीं असोनि सकळ जनीं । घसवटेना जनघसणीं । नभ जैसें अलिप्तपणीं । नरचूडामणी सबाह्य ॥ ९४ ॥ तैसें अलिप्तपण न मोडे । परी रची अनंत ब्रह्मांडें । तें ब्रह्मांड अंडें प्रचंडें । वागवी उदंडें अकर्तात्मयोगें ॥ ९५ ॥ यालागीं तो 'अंतर्यामी' । अभिधा बोलिजे नित्य निगमीं । जो सर्वांच्या हृदयग्रामीं । चेतनानुक्रमीं लक्षिजे ॥ ९६ ॥ त्या ईश्वरातें नित्य ध्यातां । आवडी मुखीं नाम गातां । तरी अभीष्ट मनोरथां । होय वर्षता अखंडधारीं ॥ ९७ ॥ त्या ईश्वराच्या गातां गोठी । सर्व अनिष्टां होय तुटी । जो देखतां दृष्टीं । स्वानंदसृष्टि वर्षे तुष्टला ॥ ९८ ॥ एवं सुखदाता तोचि शास्ता । जो कां अंतकाचा नियंता । अकाळें काळही सत्ता । ज्या भेणें सर्वथा करूं न शके ॥ ९९ ॥ श्वासोच्छ्वासांचिया परिचारा । ज्या भेणें नेमस्त वाजे वारा । ज्याचेनि धाकें धरा । न विरवे सागरा जळीं असतां ॥ २०० ॥ ज्याचे आज्ञेवरी जाण । सूर्य चालवी दिनमान ।

ज्या ईश्वराच्या सत्तेनें हे जिवंत रहातात, तो ईश्वर आहे ही गोष्ट त्यांना पटत नाहीं. पण हे राजा, तो ईश्वर कोणत्या स्थितींत आहे, हें मी तुला सांगतों. १९१.

——शिवाय अशाप्रकारें वर्तन करणारे ते वेदतत्त्वार्थ स्पष्ट असूनहि जाणत नाहींत असें सांगतात——

सर्वेषु तनुभृत्सु—सर्व प्राण्यांमध्यें, **यथा खं**—आकाशाप्रमाणें, **आत्मानं अभीष्टं ईश्वरं शश्वत् अवस्थितं**—आत्मरूपानें व अत्यंत अभीष्ट अशा ईश्वररूपानें निरंतर स्थित असलेल्या, **च वेदोपगीतं**—वेदानें वर्णिलेल्या तत्त्वार्थाला, **अबुधाः न शृण्वते**—ते मूढ ऐकत नाहींत व जाणत नाहींत. कारण **मनोरथानां वार्तया प्रवदन्ति**—मनोरथांच्या वार्तेनें वेदांचें प्रवचन करितात. [सर्व शरीरधारण करणाऱ्या प्राण्यांमध्यें आत्मरूपानें व ईश्वररूपानें अवस्थित असलेल्या, पण आकाशाप्रमाणें असंग व अत्यंत अभीष्ट अशा परमेश्वराला ते मूढ जाणत नाहींत. वेदामध्यें वर्णन केलेलें असल्यामुळें अतिस्पष्ट असलेल्याहि त्याचें स्मरण करीत नाहींत. कारण विषयांच्या वार्तेनेंच ते वेदांचें व्याख्यान करितात. म्ह० निवृत्तिपर असलेल्याहि वेदाचें प्रवृत्तिपर वर्णन करितात.] १०.

जो सर्वभूतांमध्यें भेदभावशून्य, अखंड, सर्वत्र सम, कल्पांतींहि व कोठें कधींच न्यूनाधिक होत नाहीं, ९२ जो सर्व वस्तूंत नित्य असतो, पण त्याला सर्वत्वाचा स्पर्शहि होत नाहीं. ज्याप्रमाणें कमलपत्र जलबिंदूनें लिप्त होत नाहीं व तें सर्वदा पाण्यांत असूनहि भिजत नाहीं ९३ त्याप्रमाणें तो सर्व लोकांत राहूनहि लोकांच्या व्यवहारांत सामील होत नाहीं, तर आकाश जसें सबाह्य अलिप्त असतें तसाच हा पुरुषोत्तम निर्लेप आहे. ९४ तो आपलें असंगत्व न टाकितां अनंत ब्रह्मांडांची रचना करितो आणि स्वतःकडे कर्तृत्व न घेतां हें प्रचंड ब्रह्माण्ड आपल्या स्वरूपांत वागवितो. ९५ यासाठींच वेदांमध्यें त्याला नित्य 'अंतर्यामी' असें म्हटलें आहे. सर्वांच्या हृदयांत राहून जो सर्वांची चेष्टा साक्षित्वानें पहातो, ९६ त्या ईश्वराचें नित्य ध्यान केलें असतां व मुखानें त्याचें नांव आवडीनें गायिलें असतां तो सर्व मनोरथांचा अखंड वर्षावच करितो. ९७ त्या ईश्वराच्या गोष्टी बोलल्या असतां सर्व संकटांचा नाश होतो. दृष्टीनें पाहिलें असतां जो संतुष्ट होऊन स्वानंदाची वृष्टि करितो, ९८ तोच सुखदाता व सर्वांचा शास्ता आहे. तोच साक्षात् यमाचा नियंता आहे. ज्याच्या भीतीनें काळहि आपली सत्ता सर्वथा चालवूं शकत नाहीं, ९९ ज्याच्या भीतीनें श्वासोच्छ्वासाच्या क्रियेसाठीं वाराहि नियमितपणानें वहातो, ज्याच्या धाकानें पृथ्वी समुद्राच्या जळांत राहूनहि विरून जात नाहीं, २०० ज्याच्या आज्ञेप्रमाणें सूर्य दिनमान चालवितो, ज्याच्या आज्ञेच्या भीतीनेंच समुद्र

ज्याचे पुरातन आज्ञेमेण । समुद्र आपण रेखा नुल्लंघी ॥ १ ॥ ज्यातें सदा गायिलें वेदीं । जो वाखाणिजे उपनिषदीं । त्याची पवित्र कीर्ति दुर्बुद्धी । स्वयें त्रिशुद्धी नायकती कानीं ॥ २ ॥ ज्याचें नाम स्मरतां जाण । सकळ दोषां निर्दळण । त्याचे कृतांत वंदी चरण । जन्ममरण विभांडी ॥ ३ ॥ ज्याची कथा कर्णपुटीं । पडतां विकल्पांचिया कोटी । निर्दळूनि उठाउठी । पडे मिठी परब्रह्मीं ॥ ४ ॥ यापरी जो पवित्र मूर्ती । ज्यालागीं वेद सदा वर्णिती । अभाग्य नायकती त्याची कीर्ती । वार्ता करिती मनोरथांच्या ॥ ५ ॥ अस्वल आपुलिया गुणगुणा । नायके वाजल्या निशाणा । तेवीं नायकोनि हरीच्या गुणा । विषयासंभाषणा आदरें करिती ॥ ६ ॥ यालागीं ते अतिमंद । अविनीत सदा स्तब्ध । विषयांलागीं विषयांध । अतिलुब्ध लोलुप्ते ॥ ७ ॥

लोके व्यवायामिषमद्यसेवा नित्यास्तु जंतोर्न हि तत्र चोदना ।
व्यवस्थितिस्तेषु विवाहयज्ञसुराग्रहैरासु निवृत्तिरिष्टा ॥ ११ ॥

वेदें न करितां प्रेरणा । विषयांवरी सहज वासना । स्वभावें सकळ जनां । सदा जाण सर्वांसी ॥ ८ ॥ मांससेवना मद्यपाना । मिथुनीभूत मैथुना । ये अर्थीं सर्व जनां । तीव्र वासना सर्वदा ॥ ९ ॥ तेथें सेव्यासेव्यपरवडी । विवंचना कोण निवडी । लागली विषयांची गोडी । ते अनर्थकोडी करतील

आपली मर्यादा उल्लंघीत नाहीं, १ ज्याचें वेदानें सर्वदा गान केलें आहे, ज्याला उपनिषदें वाखाणितात, त्याची पवित्र कीर्ति हे दुर्जन स्वतः कानांनीं नुस्ती ऐकतहि नाहींत. २ ज्याच्या नांवाचें स्मरण केलें असतां सर्व दोषांचें निर्मूलन होतें, ज्याच्या चरणाला कृतान्तकाळ वंदन करितो व भक्ताच्या जन्म-मरणांचें निवारण करितो, ३ ज्याची कथा कानांवर पडतांच कोट्यवधि विकल्प तत्काल जागच्याजागीं नाहींसे होऊन परब्रह्माची प्राप्ति होते, ४ याप्रमाणें जो पवित्रमूर्ति, वेद ज्याचें सर्वदा वर्णन करितात त्याची कीर्ति ते अभागी ऐकत नाहींत आणि मनोरथांच्या गोष्टी बोलतात. ५ अस्वल ज्याप्रमाणें आपल्या गुरगुरण्यामध्यें भेरी-नगाऱ्यांचा आवाजहि ऐकत नाहीं, त्याप्रमाणें हे दुर्जन हरीचे गुण ऐकत नाहींत व विषयांच्या वार्ता मात्र आदरानें करितात. ६ म्हणूनच ते अतिमंद, अशिक्षित, नेहमीं दुरभिमानी, विषयांध पण अतिलोलुप असतात. २०७.

—अहोपण, स्त्रीसंभोग, मद्य-मांसभक्षण इत्यादिकांविषयींहि 'ऋतौ भार्यां उपेयात्'—ऋतुकाळीं भार्यागमन करावें, 'हुतशेषं भक्षयेत्'—हवनीय द्रव्याचा शेष भक्षण करावा, इत्यादि विधि आहेत. मग असें असतांना त्यांची निंदा कां केली जाते? असें कोणी म्हणेल म्हणून मुनि त्या विधींची व्यवस्था सांगतो—

लोके तु जंतोः—पण या सृष्टींतील प्रत्येक प्राणिमात्राला, व्यवायामिषमद्यसेवाः नित्याः—स्त्रीसंग, मांसभक्षण व मद्यसेवन स्वभावतःच नित्यप्राप्त आहे, हि तत्र चोदना न—म्हणून त्याविषयीं विधि नाहीं. (पण आम्हीं त्याविषयींचे विधि वर दाखविले आहेत, म्हणून म्हणाल तर तें खरें आहे. परंतु तो अपूर्व विधि नव्हे, कारण तो स्वाभाविक आसक्तीनेंच प्राप्त आहे म्हणून नियम विधिरूपानें विषयासक्त जीवांना नुस्ती अनुज्ञा दिलेली आहे. हेंच आतां मुनि श्लोकाच्या उत्तरार्धानें सांगतो—) तेषु विवाह—यज्ञ—सुराग्रहैः व्यवस्थितिः—त्यांविषयीं विवाह, यज्ञ आणि सुराग्रह यांनीं नियम केला जातो. (विवाहविषयांमध्येंच व्यवाय करावा, यज्ञांतच मांसाशन करावें, श्रुतिप्रामाण्यामुळें सौत्रामणियज्ञांतच मद्यसेवन करावें असा नियम केला आहे. अहोपण, नियमपक्षींहि त्यांना आवश्यकत्व आहे, त्यामुळें त्यांची निंदा युक्त नाहीं, असें कोणी म्हणेल म्हणून मुनि म्हणतो—) आसु निवृत्तिः इष्टा—त्याविषयीं निवृत्तिच इष्ट आहे. [हा नियमविधि पण नव्हे, कारण व्यवायादिक नित्यप्राप्त आहेत. म्हणून निवृत्ति म्ह० हा परिसंख्यविधीच आहे. व्यवाय, आमिष व मद्यसेवा यांमध्यें निवृत्तिच इष्ट आहे.] ११.

विषयांवर सहज वासना जाणें हा सर्व लोकांचा नित्य स्वभावच आहे. वेदाला त्याची प्रेरणा करावी लागत नाहीं. ८ मांसाशन, मद्यपान, स्त्रीसंग, यांची सर्वांना नेहमीं तीव्र वासना असते. ९ तेव्हां सेव्य काय व असेव्य काय याचा विचार कोण करितो? एकदां विषयांची गोडी लागली म्हणजे ते असंख्य अनर्थ करितात. १० कापसाला आग लागली म्हणजे

॥ २१० ॥ आगी लागलिया कापुसा । विझवितां न विझे जैसा । तेवी विषयवंता मानसा । विवेकु सहसा उपजेना ॥ ११ ॥ झाल्या लोलिंगता बाडिशा । निजमरण विसरे मासा । कां मुठी चणियांच्या आशा । नळीमाजीं आपैसा वानरू अडके ॥ १२ ॥ दूध मिळालिया मांजर । न म्हणे द्विज अंत्यजघर । तेवीं विषयउन्मत्त नर । न करिती विचार सेव्यासेव्य ॥ १३ ॥ कां खवळल्या विषयचाडें । योनिसंकरू घडेल पुढें । यालागीं वेदें चोखडें । वर्णाश्रमपाडें विभाग केले ॥ १४ ॥ जैसें अफाट पृथ्वीचें अंग । तेथें सप्तद्वीपें करूनि विभाग । मग भिन्नाधिकारें चांग । धरा सांग आक्रमिली ॥ १५ ॥ कां अनावृत मेघजळा । धरणें धरूनि घालिजे तळां । मग नेमेंचि ढाळेंढाळां । पिकालागीं जळा काढिजे पाट ॥ १६ ॥ आणि पवना नादाकारा । साधूनि कीजे वाजंतरा । मग जेवीं नाना ध्वनीं मधुरा । वाजविजे यंत्रा सप्तम स्वरें ॥ १७ ॥ तैसें उच्छृंखळां विषयांसी । वेदें नेमिलें नेमेंसीं । तेचि वेदाज्ञा ऐसी । ऐक तुजपासीं सांगेन ॥ १८ ॥ आवरावया योनिभ्रष्टां । मैथुनी विवाहप्रतिष्ठा । लावूनियां निजनिष्ठा । वर्ण वरिष्ठा नेमिले ॥ १९ ॥ ब्राह्मण जातां रजकीपासीं । ते तंव कडू न लगे त्यासी । रजक जातां ब्राह्मणीपाशीं । तिखट त्यासी ते न लगे ॥ २२० ॥ भलती स्त्री भलता नर । मैथुनीं होय वर्णसंकर । चुकवावया प्रकार । विवाहनिर्धार नेमिला वेदें ॥ २१ ॥ धर्मपत्निपाणिग्रहण । विवाह नेमिला सवर्ण । तेथें सप्तम पंचम त्यजून । स्वगोत्रीं लग्न करूं नये ॥ २२ ॥ तीन्ही वेद तीन्ही वर्ण । वेदें सांडूनियां जाण । सवेद आणि सवर्ण । पाणिग्रहण नेमिलें ॥ २३ ॥ कन्या सवेद सवर्ण । जीसी नाहीं रजोदर्शन । तेही पित्यापासीं याचून । करावें लग्न विधानोक्त ॥ २४ ॥ धर्मअर्थकामाचरण । अन्यत्र न करावें आपण । ऐसी वाहूनियां आण । पाणिग्रहण वेदोक्त ॥ २५ ॥ करितां वधूवरां पाणिग्रहण । साक्षी द्विज देव हुताशन । इतर स्त्रिया माते-

---

ती विझता विझत नाहीं. त्याप्रमाणें विषययुक्त झालेल्या मनांत विवेक बहुतकरून उत्पन्न होत नाहीं. ११ गळाच्या आमिषाचा लोभ उत्पन्न झाला म्हणजे मासा जसा आपलें त्यांत मरण आहे हें विसरतो, किंवा मूठभर चण्याच्या आशेनें वानर जसा नळीमध्यें आपोआप अडकतो, १२ किंवा दूध दिल्यावर मांजर जसें हें घर द्विजांचें आहे कीं अंत्यजाचें आहे हें पहात बसत नाहीं. १३ त्याप्रमाणें विषयांनीं उन्मत्त झालेले पुरुष सेव्य-असेव्याचा विचार करीत नाहींत. विषयवासना खवळल्यावर पुढें वर्णसंकर घडेल या धास्तीनें वेदानें ब्राह्मणादि वर्ण व ब्रह्मचर्यादि आश्रम असे विभाग केले. १४ पृथ्वीचा पृष्ठभाग अफाट आहे, पण त्याचा सात द्वीपांच्या योगानें विभाग करून भिन्न भिन्न अधिकारानें तिचें सर्वत्र आक्रमण केलें आहे. १५ अस्ताव्यस्त पसरलेल्या मेघजलाला युक्तीनें एका तळ्यांत सांठवून मग पाट काढून तें शेतामध्यें नेलें जातें. १६ शब्दाकार वायूला एका वाद्यामध्यें सांठवून मग तें सप्तस्वरांनीं मधुर ध्वनीनें जसें वाजविलें जातें, १७ त्याप्रमाणें अशा या उच्छृंखल विषयांना आळा घालण्यासाठीं वेदानें नियम केले; तीच वेदाज्ञा तुला सांगतों, ऐक. १८ कामुकांना आवरण्यासाठीं विवाहाचें बंधन घातलें आणि प्रत्येकाला मर्यादा घालून देऊन वर्णाचें श्रेष्ठत्व स्थापन केलें. १९ ब्राह्मणाला रजकस्त्री कडु लागत नाहीं व रजकाला ब्राह्मणस्त्री कांहीं तिखट लागत नाहीं; २२० पण भिन्न भिन्न जातींच्या स्त्रीपुरुषांपासून वर्णसंकर होतो. तो टाळण्यासाठीं वेदानें विवाहाचा निर्बंध घातला. २१ आपल्या वर्णाच्याच स्त्रीचें पाणिग्रहण करून तिला धर्मपत्नी करितां येते. परंतु सात व पांच पिढ्यांपर्यंत स्वगोत्रांत लग्नें करूं नयेत. २२ तीन वर्ण आहेत व तीन वेद आहेत; त्यांना सोडून विवाह करूं नये. तर स्व-स्व-वर्णांत स्व-स्व-वेदांत पाणिग्रहण नियत केलें आहे. २३ आपल्याच वेदाची व आपल्याच वर्णाची रजोदर्शन न झालेली कन्या पाहून व तिचीहि पित्यापाशीं याचना करून यथाविधि तिच्याशीं लग्न करावें. २४ अन्य स्त्रीपाशीं धर्म, अर्थ व काम आचरणार नाहीं अशी शपथ वाहून वेदोक्त पाणिग्रहण करावें. २५ वधुवरांचें पाणिग्रहण होत असतां

समान । स्वदारागमन नेमिलें वेदें ॥ २६ ॥ एवं नेमूनियां विवाहासीं । वेदरायें दिली आज्ञा ऐसी । सांडूनि सकळ स्त्रियांसी । स्वदारेंसी मैथुन ॥ २७ ॥ दिवा मैथुन नाहीं स्त्रियेसी । रात्रीं त्यजूनि पूर्वापर प्रहरांसी । मैथुन स्त्रियेपासीं । मध्यरात्रीसी नेमस्त ॥ २८ ॥ नेमिलें स्वदारामैथुन । तेंही अहोरात्र नाहीं जाण । प्रजार्थ स्त्रीसेवन । ऋतुकाळीं गमन नेमस्त ॥ २९ ॥ ऋतुकाळीं ज्यां स्त्रीगमन । ते पुरुष ब्रह्मचारी पूर्ण । वेदनिवृत्तिपर जाण । त्यागरूपें आपण भोगातें नेमी ॥ २३० ॥ 'आत्मा वै पुत्रनामासि' । पुत्र झालिया स्त्रियेसी । संग करूं नये स्त्रीपासीं । शनैःशनैः विषयांसी त्यागवी वेद ॥ ३१ ॥ सेवावया आमिषा । वेदें नेमु केला कैसा । न घडावया पशुहिंसा । संकटआयासा स्वयें द्योती ॥ ३२ ॥ आवडीं खावया मांसा । अथवा स्वर्गाचिया आशा । जे करिती पशुहिंसा । तयां पुरुषां अधःपतन ॥ ३३ ॥ निष्काम कर्मीं पशुहिंसा । करी तरी तो निष्काम कैसा । तेथ निगमाचा नेमु ऐसा । मुख्य अहिंसा सर्व धर्मीं ॥ ३४ ॥ नित्य न करावया मांसभक्षण । यज्ञीं पुरोडाशसेवन । तेंही परिमित जाण । स्वेच्छामांसादन वारिलें वेदें ॥ ३५ ॥ याग करूनि सौत्रामणी । प्रवर्तावें सुरापानीं । हे वेदाज्ञा जो सत्य मानी । तो स्वधर्माचरणीं नागवला ॥ ३६ ॥ जे कर्मीं मद्यमान घडे । तो स्वधर्म म्हणतां जीभ झडे । लोलुपते भुलले बापुडे । वेद विषयांकडे वोढिती ॥ ३७ ॥ यागु करितां सौत्रामणी । स्वयें न व्हावें मद्यपानी । तें यज्ञशेष अवघ्राणीं । परी सर्वथा वदनीं घालूं नये ॥ ३८ ॥ हें विषयांचें त्रिविध विंदान । मैथुन मांसभक्षण सुरापान । यदर्थीं निवृत्तीचि प्रमाण । हें मनोगत पूर्ण वेदाचें ॥ ३९ ॥ विषयांपासूनि निवृत्ती । वेद विभागें हेंचि द्योती । परी धरावी विषयासक्ती । हे वेदोक्ती सर्वथा न घडे ॥ २४० ॥ वेंचोनियां निजधन । करोनियां विवाह यज्ञ । सेवावें मद्य मांस मैथुन । हें वेदवचन कदा न घडे ॥ ४१ ॥

अग्नि, देव, द्विज हे साक्षी असतात. इतर स्त्रिया मातेसमान मानण्याची आज्ञा करून वेदानें स्वस्त्रीगमन सांगितलें आहे. २६ याप्रमाणें विवाहाचा नियम निश्चित करून वेदरायानें स्वस्त्रीव्यतिरिक्त सर्व स्त्रियांपासून दूर रहाण्याची आज्ञा केली. २७ दिवसा स्त्रीसंग करूं नये. पहिला व चवथा प्रहर सोडून मध्यरात्रीची वेळ वेदानें नेमून दिली आहे. २८ स्वस्त्रीसंगाची जरी वेदानें आज्ञा दिली आहे, तरी तोहि रात्रंदिवस नित्य करूं नये. संततीसाठीं केवळ ऋतुकाळींच तेवढा करावा. २९ कारण अशा रीतीनें फक्त ऋतुकाळींच तेवढा स्त्रीसंग करणारे पुरुष पूर्ण ब्रह्मचारीच होत. वेद हा निवृत्तिपर आहे. त्यानें त्यागरूपानें भोगाला नियत केलें आहे. २३० 'आत्माच पुत्र आहे' असें श्रुतिवचन आहे. एकदां पुत्र झाला कीं मग त्या स्त्रीशीं संग नसावा. याप्रमाणें वेद विषयांपासून हळू हळू सोडवितो. ३१ पशुहिंसा न घडतां मांससेवन करण्यासाठीं वेदानें कसा नियम केला आहे पहा! मांस खाण्याची स्वभावतःच आवड असते. तिची निवृत्ति करण्यासाठीं वेदानें कष्टकर यज्ञ सांगितले आहेत. ३२ मांसभक्षणाच्या आवडीनें किंवा स्वर्गाच्या आवडीनें जे पशुहिंसा करितात त्या पुरुषांचा अधःपात होतो. ३३ जो कर्मांत पशुहिंसा करितो तो निष्काम कसा! सर्व धर्मांमध्यें अहिंसा हा मुख्य धर्म आहे, असा वेदानें नियम केला आहे. ३४ रोज मांसभक्षण करूं नये म्हणून त्यानें यज्ञांत पुरोडाशसेवन सांगितलें आहे. पण तेंहि यज्ञशेषभक्षण परिमित असावें, असें सांगून त्यानें यथेष्ट मांसभक्षणाचा निषेध केला आहे. ३५ सौत्रामणीयाग करून सुरापानांत प्रवृत्त व्हावें, ही वेदाज्ञा जो सत्य मानितो तो स्वधर्माचरणापासून च्युत झाला असें समजावें. ३६ ज्या कर्मांत मद्यपान घडते तो स्वधर्म आहे, असें म्हटल्यास जीभ झडते. बिचारे विषयलोलुपतेनें मूढ झालेले लोक वेदालाहि विषयाकडे ओढितात. ३७ सौत्रामणीयाग केला असतांहि स्वतः मद्यपान करूं नये. यज्ञशेषभूत मद्य हुंगावें. तोंडांत कधींहि घालूं नये. ३८ व्यवाय, मांसभक्षण व सुरापान हें विषयांचें त्रिविध कपट आहे; म्हणून त्याची निवृत्ति करावी असा वेदाचा पूर्ण आशय आहे. ३९ वेद आपल्या नियमानें हाच आपला अभिप्राय व्यक्त करितो. विषयासक्ति धरावी असें वेद कधींहि सांगणार नाहीं. २४० आपलें धन खर्चून विवाह व यज्ञ करावे आणि स्त्रीसंग, मद्य-मांस यांचें सेवन करावें असें वेदाचें विधान प्राधान्यानें केंव्हांहि संभवत नाहीं. २४१

धनं च धर्मैकफलं यतो वै ज्ञानं सविज्ञानमनुप्रशान्ति ।
गृहेषु युञ्जन्ति कलेवरस्य मृत्युं न पश्यन्ति दुरन्तवीर्यम् ॥ १२ ॥

नायकोनि भगवत्कथा । ज्ञानाभिमानी नाडले तत्वतां । धनें परमार्थ यावा हाता । तोही स्वधर्मता न लाविती धर्मीं ॥४२॥ विषयांचिया कामना । सर्वस्वें वेंचितां धना । तेंचि धर्मार्थ वेंचितां जाणा । सांडिती प्राणा कवडीसाठीं ॥ ४३ ॥ जया धनाचेनि पांगें । हा धर्मचि आलासे निजांगें । जेवीं पायाळाचेनि योगें । महानिधि वेगें आतुडे हातीं ॥ ४४ ॥ बीज तेथें द्रुम फळ । चंदन तेथें परिमळ । जळाचे ठायीं केवळ । नांदती सकळ रसस्वाद ॥ ४५ ॥ देह तेथ असे कर्म । रूप तेथ वसे नाम । धन तेथ उत्तमोत्तम । सकळ धर्म सदा वसती ॥ ४६ ॥ जेवीं एकादशीव्रतयोगें । जागरीं गीतनृत्यपांगें । तुष्टला देवो लागवेगें । आतुडे धनयोगें निजभक्तां करीं ॥ ४७ ॥ तेवीं धनाचिया पाठोवाठीं । परम धर्मासी पडे गांठी । धर्म तेथ उठाउठी । ज्ञानाची भेटी विज्ञानेंसीं ॥ ४८ ॥ चंद्रास्तव वाढती कळा । जीवनास्तव जिव्हाळा । तेवीं धनास्तव सोज्ज्वळा । धर्माचा सोहळा धार्मिकां घरीं ॥ ४९ ॥ धर्म तेथ शुद्ध ज्ञान । ज्ञान तेथ विज्ञान । विज्ञान तेथ समाधान । शांति संपूर्ण नांदे तेथ ॥ २५० ॥ एवढें फळ ज्या धनापासीं । मूर्ख वेंचिती विषयांसी । देहलोभें भुलली पिसीं । अंगींच्या मृत्यूसी विसरले ॥ ५१ ॥ जळते घरीं ठेवा ठेवणें । मरत्या देहा सुरवाड करणें । तो नागवला वेदु म्हणे । तें वेदाचें बोलणें

—याप्रमाणें प्राकृतजन विषयाचिंतनानें व्याकुल झाल्यामुळें अत्यंत अभीष्ट असलेल्या आत्म्याचेंहि श्रवण करीत नाहींत असें सांगितलें. आतां धर्मद्वारां परमात्म्याची प्राप्ति करून देणाऱ्या धनाचाहि ऐहिक विषयोगाकडे विनियोग केला जात असल्यामुळें त्यांना आत्मज्ञानाचा गंधहि नसतो असें सांगतात—

यतः सविज्ञानं ज्ञानं—ज्याच्यापासून परोक्षज्ञानासह दृढ अपरोक्ष ज्ञान होतें, अनुप्रशान्ति—आणि ज्ञानानंतर लागलीच निर्वाणरूप श्रेष्ठ शांति प्राप्त होते, तत् धनं च धर्मैकफलं—त्या धनाचें धर्म हेंच एक फल आहे. परंतु, गृहेषु युञ्जन्ति—ते त्या धनाचा देहादिकांसाठींच गृहाकडे विनियोग करितात. कलेवरस्य दुरन्तवीर्यं मृत्युं न पश्यन्ति—पण शरीराच्या अतिबलाढ्य अनिवार्य नाशाला पहात नाहींत. [धनाचें हेंच एक फल आहे. कारण धनानें दानादिकांच्याद्वारां धर्मोत्पत्ति होते. त्यामुळें अपरोक्ष ज्ञान होतें. त्याच्या मागोमाग निर्वाणाख्य श्रेष्ठ शांति मिळते, पण हे प्राकृत जन अशा परमफलदायक धनाचाहि विषयोपभोगाकडे विनियोग करितात. पण ज्या शरीराच्या सुखासाठीं ते असा धनाचा अपव्यय करितात त्या शरीराला अपरिहार्य मृत्यु गांठणार आहे, याचा विचार करीत नाहींत.] १२.

भगवत्कथा न ऐकतां ज्ञानाभिमानानें ते खरोखर नागविले गेले आहेत, परमार्थासाठींच असलेल्या धनाचाहि स्वधर्मानुसार परमार्थाकडे व्यय करीत नाहींत. ४२ पण विषयोपभोगासाठींच सढळपणानें खर्च करितात, धर्मासाठीं एक कवडीहि खर्च करावयाचा झाल्यास त्यांचा प्राण कासावीस होतो. ४३ पायाळू मनुष्याच्या योगानें मोठा निधीच अकस्मात् हातीं लागावा, त्याप्रमाणें धनाच्या मिषानें धर्मच प्रत्यक्ष त्यांच्यापाशीं आलेला असतो. ४४ जेथें बीज तेथेंच वृक्ष आणि फळ, जेथें चंदन तेथेंच सुगंध, जेथें जल तेथेंच सर्व रसास्वाद नांदतो. ४५ जेथें देह तेथें कर्म, जेथें रूप तेथेंच नाम आणि तसेंच जेथें धन तेथेंच सर्व उत्तमोत्तम धर्म सदा राहात असतो. ४६ एकादशीव्रताच्या निमित्तानेंच नृत्यगीत करीत जाग्रण केलें असतां देव तत्काळ संतुष्ट होतो व धनाच्या मिषानें स्वभक्तांच्या हातीं सांपडतो. ४७ धनाच्या मागोमाग परधर्माची गांठ पडते. आणि जेथें धर्म तेथें परोक्षज्ञानासह अपरोक्षज्ञान प्राप्त होतें.४८ चंद्राच्या अस्तित्वामुळें जशा त्याच्या कला वाढतात व जीवनामुळें जिव्हाळा वाढतो, त्याचप्रमाणें धनामुळें धार्मिकांच्या घरीं धनाचा उत्तम सोहळा होतो. ४९ जेथें धर्म तेथें शुद्ध ज्ञान, जेथें ज्ञान तेथें विज्ञान, जेथें विज्ञान तेथें समाधान आणि जेथें समाधान तेथेंच पूर्ण शान्ति वास करिते. २५० एवढें थोरलें फल ज्या धनाजवळ आहे, त्याचा मूर्खलोक विषयांकडे अपव्यय करितात. पण देहाच्या लोभानें ते वेडे होतात व मृत्यूला विसरतात. ५१ जळत्या घरांत जो द्रव्याचा सांठा ठेवितो व मरणोन्मुख देहाचें जो चोंचले करून त्याला जपतो तो खरोखरच नागवला, असें वेद

नायके कोणी ॥ ५२ ॥ उपजलेनि दिवसदिवसें । देहातें काळु ग्रासीतसे । हें नीच नवें मरण कैसें । देहलोभवशें विसरले ॥ ५३ ॥ ज्याचे त्या देखतां कैसा । काळु गिळी बाळवयसा । मग तारुण्याची दशा । मुरडूनि घसा ग्रासी काळ ॥ ५४ ॥ गिळोनियां तारुण्यपण । आणि वार्धक्यें कंपायमान । ऐसें काळाचें विंदान । दुर्धर पूर्ण ब्रह्मादिकां ॥ ५५ ॥ जयाचेनि चपेटघातें । मरण आणी अमरांतें । मा मूर्ख तेथें जीवितातें । अक्षय चित्तें दृढ मानिती ॥ ५६ ॥ मूळीं देहचि तंव अनित्य । मग तेथींचे भोग काय शाश्वत । परी धन वेंचूनि विषयार्थ । भुलले जाणा भ्रांत स्त्रीलोभें ॥ ५७ ॥ ऐसे नश्वर भोग जगीं । ते भोगावया रिघावें स्वर्गीं । तदर्थ प्रवर्तती यागीं । लागवेगीं भोगेच्छा ॥ ५८ ॥ सुख भोगावया वेगीं । पतंगु जेवीं उडी घाली आगीं । तेवीं इहामुत्रभोगीं । पतनालागीं पावती ॥ ५९ ॥ स्त्री आमिष मद्यपान । हे वेदोक्त भोग जाण । तेथ केवीं घडे पतन । तें वेदविधान नेणती मूर्ख ॥ २६० ॥

यद् घ्राणभक्षो विहितः सुरायास्तथा पशोरालभनं न हिंसा ।
एवं व्यवायः प्रजया न रत्या इमं विशुद्धं न विदुः स्वधर्मम् ॥ १३ ॥

वेदविहित कर्माचरण । तेथ सर्वथा नव्हे पतन । जेथ चुके वेदविधान । तेथें पावे पतन सज्ञान ॥ ६१ ॥ वेदींच्या अर्थवादासरिशा । मनीं बांधोनि भोगाशा । यज्ञमिषें पशुहिंसा । भोगलिप्सा करूं

म्हणतो. पण तें वेदाचें सांगणें ऐकतो कोण! ५२ जन्मल्या दिवसापासून काळ नित्य देहाला ग्राशीत असतो, पण लोक देहलोभानें आपलें हें नित्य नवें मरणहि कसें विसरतात! ५३ अहो, पहातां पहातां हा काळ बाल्यावस्थेला गिळून टाकितो, मग तारुण्य प्राप्त होतें; पण काळ त्याचीहि मान मुरगुळून, ५४ त्याला खाऊन टाकितो. मग वार्धक्यानें शरीर कांपूं लागतें. ही काळाची करणी ब्रह्मादिकांसहि दुर्धर आहे. ५५ ज्यानें एक चापटी मारतांच अमर देवांनाहि मरण येतें, म्ह० ज्याच्या एका चापटीनें अमर असलेले देवहि मरतात, तेथें हे मूर्ख आपल्या जीविताला निश्चयानें अक्षय मानितात! ५६ अगोदर देहच अनित्य, मग त्यांतील भोग शाश्वत कसे असणार! पण विषयांना भुललेले हे मूढ स्त्रीलोभानें आपलें धन वेंचितात. ५७ जगांतील सर्व भोग नश्वर आहेत. तथापि ते भोगण्यासाठीं आपण स्वर्गलोकीं जावें म्हणून यज्ञ करावयास प्रवृत्त होतात. ५८ सुख भोगण्यासाठीं पतंग जसा आगींत उडी घालितो, त्याप्रमाणें ऐहिक व पारलौकिक सुखासाठीं हे आपला अधःपात करून घेतात. ५९ स्त्री, मांस व मद्यपान हे वेदोक्त भोग आहेत. तेव्हां त्यामुळें पतन कसें होणार! असें जे समजतात त्या मूर्खांना वेदविधान कळत नाहीं. २६०.

—शिवाय पूर्वोक्त नियमानेंहि वेदानें स्त्रीसंगादिकांची जी अनुज्ञा दिली आहे ती यथेष्ट आचरणासाठीं नव्हे, तर तिचा आशय निराळाच आहे असें आतां सांगतात—

यत्—कारण, सुरायाः घ्राणभक्षः विहितः—सुरेचें अवघ्राणच विहित आहे. प्राशन विहित नाहीं. तथा—त्याचप्रमाणें, पशोःआलभनं—पशूचें आलभन विहित आहे. न हिंसा—हिंसा विहित नाहीं. एवं व्यवायः प्रजया—याप्रमाणें स्त्रीसंग प्रजेसाठीं, न रत्यै—रतीसाठीं नव्हे. इमं विशुद्धं स्वधर्मं न विदुः—हा अतिशुद्ध स्वधर्म ते जाणत नाहीं. [मद्याचें अवघ्राण वेदानें सांगितलें आहे. सौत्रामणियागांतहि मद्यपान सांगितलेलें नाहीं. देवतेला उद्देशून जें पशुहनन विहित आहे तें आलभन आहे, हिंसा नव्हे. कारण 'वायव्यं श्वेतं आलभेत'—वायुदेवताक श्वेतपशूचें आलभन करावें. जी वेदविहित हिंसा ती हिंसा म्हटली जात नाहीं असें वेदवचन आहे पण मांसभक्षणाच्या उद्देशानें केलें जाणारें जें पशुहनन ती लौकिक हिंसेप्रमाणें हिंसाच होय. वेदांत आलभनच विहित आहे, पण हिंसा विहित नाहीं. त्यामुळें ती यथेष्ट मांसभक्षणाची अनुज्ञा नव्हे. तसाच स्त्रीसंगहि प्रजेच्या निमित्तानें विहित आहे, रतीसाठीं नाहीं. यास्तव पूर्वोक्त मनोरथवादी या अतिशुद्ध स्वधर्माला जाणत नाहींत.] १३.

वेदविहित कर्माचरण केल्यास त्यामुळें अधःपतन केव्हांहि होणार नाहीं. पण जेथें वेदविधान चुकतें तेथें वेदज्ञहि पतन पावतो. ६१ ते वेदांतील अर्थवाद ऐकून मनांत भोगाच्या आशा धरितात आणि भोगाच्या आशेनेंच

धांवती ॥ ६२ ॥ वेदें बोलिलें आलभन । त्या नांव म्हणती पशुहनन । हें सकाम मानिती विधान । निष्कामा हनन कदा न घडे ॥ ६३ ॥ निष्कामासी यागयजन । स्वधर्मार्थ करावे यज्ञ । तेथ पशूचें आलभन । सर्वथा हनन करूं नये ॥ ६४ ॥ पशूचें करूं नये हनन । देवतोद्देशें अंगस्पर्शन । या नांव बोलिजे 'आलभन'। हें यज्ञाचरण निष्काम ॥ ६५ ॥ हरिश्चंद्राच्या यागीं । शुनःशेपपशुप्रसंगीं । तेणें घावो लागों नेदितां अंगीं । वेदोक्त प्रयोगीं यज्ञसिद्धी केली ॥ ६६ ॥ वेदोक्तमंत्रभागार्थ । देवांकरवीं करोनि समस्त । आपण झाला निर्मुक्त । हा ऋग्वेदार्थ ब्राह्मणीं ॥ ६७ ॥ यापरी पशुघात । यज्ञीं न लगे निश्चित । तो हरिश्चंद्र यागार्थ । पशुघात निवारी ॥ ६८ ॥ तेथ मीमांसकांचें मत । देवतोद्देशें जो पशुघात । या नांव आलभन म्हणत । स्वर्गफलार्थ आवश्यक ॥ ६९ ॥ केवळ मांसभक्षणार्थ । जे करिती पशुघात । हिंसादोष तेथें प्राप्त । ऐसें बोलती मीमांसक ॥ २७० ॥ देवतोद्देशें पशूंचा घात । तेणें स्वर्गभोग होय प्राप्त । तोही भोगक्षयें क्षया जात । तेणें हिंसा प्राप्त याज्ञिकां ॥ ७१ ॥ याग करितां सौत्रामणी । पुरोडाश घ्यावा अवघ्राणीं । परी प्रवर्तावें सुरापानीं । हें वेदविधानीं असेना ॥ ७२ ॥ एवं जेथें पशुहनन । तें कर्म सदोष पूर्ण । यालागीं तेथ अधःपतन । बोलिलें जाण याज्ञिकांसी ॥ ७३ ॥ वेदें विहिलें पाणिग्रहण । तें प्रजार्थ स्वदारागमन । परी रत्यर्थ नित्य मैथुन । हे वेदाज्ञा जाण असेना ॥ ७४ ॥ मद्यमांसमैथुनप्रसंग । स्वइच्छा न करावया भोग । वेदें द्योतिला विवाह याग । भोगित्यागनियमार्थ ॥ ७५ ॥ नेणोनि ऐसिया शुद्ध कर्मा । यागमिषें अधर्मा । प्रवर्तोनि काम्यकर्म्या । भोगसंभ्रमा भोगिती मूर्ख ॥ ७६ ॥

यज्ञाच्या मिषानें पशुहिंसा करावयास धांवतात. ६२ वेदानें आलभन सांगितलें आहे. त्यालाच हे पशुहनन म्हणतात. सकाम पुरुष त्यालाच विधान समजतात, पण निष्कामाच्या हातून हनन केव्हांच घडत नाहीं. ६३ ते स्वधर्मासाठीं यज्ञयाग करितात व त्यांत पशूचें आलभन करितात. निष्काम पुरुषानें यज्ञयागांत हनन केव्हांहि करूं नये. ६४ देवतेच्या उद्देशानें पशूंच्या अंगाला स्पर्श करावा, हेंच आलभन होय. यालाच निष्काम यज्ञाचरण म्हणतात. ६५ हरिश्चंद्राच्या यज्ञांत शुनःशेपाला पशुस्थानीं नियुक्त केलें होतें. पण त्यानें आपल्या अंगाला शस्त्रांचा घाव लागूं न देतां वेदोक्त प्रयोगानें यज्ञसिद्धि केली. ६६ व वेदोक्त मंत्रांनीं सर्व देवांना त्यांचे भाग घ्यावयास लावून स्वतः मुक्त झाला. हा वेदार्थ ऋग्वेद ब्राह्मणांत आहे. ६७ याप्रमाणें यज्ञांत पशुघात करावा लागत नाहीं. शुनःशेपानें हरिश्चंद्राच्या यागासाठीं पशुघाताचें निवारण केलें. ६८ पण याविषयीं मीमांसकांचें असें मत आहे, 'देवतांच्या उद्देशानें केलेला जो पशुघात त्याला आलभन म्हणतात. स्वर्गफलासाठीं तें आवश्यक आहे. ६९ केवल मांसभक्षणासाठीं जे पशुघात करितात त्यांना हिंसादोष लागतो.' असें मीमांसक बोलतात. २७० पण देवतोद्देशानें पशूचा घात करून जो स्वर्गभोग मिळतो तोहि स्वर्गसुखभोगानें क्षय पावतो. त्यामुळें याज्ञिकाला हिंसादोष लागतो. ७१ सौत्रामणी यज्ञ केला असतां त्यांतील पुरोडाशाचा वास घ्यावा, कारण सुरापानांत प्रवृत्त व्हावें असें वेदविधान नाहीं, ७२ त्याचप्रमाणें ज्या कर्मांत पशुहनन होतें तें कर्म सदोष होय. म्हणूनच याज्ञिकांचें अधःपतन सांगितलें आहे. ७३ वेदानें जें पाणिग्रहणांचें विधान केलें आहे, तेंहि प्रजेसाठीं स्वस्त्रीगमन होय. केवळ रतीसाठीं नित्य विषयासक्त व्हावें अशी वेदाज्ञा नाहीं. ७४ अर्थात् स्वेच्छेनें मद्यादि सेवन करूं नये, हा भोगत्यागार्थ नियम सांगण्यासाठीं वेदानें याग व विवाह सांगितला आहे. ७५ पण अशा शुद्ध कर्माला न जाणून मूर्ख यागाच्या मिषानें अधर्म करावयास प्रवृत्त होतात व त्या काम्यकर्मामुळें भोगसंभ्रमाचा अनुभव घेतात. २७६.

ये त्वनेवंविदोऽसन्तः स्तब्धाः सदभिमानिनः । पशून्द्रुह्यन्ति विस्रब्धाः प्रेत्य खादन्ति ते च तान् ॥१४॥

नेणोनि शुद्ध वेदविधानातें । अतिगर्वाचेनि उद्धतें । आपणियां मानूनि ज्ञाते । अविधी पशूतें घातु करिती ॥ ७७ ॥ केवळ अभिचारमतें । पावोनि सकळ भोगांतें । ऐशिया मानोनि विश्वासातें । स्वेच्छा पशूतें घात करिती ॥ ७८ ॥ अविधी पशूतें वधिती । त्या याज्ञिकांचे देहांतीं । मारिले पशू मारूं येती । झळकत कांती घेऊनियां ॥ ७९ ॥ एवं निमालिया याज्ञिकांसी । भक्षिले पशु भक्षिती त्यांसी । जैसें सेविलें विष प्राणियांसी । ग्रासी प्राणासी समूळ ॥ २८० ॥

द्विषन्तः परकायेषु स्वात्मानं हरिमीश्वरम् । मृतके सानुबन्धेऽस्मिन्बद्धस्नेहाः पतन्त्यधः ॥ १५ ॥

परमात्मा जो श्रीहरी । तो अंतर्यामीं सर्व शरीरीं । तेथ पराचा जो द्वेषु करी । तेणें द्वेषिला हरि निजात्मा ॥ ८१ ॥ परासी जो करी अपघातु । तेणें केला निजात्मघातु । त्यासी सहकुटुंब अधःपातु रौरवांतु ते बुडती ॥ ८२ ॥

ये कैवल्यमसंप्राप्ता ये चातीताश्च मूढताम् । त्रैवर्गिका ह्यक्षणिका आत्मानं घातयन्ति ते ॥ १६ ॥

—याप्रमाणें भगवानापासून पराङ्मुख झालेल्या प्राकृतांच्या बहुदोषत्वाचें सविस्तर वर्णन करून पुढील पांच श्लोकांनीं त्यांच्या निष्ठेचें वर्णन करितात—

ये तु अनेवंविदः असन्तः स्तब्धाः सदभिमानिनः पशून् द्रुह्यन्ति–परंतु जे या असल्या धर्माला जाणत नाहींत, स्वतः असाधु–अभिमानी व आमचें हें म्हणणें खरेंच आहे असा दर्प धारण करणारे निःशंक होत्साते या कर्मानें आमचा मनोरथ सिद्ध होईल असा विश्वास धरून ज्या पशूंचा घात करितात, **ते च तान् प्रेत्य खादन्ति**– ते पशु त्यांना परलोकीं खातात. १४.

ते शुद्ध वेदविधान न जाणतां अति गर्वानें उद्धत होऊन स्वतःला ज्ञानी समजतात व अविधीनें पशूंची हिंसा करितात, ७७ केवळ जारण-मारणादि कर्मांनीं सर्व भोग प्राप्त होतात, असा विश्वास ठेवून स्वेच्छेनें पशूंचा घात करितात. ७८ पण जे याज्ञिक अविधीनें पशुवध करितात त्यांच्या मरणोत्तर ते मारलेले पशु तेजस्वी रूप धारण करून त्यांना मारावयास धांवतात. ७९ ज्याप्रमाणें विष खाल्लें असतां तें समूळ प्राणाला ग्रासतें त्याप्रमाणें याज्ञिकांनीं ज्या पशूंचें मांस भक्षण केलेलें असतें ते पशु त्यांस परलोकीं खातात. २८०.

परकायेषु स्वात्मानं हरिं ईश्वरं द्विषन्तः–दुसऱ्याच्या शरीरांतील स्वात्मभूत हरीचा म्ह० ईश्वराचा अभिचारादि कर्मानें द्वेष करणारे व **अस्मिन् सानुबन्धे मृतके बद्धस्नेहाः अधः पतन्ति**–या पुत्रादिकांसह मरणाऱ्या देहामध्यें अतिशय स्नेह ठेवणारे ते नरकांत पडतात. १५.

परमात्मा श्रीहरि सर्वांच्या देहांत अंतर्यामीरूपानें वास करीत असतो. जे दुसऱ्याचा द्वेष करितात, ते आपला आत्मा जो श्रीहरि त्याचाच द्वेष करितात. ८१ जो दुसऱ्याचा घात करितो तो स्वतःचाच नाश करितो. त्याचा सकुटुंब अधःपात होऊन तो सर्व रौरव नरकांत बुडतात. ८२.

—तत्त्ववेत्त्यांनीं ज्यांच्यावर दया केली आहे असे अज्ञ तरतात, तत्त्वज्ञ तर स्वतःच तरून जातात, पण जे अत्यंत अज्ञहि नाहींत व तत्त्वज्ञहि नाहींत ते मध्यवर्ती लोक पतन पावतात, असें सांगतात—

ये त्रैवर्गिकाः अक्षणिकाः कैवल्यं अप्राप्ताः–जे धर्म, अर्थ व काम यांना प्रधान मानणारे शान्तिक्षणरहित किंवा देहादिक स्थिर आहे असें मानणारें तत्त्वज्ञानाला प्राप्त झालेले नसतात, **ये च मूढतां अतीताः**–पण जे अत्यंत मूढत्वाचें उल्लंघन करून गेलेले असतात, **ते आत्मानं घातयन्ति**– ते आत्म्याचा स्वतःच घात करितात. १६.

सज्ञानी स्वतां तरती । अज्ञानी सज्ञानां शरण येती । तेणें त्यांसी कैवल्यप्राप्ती । त्यांच्या वचनोक्ति विश्वासें ॥ ८३ ॥ जे अज्ञान ना सज्ञान । ज्यांसी केवळ ज्ञानाभिमान । त्यांचें विषयीं लोलुप मन । ते पुरुष जाण आत्मघाती ॥ ८४ ॥ साधावया अर्थ काम । जे करिती अभिचारधर्म । हें त्रैवर्णिक घोर कर्म । आत्मघाती परम ज्याचें त्या ॥ ८५ ॥ देहाचिया गोमटिया । जे करिती अभिचारक्रिया । तेणें कर्में आपआपणियां । मांजिला राया निजघातु ॥ ८६ ॥ जो स्वयें बैसली खांदी तोडी । तो खांदीसहित पडे बुडीं । तेवीं काम्यकर्मांच्या वोढी । क्रियेसी रोकडीं अधःपात ॥ ८७ ॥

एत आत्महनोऽशान्ता अज्ञाने ज्ञानमानिनः । सीदन्त्यकृतकृत्या वै कालध्वस्तमनोरथाः ॥ १७ ॥

कामी क्रोधी अतिअद्भुत । क्रूरकर्मीं जे आसक्त । तिहीं आपआपणा अनहित । निजात्मघात जोडिला ॥ ८८ ॥ स्वयें कर्म करिती अविधी । तेचि म्हणती शुद्ध विधी । अज्ञान तेंचि प्रतिपादी । ज्ञान त्रिशुद्धी म्हणोनियां ॥ ८९ ॥ जे काम्यकर्मीं छळिले । विषयबुद्धीं आकळिले । निजहितासी ठकले । मग अंतरले सद्बुद्धीसीं ॥ २९० ॥ गर्वादिज्वरितमुखें । गोडपणीं कडू ठाके । विषप्राय विषयसुखें । अतिहरिखें सेविती ॥ ९१ ॥ ऐशा विषयालागीं पाहाहो । आप्त मानूनि निजदेहो । रचूनि नाना उपावो । अर्थसंग्रहो स्वयें करिती ॥ ९२ ॥

हित्वात्मायासरचिता गृहापत्यसुहृच्छ्रियः । तमो विशन्त्यनिच्छन्तो वासुदेवपराङ्मुखाः ॥ १८ ॥

मरणेंसीं झटें घेत । श्री मेळविती श्रीमंत । गृह दारा पुत्र वित्त । नाना वस्तुजातसंग्रहो ॥९३॥ ऐसे भोग आयासयुक्त । सांडूनि ज्ञानगर्वी समस्त । ज्ञानाभिमानें नेइजेत । अंधतमांत अतिगर्वें ॥ ९४॥

सज्ञानी स्वतः तरून जातात. अज्ञानी लोक सज्ञानांना शरण येतात व त्यांच्या वचनावर विश्वास ठेवल्यानें त्यांनाहि मोक्षप्राप्ति होते. ८३ परंतु जे अज्ञहि नाहींत, व ज्ञानीहि नाहींत, तर ज्यांना केवल ज्ञानाभिमान मात्र असतो, त्यांचें मन सर्वदा विषयांत आसक्त असतें. ते पुरुष आत्मघातीच जाणावें. ८४ अर्थ व काम साधावयासाठीं जे जारण, मारण उच्चाटणादि कर्में करितात, त्या त्रैवर्णिकांचें तें आत्मघात करणारें घोर कर्म होय. ८५ देहाचे चोच पुरविण्यासाठीं जे अभिचार कर्म करितात त्या कर्मानें, हे राजा, ते स्वतःच्या नाशाला स्वतःच प्रवृत्त होतात. ८६ जसा एखादा मनुष्य झाडाच्या खांदीवर बसून तीच खांदी तोडितो व त्या खांदीसह खालीं पडतो, त्याप्रमाणें काम्यकर्मांच्या आसक्तीनें त्यांचा निश्चयानें अधःपात होतो. २८७.

एते आत्महनः—हे आत्मा नाहींच असें म्हणून त्याचा घात करणारे, **अशान्ताः**—शांत नसलेले, **अज्ञाने ज्ञानमानिनः**—कर्मामध्येंच ज्ञानाची मिथ्या भावना करणारे, **अकृतकृत्याः**—येथील आपलें कर्तव्य न केलेले अर्थात् अकृतकृत्यच राहून **कालध्वस्तमनोरथाः वै**—कालानेंच ज्यांच्या मनोरथाचा विध्वंस केला आहे असे होत्साते, **सीदन्ति**—घोर दुःखांत पडतात. १७.

जे कामी, क्रोधी व अति अद्भुत क्रूर कर्मांमध्यें आसक्त असतात ते आपलेंच आपण अहित करून आत्मघात जोडतात. ८८ स्वतः अशास्त्रीय कर्म करितात व त्याला शुद्ध विधि म्हणतात. अज्ञानालाच निश्चित ज्ञान असें प्रतिपादन करितात. ८९ जें काम्यकर्मांकडून छळले गेलें, ज्यांना काम्यकर्मांनीं फसविलें, विषयबुद्धीनें कवटाळलें, ते स्वहिताला आंचवून सद्बुद्धीलाहि अंतरले आहेत. २९० गर्वादिकांच्या ज्वरानें त्यांच्या तोंडाला गोड वस्तु कडु लागते. पण ते विषयसुखासारख्या विषप्रचुर वस्तूचें मात्र मोठ्या हर्षानें सेवन करितात. ९१ अशा या विषयांसाठीं आपल्या देहाला मोठा हितकर समजून व अनेक उपाय योजून स्वतः धनसंचय करितात. २९२.

वासुदेवपराङ्मुखाः—वासुदेवापासून पराङ्मुख झालेले ते मूढ, **आत्मायासरचिताः**—आत्म्याला अतिशय कष्ट देऊन संपादन केलेले, **गृहापत्यसुहृच्छ्रियः**—गृह, स्त्री, अपत्य, मित्र, संपत्ति इत्यादि विषय टाकून, **अनिच्छतः एव तमः विशन्ति**—इच्छा नसतांनाच अंधतमामध्यें प्रवेश करितात. १८.

मरणाशीं झगडा करीत श्रीमंत धन मिळवितात आणि गृह, स्त्री, पुत्र, धन अशा अनेक वस्तूंचा संग्रह करितात. ९३ पण या सर्व विद्वन्मन्यांना कष्टानें संपादिलेल्याहि भोगापासून सोडवून त्यांचा ज्ञानाभिमान त्यांना घोर अंधकारांत

जेथ अंधाराचे डोळे । होऊनि ठाकती आंधळे । तेथ मोहरात्रीचें काळें । अधतममेळें अधिक कांटे ॥ ९५ ॥ जया अंधारातें प्रकाशूं येतां । निखिळ काळा होय सविता । जेथ गाढ मूढ अवस्था । अति-मौढ्यता स्वयें पावे ॥ ९६ ॥ जेथ सुषुप्तीसी झोंप लागे । आळसू आळसिजे सर्वांगें । तेथ घर बांधोनि निजांगें । निंदा क्रोध दोघे सदा वसती ॥ ९७ ॥ तेथ भजनविमुख नरां । अधःपतन अभिमानद्वारा । जेवीं अथावीं पडिला चिरा । तेवीं बाहेरा निघों न शके ॥ ९८ ॥ जे वासुदेवीं सदा विमुख । ज्यांसी हरिभजनीं नाहीं हरिख । त्यांची दशा हे अधोमुख । अतिदुःखें दुःख भोगिती ॥ ९९ ॥ ऐशी अभक्तांची गती । सांगितली आहाच स्थिति । वांचूनि त्यांची दुर्गती । वाग्देवता भिती स्पष्ट वदतां ॥ ३०० ॥ अभक्तांची गती बोलणें । यापरीस चांग मुकें होणें । प्राण जावो कां सर्व प्राणें । परी ते दोष कोणें बोलावे ॥ १ ॥ राया तुझिया प्रश्नकाजीं । हे दशा बोलणें पडे आजी । येऱ्हवीं अभक्तवादें आम्हांमाजीं । वाचेची पांजी विटाळली नाहीं ॥ २ ॥ यावरी आतां नृपनाथा । वक्ता आणि समस्त श्रोता । रामस्मरणें तत्वतां । वाचेसी प्रायश्चिता सवें कीजे ॥ ३ ॥ ऐकोनि अभक्तांची गती । अतिशयेंसीं दुःखप्राप्ती । राजा कंटाळला चित्तीं । यालागीं निश्चितीं हरिनाम स्मरे ॥ ४ ॥ ज्या स्मरविलें हरीतें । तोचि यासी पुसों येथें । युगायुगीं भक्त त्यातें । कोणें विधीतें भजन करिती ॥ ५ ॥

रा०—कस्मिन्काले स भगवान् किंवर्णः कीदृशो नृभिः । नाम्ना वा केन विधिना पूज्यते तदिहोच्यताम् ॥१९॥

ज्याचेनि स्मरणें तत्त्वतां । कर्माकर्में नुधविती माथा । त्या भगवंताची कथा । माझिया हितालागीं सांगा ॥ ६ ॥ जो परमात्मा श्रीहरी । तो सृष्ट्यादि युगयुगांतरीं । कोणें नामें रूपें

टाकितो. ९४ त्या अंधतमांत अंधाराचे डोळे आंधळे होतात आणि मोहाचा काळोख त्या अंधतमाशीं मिळाल्यामुळें अधिकच भयंकर होतो. ९५ सूर्यहि त्या अंधकाराला प्रकाशित करावयास आला असतां स्वतः काळा ठिक्कर होतो. अशी ती अंधतम अवस्था अति दुस्तर आहे. हे मूढ पामर त्या अवस्थेला प्राप्त होतात. ९६ जेथें सुषुप्तीला झोंप लागते, आळशाच्या सर्व अंगांत आळस भरतो, तेथें निंदा व क्रोध हीं दोन्ही घर बांधून सदा रहातात. ९७ तेथें भजनविमुख पुरुषाचा अभिमानामुळें अधःपात होतो. खोल जागेंत पडलेल्या चिऱ्याप्रमाणें तो बाहेर पडूं शकत नाहीं. ९८ जे वासुदेवापासून सदा विमुख असतात, ज्यांना हरिभजनाची गोडी नसते त्यांची अधोगति होऊन ते अतिशय क्लेश भोगितात. ९९ मीं याप्रमाणें अभक्तांच्या गतीचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें. पण त्यांच्या दुर्गतीचें स्पष्ट वर्णन करण्यास वाग्देवतेलाहि भीति वाढते. ३०० अभक्तांची गति सांगण्यापेक्षां मुकें होणें पत्करलें. प्राण गेला तरी जावो, पण त्यांच्या दोषांचा उच्चार करावयास नको. १ हे राजा, तुझ्या प्रश्नामुळें आज त्यांच्या स्थितीचें वर्णन करावें लागलें. एरवीं आम्ही कधींहि अभक्तांच्या गोष्टी बोलून आमची जीभ विटाळीत नाहीं. २ तेव्हां आतां हे नृपनाथा, वक्ता आणि सर्व श्रोते यांनीं रामनामाचें स्मरण करून वाणीला सत्वर प्रायश्चित्त द्यावें. ३ अभक्तांची ही गति ऐकून राजाला फार दुःख झालें. ती ऐकून तो अगदीं कंटाळला व त्यासाठीं हरिस्मरण करूं लागला. ४ ज्या हरीचें यानें स्मरण करविलें त्याच्याचविषयीं आतां आपण याला विचारूं या. असा विचार करून प्रत्येक युगांत भक्त त्या हरीचें कोणत्या प्रकारें भजन करितात, असें राजा विचारूं लागला. ३०५.

—याप्रमाणें भगवद्भक्तीच करावी असें सिद्ध झालें असतां त्याविषयीं राजा भगवद्भक्तीचाच प्रकार विचारतो —

राजा उवाच—राजा म्हणाला, सः भगवान्—तो भगवान् श्रीहरि, कस्मिन्काले—कोणत्या काळीं, किंवर्णः—कोणत्या वर्णाचा, कीदृशः—कशा प्रकारचा, केन नाम्ना वा विधिना—कोणत्या नांवानें व कोणत्या विधीनें, नृभिः—भक्तांकडून, इह पूज्यते—या लोकीं पूजिला जातो, तत् उच्यताम्—तें आपण मला सांगा. १९.

ज्याचें तत्त्वतः स्मरण केलें असतां कर्म व अकर्म डोकेंहि वर उचलीत नाहींत, त्या भगवंताची कथा माझ्या हितासाठीं सांगा. ६ जो परमात्मा श्रीहरि त्याची सृष्टीच्या आरंभीं युगयुगान्तरीं भक्त कोणत्या नांवानें, कोणत्या

वर्णाकारीं । भक्त कैशापरी पूजिती ॥ ७ ॥ आणि ते काळींच्या प्रजा । कैसेनि यजिती अधोक्षजा । कवणें विधीं करिती पूजा । तें योगिराजा सांगिजे ॥ ८ ॥ तुमचे मुखींचें कृपावचन । त्यापुढें अमृतही गौण । वचनें परमानंद पूर्ण । जन्ममरण उच्छेदी ॥ ९ ॥ त्याहीमाजीं भगवद्गुण । युगानुवर्ती नारायण । त्याचें भजनपूजनविधान । कृपा करूनि सांगिजे स्वामी ॥ ३१० ॥ ऐकोनि रायाचें वचन । संतोषले अवघे जण । जाणोनि हरिगुणांचा प्रश्न । कनिष्ठ करभाजन बोलता जाला ॥ ११ ॥

करभाजन उ०—कृतं त्रेता द्वापरं च कलिरित्येषु केशवः । नानावर्णाभिधाकारो नानैव विधिनेज्यते ॥२०॥

नाना वर्ण नानाकारें । नाना नाम नानेपचारें । कृतत्रेताद्वापरें । भक्त निर्धारें केशव यजिती ॥ १२ ॥ ' क 'कार ब्रह्मा ' व 'कार विष्णु । ' श 'कार स्वयें त्रिनयनु । केशव तो गुणविहीनु । प्रकाशक पूर्ण तिहींचा ॥ १३ ॥ केशव केशव अर्ध मात्रा । नये व्यक्ताव्यक्त उच्चारा । व्याप्येंवीण व्यापकु खरा । सबाह्याभ्यंतरा एकत्वें ॥ १४ ॥ तोचि युगपरत्वें रूप नाम । भजनविधि क्रियाधर्म । भक्त पूजिती पुरुषोत्तम । तो अनुक्रम अवधारीं ॥ १५ ॥

कृते शुक्लश्चतुर्बाहुर्जटिलो वल्कलाम्बरः । कृष्णाजिनोपवीताक्षान् बिभ्रद्दंडकमंडलू ॥ २१ ॥

आकारानें, कोणत्या प्रकारें पूजा करितात ७ आणि त्या काळांतील लोक कशा प्रकारें ईश्वराचें यजन करितात, कोणत्या विधीनें पूजा करितात तें हे योगिवर्या, मला सांगा. ८ तुमच्या वचनापुढें अमृतहि तुच्छ आहे. तुमचें वचन जन्म-मरणाला नाहींसें करितें व पूर्ण परमानंद प्राप्त होतो. ९ आपणासारखे वक्ते आणि ज्याचें वर्णन करावयाचें ते साक्षात् भगवानाचे गुण, मग त्याच्या श्रवणानें जन्म-मरणाचा नाश झाल्यास आश्चर्य कसलें ? नारायण युगाप्रमाणें वागतो. त्याच्या भजनपूजनाचा विधि कृपा करून हे स्वामिराया, मला सांगा. ३१० राजाचें हें वचन ऐकून सर्वांना संतोष झाला व चमसाचा धाकटा भाऊ करभाजन हरिगुणांचा प्रश्न जाणून बोलूं लागला. ३११.

करभाजनः उवाच-करभाजन बोलला,—**कृतं त्रेता द्वापरं च कलिः इति**—कृत, त्रेता, द्वापर व कलि अशीं चार युगें आहेत, **एषु नानावर्णाभिधाकारः केशवः**—त्यांमध्यें नाना वर्ण, नाना नांवें व नाना आकार यांनीं युक्त असलेला केशव, **नाना विधिना एव इज्यते**—नाना प्रकारच्या विधीनेंच—विविध मार्गांनींच पूजिला जातो. २०.

भक्त कृत, त्रेता व द्वापर या युगांत केशवाची नाना वर्ण, नाना आकार, नाना नांवें व विविध उपचार यांनीं पूजा करितात. १२ ' केशव ' या शब्दांतील ' क ' कार म्ह० ब्रह्मा, ' व ' कार म्ह० विष्णु (ईश) ' श ' कार म्ह० साक्षात् त्रिनेत्र शंकर. केशव गुणविहीन व त्या तिहींचा पूर्ण प्रकाशक आहे. १३ अर्धमात्रारूप केशव हेंच सर्व व्यक्ताव्यक्त असून तें अनिर्वाच्य आहे. तो सबाह्य-अभ्यंतर एक असल्यामुळें पूर्ण व्यापक आहे. त्याच्या ठिकाणीं व्याप्यत्व हा धर्म नाहीं. १४ तोच युगपरत्वें भिन्नभिन्न नामरूप धारण करितो. भजनविधि, कर्म व धर्म यांस प्रवृत्त करितो. भक्त त्या पुरुषोत्तमाची पूजा ज्या अनुक्रमानें करितात, तो तूं ऐक. ३१५.

——तेच वर्णादि चतुष्टय सांगतात——

कृते—कृतयुगांत, **शुक्लः**—गोरा, **चतुर्बाहुः**—चतुर्भुज, **जटिलः**—जटाधारी, **वल्कलाम्बरः**—वल्कलें धारण करणारा, **कृष्णाजिनोपवीताक्षान्**—कृष्णाजिन, यज्ञोपवीत, अक्षमाला, **दंडकमंडलू**—दंड व कमंडलू, **बिभ्रत्**—यांस धारण करणारा असा ब्रह्मचारी वेषानें भगवान युक्त असतो. २१.

कृतयुगीं श्वेतवर्णधर । जटिल चतुर्भुज वल्कलांबर । दंडकमंडल्वंकितकर । अजिन ब्रह्मसूत्र अक्षमाला हातीं ॥ १६ ॥ ब्रह्मचर्यें दृढव्रत । ये चिन्हीं चिन्हांकित । परमात्मा मूर्तिमंत । कृतयुगीं भक्त यापरी यजिती ॥ १७ ॥

मनुष्यास्तु तदा शान्ता निर्वैराः सुहृदः समाः । यजन्ति तपसा देवं शमेन च दमेन च ॥ २२ ॥

ते काळींचे सकळ नर । सदा शांत निर्वैर । समताबुद्धि निरंतर । सुहृन्मित्र परस्परें ॥ १८ ॥ तें तपें करावें देवयजन । त्या तपाचें मुख्य लक्षण । शमदम साधूनि संपूर्ण । भगवद्भजन स्वयें करिसी ॥ १९ ॥ तें देवाचें नामोच्चारण । दशधा नामीं नामस्मरण । तेंचि नाम कोण कोण । ऐक सावधान नृपनाथा ॥ ३२० ॥

हंसः सुपर्णो वैकुण्ठो धर्मो योगेश्वरोऽमलः । ईश्वरः पुरुषोऽव्यक्तः परमात्मेति गीयते ॥ २३ ॥

हंस सुपर्ण वैकुंठ । धर्म योगेश्वर श्रेष्ठ । अमल ईश्वर वरिष्ठ । पुरुष अव्यक्त नामपाठ परमात्मा म्हणती ॥ २१ ॥ ते काळींचे भक्त श्रेष्ठ । या नामांचा नामपाठ । गायन करिती घडघडाट । भवसंकट निर्दाळिती ॥ २२ ॥ हें कृतयुगींचें यजन । तुज सांगितलें संपूर्ण । आतां त्रेतायुगींचें भजन । मूर्तीचें ध्यान तें ऐक ॥ २३ ॥

त्रेतायां रक्तवर्णोऽसौ चतुर्बाहुस्त्रिमेखलः । हिरण्यकेशस्त्रय्यात्मा स्रुक्स्रुवाद्युपलक्षणः ॥ २४ ॥

त्रेतीं यज्ञमूर्ति पुरुषोत्तमु । रक्तवर्ण ज्वलनोपमु । पिंगटकेश निर्धूमु । देवदेवोत्तमु चतुर्बाहू ॥ २४ ॥ तया यज्ञपुरुषा निर्मळा । त्रिगुणांची त्रिमेखळा । वेदत्रयीचा पूर्णमेळा । मूर्तीचा सोहळा तदा-

---

कृतयुगांत भक्त गोऱ्या वर्णाचा, जटाधारी, चतुर्भुज, वल्कलें नेसलेला, हातांत दंडकमंडलु घेतलेला, कृष्णाजिन यज्ञोपवीत धारण केलेला, अक्षमाला हातांत असलेला, १६ कडक ब्रह्मचर्याचें पालन केलेला, अशा चिन्हांनीं युक्त असलेल्या परमात्म्याची पूजा करितात. १६–३१७.

तु तदा–आणि त्यावेळीं, मनुष्याः–पुरुष, शांताः निर्वैराः सुहृदः समाः–शान्त, निर्वैर, परस्पर सुहृद व सम असतात, देवं तपसा च शमेन च दमेन च यजन्ति–आणि देवाची ध्यानानें, शमानें व दमानें पूजा करितात. २२.

त्या काळांतील सर्व लोक सदा शांत, निर्वैर, निरंतर समत्वबुद्धि ठेवणारे, परस्परांवर निरपेक्ष स्नेह करणारे, असे असतात. १८ त्या वेळीं तपानें देवपूजन करावें. त्या तपाचें मुख्य लक्षण असे जे शम-दम त्यांना पूर्णपणें साधून भक्त स्वतः भगवद्भजन करितात. १९ हे राजा, ते दहा प्रकारच्या नांवांनीं परमात्म्याचें नामस्मरण करितात. तीं नांवें सावधान चित्तानें ऐक. ३२०.

हंस, सुपर्ण, वैकुण्ठ, धर्म, योगेश्वर, अमल (मुळांत मनु असाहि पाठ आहे), ईश्वर, पुरुष, अव्यक्त, परमात्मा, या नांवांनीं तो बोलला जातो. २३.

त्याला हंस, सुपर्ण, वैकुंठ, धर्म, श्रेष्ठ योगेश्वर, अमल, वरिष्ठ ईश्वर, पुरुष, अव्यक्त आणि परमात्मा असें म्हणतात. २१ त्या काळांतील भक्तश्रेष्ठ या नांवांचा पाठ करून त्याचें उच्च स्वरानें गायन करितात आणि संसारभय नाहींसें करितात. २२ कृतयुगांतील ही आराधना मीं तुला सविस्तर सांगितली. आतां त्रेतायुगांतील भजन आणि मूर्तीचें ध्यान कसें असतें, तें ऐक. ३२३.

त्रेतायां–त्रेतायुगांत, असौ रक्तवर्णः–हा रक्तवर्ण, चतुर्बाहुः–चतुर्भुज, त्रिमेखलः–ज्याची दीक्षांगभूत मेखला तिपेडी आहे असा यज्ञमूर्ति, हिरण्यकेशः–ज्याचे केंस पिंगटवर्ण आहेत असा, त्रय्यात्माः–वेदत्रयरूप, स्रुक्स्रुवाद्युपलक्षणः–स्रुक् स्रुवा इत्यादि ज्याचीं उपलक्षणें आहेत असा. २४.

त्रेतायुगांत यज्ञमूर्ति पुरुषोत्तम, रक्तासारख्या वर्णाचा, धूमरहित अग्नीप्रमाणें, पिंगट केसांचा, चतुर्भुज असा देवाधिदेव असतो. २४ त्या निर्मळ यज्ञपुरुषाला त्रिगुणांची तिपेडी मेखला असते. त्याच्या शरीरावरील लोमांमध्यें

त्मकची ॥ २५ ॥ स्रुक्स्रुवापाणिग्रहण । हेंचि तयाचें उपलक्षण । त्रेतायुगीं नारायण । येणें रूपें जाण निजभक्त ध्याती ॥ २६ ॥

तं तदा मनुजा देवं सर्वदेवमयं हरिम् । यजन्ति विद्यया त्रय्या धर्मिष्ठा ब्रह्मवादिनः ॥ २५ ॥

तैंचे जे मनुष्य जाण । त्रिवेदीं करिती भजन । सर्व देवस्वरूप हरि पूर्ण । यापरी यजन त्रेतायुगीं ॥ २७ ॥ त्रेतायुगीं सर्वही नर । वेदोक्तीं नित्य सादर । सर्वही भजनतत्पर । धर्मिष्ठ धार्मिक जन ॥ २८ ॥ अष्टधा नामीं नामस्मरण । गजरें करिती सदा पठण । तें नामाभिधान । ऐक राया ॥ २९ ॥

विष्णुर्यज्ञः पृश्निगर्भः सर्व देवउरुक्रमः । वृषाकपिर्जयन्तश्च उरुगाय इतीर्यते ॥ २६ ॥

विष्णु यज्ञ पृश्निजन्मा । सर्वदेव उरुक्रमा । वृषाकपि जयंतनामा । उरुगाय परमा नामें स्मरती ॥ ३३० ॥ द्वापारीं भगवद्ध्यान । ते युगींचें पूजाविधान । भक्त कैसें करिती भजन । नामस्मरण तें ऐक ॥ ३१ ॥

द्वापरे भगवान् श्यामः पीतवासा निजायुधः । श्रीवत्सादिभिरङ्कैश्च लक्षणैरुपलक्षितः ॥ २७ ॥

द्वापरीं घनश्यामवर्ण । अतसीपुष्पप्रभासमान । पीतांबरपरिधान । श्रीवत्सचिन्हअंकित ॥ ३२ ॥ शंख चक्र पद्म गदा । चारी भुजा सायुधा । इहीं लक्षणीं गोविंदा । लक्षिती सदा निजभक्त ॥ ३३ ॥

वेदत्रयीचा पूर्ण मेळा रहातो व मूर्तीचा सोहळा तद्रूपच असतो. २५ हातांत स्रुकस्रुवा इत्यादि यज्ञपात्रें धारण करणें हेंच त्याचें उपलक्षण आहे. याप्रमाणें त्रेतायुगांत भक्त नारायणरूपाचें ध्यान करितात. ३२६.

तदा धर्मिष्ठाः ब्रह्मवादिनः मनुजाः–त्यावेळीं धर्मनिष्ठ व वेदवेत्ते पुरुष, तं सर्वदेवमयं हरिं देवं–त्या सर्व देवमय हरिसंज्ञक देवाची, त्रय्या विद्यया–वेदत्रयोक्त कर्मांनीं, यजन्ति–पूजा करितात. २५.

त्या काळांतील लोक तीन वेदांनीं भजन करितात. हरि सर्व देवस्वरूप आहे व त्रेतायुगांतील पूजन हें अशा स्वरूपाचें आहे. २७ त्रेतायुगांत सर्व लोक वेदवचनावर पूर्ण श्रद्धा ठेवणारे, सर्व भजनांत तत्पर व धर्मिष्ठ असतात. २८ ते आठ प्रकारच्या नामस्मरणाचा सदा घोष करितात. हे राजा, तीं नांवें आतां ऐक. ३२९.

तो विष्णुयज्ञ, पृश्निगर्भ, सर्वदेव, उरुक्रम, वृषाकपि, जयन्त व उरुगाय–असें म्हटला जातो. [सुतपा प्रजापतीची पत्नी पृश्नि तिचा पुत्र म्हणून पृश्निगर्भ, स्मरण केला गेलेला तो सर्व कामांचा वर्षाव करितो व क्लेशांना कांपवितो म्हणून वृषाकपि, सर्वदा विजयी होतो म्हणून जयंत.]२६.

विष्णु, यज्ञ, पृश्निजन्मा, सर्वदेव, उरुक्रमा, वृषाकपि, जयंतनामा, आणि उरुगाय या श्रेष्ठ नांवाचें भक्त नित्य स्मरण करितात. ३३० हे राजा, द्वापरयुगांत भक्त भगवानाचें ध्यान, पूजन व भजन कोणत्या प्रकारें करितात, तें आतां ऐक. ३३१.

द्वापरे–द्वापरयुगांत, भगवान् श्यामः–भगवान, नृश्यामवर्णः पीतवासाः–श्यामवर्ण पीतांबरधारी, निजायुधः–शंख, चक्र इत्यादि आपलीं आयुधें धारण करणारा, श्रीवत्सादिभिः अंकैः श्रीवत्सादि चिन्हांनीं, च लक्षणैः उपलक्षितः–व लक्षणांनीं उपलक्षित [श्रीवत्स या नांवाचें वक्षस्थळाच्या दक्षिणभागीं प्रदक्षिणावर्त चिन्ह आहे. आदिशब्दानें हात पाय इत्यादिकां वरील पद्मादि चिन्हें घ्यावीं. अशा चिन्हांनीं व कौस्तुभादि बाह्य चिन्हांनीं युक्त असलेला.] २७.

द्वापरयुगांत भक्त घनश्यामवर्ण, तागाच्या फुलाप्रमाणें कांति असलेला, पीतांबरधारी, श्रीवत्साचिन्हांकित, ३२ चारी हातांत शंख, चक्र, गदा पद्म, हीं आयुधें घेतलेला, या लक्षणांनीं युक्त असलेल्या गोविंदाचें भक्त सदा चिंतन करितात. ३३३.

तं तदा पुरुषं मर्त्या महाराजोपलक्षणम् । यजन्ति वेदतंत्राभ्यां परं जिज्ञासवो नृप ॥ २८ ॥

शशांकछत्र आणि चामर । राजलक्षणीं राजोपचार । यापरी द्वापरींचे नर । अतिसादर पूजेसी ॥ ३४ ॥ शीघ्र पावावया परात्पर । वैदिक तांत्रिक पूजा मिश्र । तत्त्वजिज्ञासु करिती नर । भजनतत्पर या रीतीं ॥ ३५ ॥ ते काळींचें नामस्मरण । जेणें होय कलिमलदहन । त्या नामाचें अभिधान । ऐक सांगेन नृपनाथा ॥ ३६ ॥

नमस्ते वासुदेवाय नमः संकर्षणाय च । प्रद्युम्नायानिरुद्धाय तुभ्यं भगवते नमः ॥२९ ॥

नारायणाय ऋषये पुरुषाय महात्मने । विश्वेश्वराय विश्वाय सर्वभूतात्मने नमः ॥ ३० ॥

वासुदेवा तुज लोटांगण । संकर्षणा तुज नमन । प्रद्युम्ना प्रणाम पूर्ण । अभिवंदन अनिरुद्धा ॥ ३७ ॥

नारायणा ऋषिवरा । महापुरुषा सुरेंद्रा । विश्वरूपा विश्वेश्वरा । महात्म्या श्रीवरा नमन तुज ॥ ३८ ॥ सर्व भूतीं तूं भूतात्मा । तुज नमो पुरुषोत्तमा । द्वापरीं ऐशिया नामा । नृपोत्तमा सदा स्मरती ॥ ३९ ॥ त्या नामाच्या पाठा । तेणें देवासी संतोष मोठा । वेगीं सांडोनि वैकुंठा । धांवे अवचटा कीर्तनामाजीं ॥ ३४० ॥

इति द्वापर उर्वीश स्तुवन्ति जगदीश्वरम् । नानातन्त्रविधानेन कलावपि यथा शृणु ॥ ३१ ॥

यांहीं नामीं स्तुतिस्तवन । द्वापरींचे करिती जन । आतां कलियुगींचें भजन । तंत्रोक्तविधान ऐक राया ॥ ४१ ॥

हे नृप–हे राजा, तदा–त्या युगांत, परं जिज्ञासवः मर्त्याः–परमात्म्याला जाणण्याची इच्छा करणारे मर्त्य, महाराजोपलक्षणं–छत्र-चामरादिकांनीं युक्त अशा, तं पुरुषं–त्या पुरुषाची, वेदतंत्राभ्यां–वैदिक व तांत्रिक मार्गानें, यजन्ति–पूजा करितात. २८.

चंद्राप्रमाणें शुभ्र छत्र व चामर या राजलक्षणांनीं राजोपचार समर्पण करून द्वापरयुगांतील लोक त्याची पूजा करण्यांत तत्पर असतात. परब्रह्माचें स्वरूप जाणण्याची इच्छा करणारे ३४ पुरुष परमात्म्याला सत्वर प्राप्त होण्यासाठीं वैदिक व तांत्रिक या दोन प्रकारच्या मिश्र पूजा करितात. याच रीतीनें ते भजनतत्पर असतात. ३५ त्या काळांतील कलिमलाचा नाश करणारें जें नामस्मरण तें मी तुला सांगतों, हे नृपनाथा ! तूं तें ऐक. ३३६.

—पुढील दोन श्लोकांत त्यांचीं नांवे सांगतात—

ते वासुदेवाय नमः–तुज वासुदेवाला नमस्कार असो. संकर्षणाय च नमः–संकर्षणाला नमस्कार असो. तुभ्यं भगवते प्रद्युम्नाय अनिरुद्धाय नमः–तूं जो भगवान् प्रद्युम्न व अनिरुद्ध त्याला नमस्कार असो. नारायणाय ऋषये–नारायण ऋषीला, महात्मने पुरुषाय–महात्म्या पुरुषाला, विश्वेश्वराय–विश्वेश्वराला, विश्वाला व सर्वभूतात्म्याला नमस्कार असो. २९–३०.

हे वासुदेवा, तुला लोटांगण घालितों. हे संकर्षणा, तुला नमन करितों. हे प्रद्युम्ना, तुला पूर्ण प्रणाम करितों. हे अनिरुद्धा, तुला अभिवादन करितों. ३३७.

हे नारायणा, ऋषिवरा महापुरुषा, सुरेन्द्रा, विश्वरूपा, विश्वेश्वरा, तुला नमस्कार असो. ३८ सर्व भूतांतील तूं भूतात्मा आहेस. हे पुरुषोत्तमा, तुला नमन असो. द्वापरयुगांत अशा रीतीनें भक्त सदा नामस्मरण करितात. ३९ त्या नामपठनानें देवाला फार संतोष होतो व तो वैकुंठ सोडून कीर्तनाकडे धांव घेतो. ३४०.

उर्वीश–हे पृथ्वीपते, इति द्वापरे जगदीश्वरं स्तुवन्ति–याप्रमाणें द्वापरयुगांत जगदीश्वराची स्तुति करितात. कलौ अपि–कलियुगांतहि, नानातंत्रविधानेन–अनेक तंत्रविधानानें, यथा–ज्याप्रकारें पूजा करितात, तो प्रकार तूं ऐक. ३१.

या नांवांनीं द्वापरयुगांतील लोक स्तुति-स्तवन करितात. आतां कलियुगांतील तंत्रोक्तविधि ऐक. ३४१.

कृष्णवर्णं त्विषाकृष्णं साङ्गोपाङ्गास्त्रपार्षदम्। यज्ञैः संकीर्तनप्रायैर्यजन्ति हि सुमेधसः ॥ ३२ ॥

कलियुगीं श्रीकृष्णदेवो । वर्णू कृष्णवर्णप्रभावो । प्रभा इंद्रनीळकीळसमुदावो । मूर्ति तैशी पहा हो शोभायमान ॥ ४२ ॥ मूर्ति सर्वावयवी सांग । वेणुविषाणादि उपांग । चारी भुजा पराक्रमी चांग । आयुधें अव्यंग शंखचक्रादिक ॥ ४३ ॥ पृष्ठभागीं निजपार्षद । नंदसुनंदादि सायुध । कलियुगीं प्रज्ञाप्रबुद्ध । यापरी गोविंद चिंतिती सदा ॥ ४४ ॥ मधुपर्कादिक विधान । सांग केलें जें पूजन । तेंही मानोनियां गौण । आवडे कीर्तन कलियुगीं कृष्णा ॥ ४५ ॥ नवल कैसें राजाधिराजा । कीर्तन तेंचि महापूजा । ऐशी ज्या आवडी अधोक्षजा । कीर्तनें गरुडध्वजा उल्हासु सदा ॥ ४६ ॥ कीर्तन पढियें गोविंदा । यालागीं सन्मानी नारदा । तो कृष्णकीर्ती पढे सदा । नामानुवादा गर्जतु ॥ ४७ ॥ कीर्तन करितां नामानुवाद । संकटीं रक्षिला प्रल्हाद । कीर्तनें तुष्टे गोविंद । छेदी भवबंध दासांचा ॥ ४८ ॥ गजेंद्रें नामस्मरण । करितां पावला नारायण । त्याचें तोडूनि भवबंधन । निजधामा आपण स्वयें नेला ॥ ४९ ॥ अधमाधम अतिवोखटी । तोंडा रामु आला अवचटीं । ते गणिका कीं वैकुंठीं । कृष्णें नामासाठीं सरती केली ॥३५०॥ महादोषांचा मरगळा । अतिनष्ट अजामेळा । तोही नामें निर्मळ केला । प्रतापु आगळा नामाचा ॥५१॥ नामें विनटली गोविंदीं । ते संकटीं राखिली द्रौपदी । नाम तोडी आधिव्याधी । जाण त्रिशुद्धी दासांची ॥ ५२ ॥ आंतरशुद्धीचें कारण । मुख्यत्वें हरिकीर्तन । नामापरतें साधन । सर्वथा आन असेना ॥ ५३ ॥ कीर्तनीं हरीची आवडी कैशी । वत्सालागीं धेनु जैशी । कां न विसंबे जेवीं

सुमेधसः—बुद्धिमान लोक कलियुगांत, कृष्णवर्णं—काळ्यारंगाच्या, त्विषा अकृष्णं—पण कांतीनें इन्द्रनीलमण्याप्रमाणें उज्ज्वल, सांगोपांगास्त्रपार्षदं—हृदयादि अंगें, कौस्तुभादि उपांगें, सुदर्शनादि अस्त्रें व सुनंदादि पार्षद, यांनीं युक्त असलेल्या कृष्णाची, संकीर्तनप्रायैः यज्ञैः हि यजन्ति—नामोच्चारण व स्तुति हींच ज्यांमध्यें प्रधान आहेत अशा यज्ञांनींच पूजितात. [कृष्णवर्णांतील रुक्षता घालविण्यासाठीं ' त्विषा अकृष्णं ' म्ह० इन्द्रनीलमण्याप्रमाणें उज्ज्वल असें म्हटलें आहे. किंवा ' त्विषा कृष्णं ' असा पदच्छेद करून कांतीनें कृष्णवर्ण व ' कृष्णं ' कृष्णावतार अशी योजना करावी. दुसऱ्या योजनेनें कलियुगांत कृष्णावताराचें प्राधान्य दाखविलें आहे.] ३२.

कलियुगांत श्रीकृष्ण हाच देव होय. त्याचा कृष्णवर्ण असून त्याची प्रभा इंद्रनीलमण्यासारखी सर्वत्र पसरते. त्यामुळें ती अतिशय शोभते. ४२ ती सर्व अवयवांनीं पूर्ण आहे. मुरली, शिंग इत्यादि तिचीं उपांगें आहेत. चारी भुजा अति सुंदर व महापराक्रमी आहेत व त्यांत शंखचक्रादि अव्यंग आयुधें आहेत. ४३ त्याच्या पृष्ठभागीं आयुधांसह त्याचें पार्षद आहेत. कलियुगांत ज्ञानी लोक अशा गोविंदाचें चिंतन करितात. ४४ मधुपर्कादि विधानासह सांग केलेलें जें पूजन त्यालाहि गौण मानून कलियुगांत कृष्णाला कीर्तन आवडतें. ४५ हे राजाधिराजा, काय आश्चर्य आहे पहा ! कीर्तन हीच महापूजा आहे, अशी त्या अधोक्षजाची आवड आहे व तो गरुडध्वज सदा कीर्तनानेंच संतुष्ट होतो. ४६ गोविंदाला कीर्तन अत्यंत प्रिय आहे, म्हणून नारदाचा एवढा सन्मान, तो हरिनामाची गर्जना करीत सदा कृष्णकीर्ति गात असतो. ४७ हरीचा नामोच्चार करून कीर्तन केल्यानेंच त्यानें प्रल्हादाचें संकटांत रक्षण केलें. गोविंद कीर्तनानें सदा संतुष्ट होतो व भक्तांचा संसारबंध तोडितो. ४८ गजेंद्रानें नामस्मरण करितांच नारायण स्वतः प्राप्त झाला व त्याचें भवबंधन तोडून त्याला आपल्याबरोबर नेलें. ४९ अतिशय अधम, पापी अशी गणिका, पण तिच्या तोंडांतून सहज ' रामनाम ' येतांच तिला कृष्णानें वैकुंठाला नेलें व केवळ नामप्रभावानें तिला कृतार्थ केलें. ३५० महादोषाचा पुतळाच असा जो अतिभ्रष्ट अजामीळ त्यालाहि नामस्मरणानें पवित्र केलें. हरिनामाचा असा अलौकिक प्रभाव आहे. ५१ संकटप्रसंगीं द्रौपदीनें धांवा करितांच गोविंदानें तिचें रक्षण केलें. हरिनाम भक्तांची आधिव्याधि नाहींशी करितें. ५२ हरिकीर्तन हेंच चित्तशुद्धीचें प्रमुख कारण आहे. नामावांचून अन्य साधन नाहीं. ५३ हरीला कीर्तनाची आवड कशी आहे, तें सांगतो. गाय जशी आपल्या वासराला क्षणभरहि विसरत नाहीं किंवा मधमाशी जशी मधाच्या पोळ्याला विसंबत नाहीं, ५४ त्याप्रमाणें

माशी । मोहळासी क्षणार्धें ॥ ५४ ॥ तेवीं नामस्मरतया भक्ता । अतिशयें आवडी अच्युता । दासांची अणुमात्र अवस्था । निजांगें सर्वथा निवारीं स्वयें ॥ ५५ ॥ यालागीं हरिकीर्तनीं गोडी । जयासी लागली धडफुडी । त्यासी नाना साधनांच्या वोढी । सोसावया सांकडीं कारण नाहीं ॥ ५६ ॥ ज्यासी कीर्तनीं कथाकथनीं । चौगुण आल्हाद उपजे मनीं । तो उद्धरला सर्व साधनीं । पवित्र अवनी त्याचेनी ॥ ५७ ॥ एकचि जरी नाम वाचे । सदा वसे श्रीरामाचें । तरी पर्वत छेदोनि पापांचे । परमानंदाचें निज सुख पावे ॥ ५८ ॥ आवडीं करितां हरिकीर्तन । हृदयीं प्रगटे श्रीजनार्दन । त्याहोनि श्रेष्ठ साधन । सर्वथा आन असेना ॥ ५९ ॥ थोर कीर्तनाचें सुख । निष्ठा तुष्टे यदुनायक । कीर्तनें तरले असंख्य । साबडे लोक हरिनामें ॥ ३६० ॥ यालागी कीर्तनाहूनि थोर । आन साधन नाहीं सधर । मा कवण हेतु पामर । कीर्तन नर निंदिती ॥ ६१ ॥ एवं नामकीर्तनीं विमुख । ते स्वप्नींही न देखती सुख । कीर्तनद्वेषें मूर्ख । अतिदुःख भोगिती ॥ ६२ ॥ ज्यांचे हृदयीं द्वेषसंचार । जळो जळो त्यांचा आचार । सर्व काळ द्वेषी नर । दुःख दुर्धर भोगिती ॥ ६३ ॥ कलियुगीं जे बुद्धिमंत । ते नामकीर्तनीं सदा निरत । गौरवूनि नाम स्मरत । हर्षयुक्त सप्रेम ॥ ६४ ॥ नाना अवतार अतिगहन । त्यांत श्रीराम कां भगवान् कृष्ण । यांचें चरित्र अतिपावन । त्यांचें चरणवंदन सांगत ॥ ६५ ॥

ध्येयं सदा परिभवघ्नमभीष्टदोहं तीर्थास्पदं शिवविरिञ्चिनुतं शरण्यम् ।
भृत्यार्तिहं प्रणतपाल भवाब्धिपोतं वन्दे महापुरुष ते चरणारविन्दम् ॥ ३३ ॥

हरि कीर्तनापासून कधींहि दूर होत नाहीं. नामस्मरण करणाऱ्या भक्ताची अच्युताला अतिशय आवड असते. भक्तावर अणुमात्रहि संकट येतांच तो स्वतः त्यांचें निवारण करितो. ५५ यासाठीं ज्याला हरिकीर्तनाची अंतःकरणापासून गोडी लागली आहे, त्याला अनेक साधनांचा सोस करण्याचें कांहीं कारण नाहीं. ५६ ज्याला कीर्तनांत आणि कथेंत चौपट आनंद होतो तो सर्व साधनांनीं उद्धरिला जातो. त्याच्यायोगानें पृथ्वी पावन होते. ५७ एकच 'राम' नाम जरी सदा तोंडीं असलें तरी तो पापाचे पर्वत तोडून परमानंदाला प्राप्त होतो. ५८ आवडीनें हरिकीर्तन केलें असतां हृदयांत श्रीजनार्दनच प्रकट होतो. यावांचून दुसरें कोणतेंहि श्रेष्ठ साधन नाहीं. ५९ कीर्तनाचें सुख फार मोठें आहे. भक्तीनें यदुनायक संतुष्ट होतो. हरिनामाच्या कीर्तनानें अगणित भाळेभोळे लोक तरून गेले आहेत. ३६० यासाठीं कीर्तनासारखें दुसरें बलवान् साधन नाहीं. मग हे वेडे लोक कीर्तनाची निंदा कां करितात ! ६१ याप्रमाणें जे हरि-नामाच्या कीर्तनाला विमुख होतात, त्यांना स्वप्नांतहि सुख मिळत नाहीं. ते मूर्ख कीर्तनाच्या द्वेषानें अतिशय दुःख भोगितात. ६२ ज्यांच्या मनांत द्वेषाचा संचार असतो, त्यांच्या आचाराला धिक्कार असो. द्वेषी मनुष्ये सर्वदा दुर्धर दुःख भोगितात. ६३ कलियुगांत जे बुद्धिमान् आहेत ते नामसंकीर्तनांत सदा निमग्न असतात. ते आनंदानें, प्रेमानें व आदरानें नामस्मरण करितात. ६४ अतिगहन नाना अवतार झाले, त्यांत श्रीराम व भगवान् श्रीकृष्ण यांचीं चरित्रें अतिशय पवित्र आहेत. त्यांच्या चरणवंदनाचा महिमा सांगतों. ३६५.

—स्तुति सांगतात—

हे प्रणतपाल-हे भक्तपालका, हे महापुरुष-हे महापुरुषा, ते चरणारविंदं वन्दे-तुझ्या चरणकमलाला मी वंदन करितों. (तें चरण कमल कसें ?) सदा ध्येयं-सदा ध्यान करण्यास योग्य, ('सदा' या शब्दाचा पुढील सर्व विशेषणांशीं संबंध आहे. त्याच्या ध्येयत्वाविषयींच पुढील विशेषणांनीं अनेक कारणें सांगतात-) परिभवघ्नं-इंद्रियें व कुटुंबादि यांच्याकडून होणारा जो तिरस्कार, त्याचें निवारण करणारें, अभीष्टदोहं-मनोरथ पूर्ण करणारें, तीर्थास्पदं-हरीचें चरणकमल गंगादिकांचा आश्रय असल्यामुळें परम पावन, शिवविरिञ्चिनुतं-शंकर आणि ब्रह्मदेव यांजकडून स्तुत-फार मोठें (पण ते दोन्ही देव कृतार्थ आहेत मग ते त्याची स्तुति कशाला करितात ? उत्तर-) शरण्यं-तें आश्रय करण्यास योग्य आहे म्ह० सुखात्मक आहे, असा भावार्थ. (पण ब्रह्मादिकांना स्तुत्य असलेलें तें प्राकृत पुरुषाचा विषय कसें होईल ? उत्तर-) भृत्यार्तिहं-वाटेल त्या सामान्य भक्ताच्याहि संकटाचें हरण करणारें (केवळ आगंतुक पीडेचें निवारण करणारें नव्हे, तर) भवाब्धिपोतं-संसारसागरांतून तारणारें आहे.] ३३.

लयें लक्षें ध्यानलक्षणें । देव देवी ध्येय ध्यानें । तृणप्राय केलीं जेणें । हरिचरणस्मरणें तत्काळ ॥ ६६ ॥ यालागीं ध्यानासी तें वरिष्ठ । ध्यातां छेदी कल्पनादि कष्ट । भक्तांचे अतिअभीष्ट । मनोरथ इष्ट सदा पुरवी ॥ ६७ ॥ नित्य ध्यातां हरीचे चरण । करी भक्तदेहरोगदुःखहरण । इतुकेंच राया नव्हे जाण । करी निर्दळण भवरोगा ॥ ६८ ॥ भक्तांचे पुरवी मनोरथ । ते तूं म्हणसी विषययुक्त । परमानंदें नित्य तृप्त । निववी निजभक्त चरणामृतें ॥ ६९ ॥ वानूं चरणांची पवित्रता । शिवु पायवणी वाहे माथां । जे जन्मभूमी सकळ तीर्थां । पवित्रपण भक्तां चरणध्यानें ॥ ३७० ॥ अवचटें लागल्या चरण । पवित्र झाले पाषाण । मा जे जाणोनि करिती ध्यान । त्यांचें पवित्रपण काय वानूं ॥ ७१ ॥ जो सदा शत्रुत्वें वर्ततां । जेणें चोरून नेली निजकांता । त्याच्या बंधू शरणागता । दिधली आत्मता निजभावें ॥ ७२ ॥ कोरडी आत्मतेची थोरी । तैशी नव्हे गा नृपकेसरी । देऊनि सुवर्णाची नगरी । अचळतेवरी स्थापिला ॥ ७३ ॥ यालागीं शरणागतां शरण्य । सत्य जाण हरीचे चरण । यापरतें निर्भय स्थान । नाहीं आन निजभक्तां ॥ ७४ ॥ भक्तांची अणुमात्र व्यथा । क्षण एक न साहवे भगवंता । प्रल्हादाची अतिदुःखता । होय निवारिता निजांगें ॥ ७५ ॥ दावाग्नि गिळूनि अंतरीं । गोपाळ राखिले वनांतरीं । पांडव जळतां जोहरीं । काढिले बाहेरी विवरद्वारें ॥ ७६ ॥ करूनि सर्वांगाचा वोढा । नित्य निवारी भक्तांची पीडा । जो कां भक्तांचिया भिडा । रणरंगीं फुडां वागवी रथु ॥ ७७ ॥ ते चरण वंदितां साष्टांगीं । भक्तां प्रतिपाळी उत्संगीं । ऐसा प्रणतपाळु कृपाबोधीं । दुसरा जगीं असेना ॥ ७८ ॥ तरावया भवाब्धि प्रबळ । चरणांची नांव अडंडळ । अनन्यशरण सकळ । तारी तत्काळ चरणानुरागें ॥ ७९ ॥ ते महापुरुषाचे श्रीचरण । शरणागता निजशरण । ज्यांचें सनका-

---

निर्विकल्प समाधि, सविकल्प समाधि, ध्यान, लक्षण, लक्ष्य, देव देवी, ध्येय, ध्यान इत्यादि सर्वांना हरिचरण-स्मरणानें एका क्षणांत कस्पटासारखें तुच्छ केलें आहे. ६६ यास्तव तें ध्यानाचें श्रेष्ठ आलंबन आहे. त्याचें ध्यान केलें असतां कल्पनादि सर्व क्लेश नाश पावतात व भक्तांचे इष्ट मनोरथ सदा पूर्ण होतात. ६७ हरिचरणाचें नित्य ध्यान केलें असतां भक्तांच्या केवळ शरीरव्याधींचेंच दुःख नाहींसें होतें, असें नाहीं, तर हे राजा, भवरोगाचेंहि निर्दालन होतें. ६८ तूं कदाचित् असें समजशील कीं, भक्तांचे विषययुक्त मनोरथहि तो पूर्ण करितो, पण तसें नाहीं. तो परमानंदानें नित्यतृप्त असलेला भगवान् आपल्या चरणामृतानें भक्तांना शांत करितो. ६९ त्याच्या चरणाच्या पवित्रतेचें किती वर्णन करूं ! भगवानाच्या चरणापासून निघालेली गंगा शिव मस्तकावर धारण करितो. त्या गंगेमुळें त्रिभुवनांतील सर्व तीर्थांना तीर्थत्व प्राप्त झालें आहे. त्याच्या चरणाच्या ध्यानानें भक्तांना पवित्रत्व येतें. ३७० सहज पाय लागला तर पाषाणहि पवित्र होतात. (श्रीरामचंद्राच्या चरणस्पर्शानें झालेल्या अहल्योद्धाराची कथा प्रसिद्धच आहे.) मग जे जाणूनबुजून ध्यान करितात त्यांच्याविषयीं काय सांगावें ! ७१ जो रावण सदा शत्रुत्वानेंच वागत होता, ज्यानें त्याची प्रिय पत्नी सीता चोरून नेली, त्याचाच भाऊ बिभीषण शरण येतांच रामचंद्रानें त्याला आत्मत्व दिलें. ७२ हे श्रेष्ठ राजा, त्याला नुस्तें आत्मत्वच दिलें नाहीं तर सोन्याच्या लंकेचा अधिपति करून चिरंजीवहि केलें. ७३ यासाठीं हरिचरणच शरण जाण्यास योग्य आहेत. त्यावांचून भक्ताला दुसरें कोणतेंहि निर्भय स्थान नाहीं. ७४ भक्ताला यत्किंचित्हि व्यथा झालेली भगवंताला सहन होत नाहीं. प्रल्हादाचें दुःख त्यानें स्वतः निवारिलें. ७५ श्रीकृष्णावतारीं दावाग्नीला गिळून गोपाळांचें वनांत रक्षण केलें. लाक्षागृहांत पांडव आगींत सांपडले असतां त्यांना विवराच्याद्वारानें बाहेर काढिलें. ७६ याप्रमाणें तो भगवान् स्वतःचें शरीर झिजवून भक्तांवरील संकटाचें नित्य निवारण करितो. भक्ताच्या भिडेनें त्यानें रणांगणांत अर्जुनाचा रथहि हांकिला. ७७ त्याच्या चरणांना साष्टांग नमस्कार केला असतां तो भक्तांचें आपल्या मांडीवर प्रतिपालन करितो. असा शरणागताचा संरक्षक जगांत दुसरा कोणीहि नाहीं. ७८ प्रबळ भवसागर तरून जाण्याला हरिचरण हीच दृढ नाव आहे. सर्व अनन्यशरणागतांना तो तत्काळ तारितो. ७९ त्या महापुरुषाच्या चरणाचें सनकादिक सद्भावानें वंदन व ध्यान करितात. ३८०

दिक ध्यान । करिती अभिवंदन सद्भावें ॥ ३८० ॥ अगाध चरणांचें महिमान । वानितां वेदां पडिल मौन । ब्रह्मा सदाशिव आपण । करितां स्तवन तटस्थ ठेले ॥ ८१ ॥ अगम्य अतर्क्य श्रीचरण । जाणोनि ब्रह्मादिक ईशान । साष्टांगें अभिवंदन । करूनिया स्तवन करिती ऐसें ॥ ८२ ॥

त्यक्त्वा सुदुस्त्यजसुरेप्सितराज्यलक्ष्मीं धर्मिष्ठ आर्यवचसा यदगादरण्यम् ।
मायामृगं दयितयेप्सितमन्वधावद्वन्दे महापुरुष ते चरणारविन्दम् ॥ ३४ ॥

जे राज्यश्रियेकारणें । अमर लोलंगत मनें । तें राज्य श्रीरामें त्यागणें । वचनाकारणें पित्याच्या ॥ ८३ ॥ श्रीराम धर्मिष्ठ चोख । पितृवचनप्रतिपाळक । उद्भट राज्य सांडोनि देख । निघे एकाएक वनवासा ॥ ८४ ॥ वनवासा चरणीं जातां । सवें घेतली प्रिया सीता । येणें बोलें स्त्रीकामता । श्रोतीं सर्वथा न मानावी ॥ ८५ ॥ तरी केवळ स्त्री नव्हे सीता । ते निजभक्त जाण तत्त्वतां । सांडूनि राज्यभोगां समस्तां । सेवेच्या निजस्वार्था वना आली ॥ ८६ ॥ राज्यीं असतां रघुवीरें । दास्य दासां वांटलें अधिकारें । ते मी एकली एकसरें । सेवा वनांतरीं अवघीचि करीन ॥ ८७ ॥ ते सेवा यावया हाता । सकळ सेवेच्या निजस्वार्था । चरणचाली चालोनि सीता । आली तत्त्वतां वनवासासी ॥ ८८ ॥ कैसें श्रीरामसेवेचें सुख । चरणीं चालतां नाठवे दुःख । विसरली मायामाहेरपक्ष । अत्यंत हरिख सेवेचा ॥ ८९ ॥ ऐशिया मनोगतसद्भावा ।

चरणाचा महिमा अगाध आहे. त्याचें वर्णन करितांना वेदांनाहि मौन धरावें लागलें. ब्रह्मदेव व महादेव हेहि त्याची स्तुति करितांना स्तब्ध राहिले. ८१ असे श्रीचरण अगम्य, अतर्क्य आहेत; हें जाणून ब्रह्मादि देव व शंकर साष्टांग नमस्कार करून त्याचें असें स्तवन करितात. ३८२.

—आतां भगवान् स्वतः आप्तकाम असल्यामुळें त्याचें वास्तविक निरपेक्षत्व पण भक्तांसाठीं सापेक्षत्व दाखविणारा मुनि श्रीरामचंद्राची स्तुति करितो—

सुदुस्त्यजसुरेप्सितराज्यलक्ष्मीं त्यक्त्वा–इतर जनांना त्याग करण्यास अत्यंत अशक्य अशी देवांनाहि अत्यंत अभीष्ट असलेली जी राज्यलक्ष्मी तिचा त्याग करून, यत् अरण्यं अगात्–जो महापुरुष वनांत गेला. (राज्यामध्यें कांहीं न्यूनत्व पाहून गेला कीं काय ? म्ह० आपलें राज्य कोणीं हरण केलें म्हणून गेला कीं काय ? उत्तर नाहीं.) धर्मिष्ठः–धर्मनिष्ठ असल्यामुळें अरण्यांत गेला [तें तरी कां ?] आर्यवचसा–गुरु दशरथाच्या वचनावरून तो अरण्यांत गेला [पण याप्रमाणें राज्याचा त्याग करूनहि भक्तवात्सल्यानें] दयितया ईप्सितं मायामृगं अन्वधावत–प्रिया सीतेनें आपल्याला प्राप्त व्हावा म्हणून इच्छिलेल्या सुवर्णाकार मायामृगाच्या मागून धांवला, हे महापुरुष ते चरणारविंदं वन्दे–अशा हे महापुरुषा, तुझ्या चरणकमलांना मी वंदन करितों. [किंवा धर्मिष्ठ, हें संबोधन घ्यावें व त्याला ‘ धर्मिष्ठ ’ व ‘ आर्यवचसा ’ या दोन पदांचा संधि विवक्षित नसल्यामुळें तो केलेला नाहीं, असें समजावें. तसेंच ‘ यत् अगात् ’ येथील ‘ यत् ’ शब्दाचा ‘ यः ’ असा जो अर्थ केला आहे तो न करितां ‘ यत् ’ म्ह० जें चरणकमल अरण्यांत गेलें व मायामृगाच्या मागें धांवलें त्या तुझ्या चरणकमलाला वंदन करितों, असा अन्वय व अर्थ करावा.] ३४.

ज्या राज्यलक्ष्मीसाठीं देवांचेंहि मन लोलुप होतें त्या राज्याचा श्रीरामानें पित्याच्या शब्दासाठीं त्याग केला. ८३ श्रीराम मोठा धर्मनिष्ठ व पित्याचें वचन पाळणारा, म्हणून तो एवढें थोरलें विस्तृत राज्य टाकून वनवासाला अकस्मात् निघाला. ८४ पायांनीं चालत वनवासाला जातेवेळीं त्यानें प्रिय सीतेला जें बरोबर घेतलें, तें विषयवासनेनें असें कोणी मानूं नये. ८५ सीता केवळ स्त्री नव्हती, तर ती त्याची तत्त्वतां भक्त होती. राजगृहांतील सर्व ऐश्वर्य टाकून सेवा करण्याच्या कर्तव्यतत्परतेनें ती वनांत गेली. ८६ रघुवीर राजवाड्यांत असतांना नोकर-चाकरांकडे त्यांच्या-त्यांच्या अधिकारपरत्वें सेवा वांटून दिली होती. ती सर्व सेवा वनांत मी एकटीच आतां करीन, ८७ ती सर्व सेवा करावयास मिळावी या स्वार्थासाठीं सीता पायांनीं चालत वनांत गेली. ८८ श्रीरामाच्या सेवेचें सुख कसें आहे, तें पहा ! पायांनीं चालत असतां तिला दुःखाची आठवणहि झाली नाहीं, ती मायिक माहेरपक्षालाहि विसरली,

वना आली करावया सेवा । श्रीराम जाणें भक्तभावा । येरां देवां दानवां कळेना ।। ३९० ।। निजभक्तांचें मनोगत । जाणता एक रघुनाथ । कां श्रीरामसेवेचा स्वार्थ । जाणती निजभक्त भजनानंदें ।।९१।। भगवद्भजनाचें सुख । भक्त जाणती भाविक । भावेंवीण भजनसुख । अनोळख अभाविकां ।। ९२ ।। पूर्ण भाविक भक्त सीता । हें कळलेंसे रघुनाथा । यालागीं तिचिया वचनार्था । होय धांवता मृगामागें ।। ९३ ।। मायिक मृगाचें सुवर्णभान । जरी जाणे रघुनंदन । तरी भक्तलळे पाळण । करी धावन मृगामागें ।। ९४ ।। बाळकाचेनि छंदें जाण । जेवीं माउली नाचे आपण । तेवीं मायामृगापाठीं धावन । करी रघुनंदन निजभक्तवाक्यें ।। ९५ ।। जो राम वानरांच्या गोष्टी । ऐकतां विकल्प न धरी पोटीं । तो सीतेच्या वचनासाठीं । धांवे मृगापाठीं नवल कायी ।। ९६ ।। भलतैसें भक्तवचन । मिथ्या न म्हणे रघुनंदन । यालागीं निजचरणीं धावन । करी आपण मृगामागें ।। ९७ ।। एवं भक्तवाक्यें उठाउठी । जो पायीं धांवे मृगापाठीं । ज्याचे चरणरेणु अणुकुटी । वंदिती मुकुटीं शिवादि सर्व ।। ९८ ।। तो मृगामागें धांवतां जाण । पावन केले पाषाण । त्याच्या चरणां अनन्य शरण । अभिवंदन सद्भावें ।। ९९ ।। महापुरुषाचे चरण । अभिवंदनें करिती स्तवन । कलियुगीं कीर्तनें जन । परम पावन नित्यमुक्त ।।४००।।

एवं युगानुरूपाभ्यां भगवान् युगवर्तिभिः । मनुजैरिज्यते राजन् श्रेयसामीश्वरो हरिः ।। ३५ ।।

एवं कृतादि कलियुगवरी । इहीं नामीं रूपीं अवतारीं । सद्भावें तैंच्या नरीं । भजिजे श्रीहरी श्रेयार्थ ।। १ ।। त्यांमाजीं कलियुगाची थोरी । वानिजे सद्भावें ऋषीश्वरीं । येथें हरिकीर्तनावरी । मुक्ती चारी वोळगण्या ।। २ ।।

कारण तिला श्रीरामसेवेचीच मोठी हौस होती. ८९ अशा सद्भावनेनें ती वनांत श्रीरामचंद्राची सेवा करण्यासाठीं गेली. भक्ताचे मनोगत श्रीरामच जाणतो. अन्य देव-दानवांना तें कळत नाहीं. ३९० एकटा रघुनाथच आपल्या भक्ताचा भाव जाणतो. किंवा श्रीरामसेवेचा स्वार्थ भजनानंदरूपानें भक्तच काय ते जाणतात. ९१ भगवद्भजनाचें सुख भाविक भक्तच जाणतात. भक्तीवांचून अभक्तांना भजनाचें सुख कळणार नाहीं. ९२ सीता पूर्ण भाविक भक्त आहे, हें रघुनाथाला कळलें होतें म्हणून तिच्या तोंडून शब्द निघतांच तो मृगाच्यामागें धांवला. ९३ हा सुवर्णमृग मायावी आहे हें रघुनंदन जाणत होता; पण भक्ताच्या इच्छेस्तव तो मृगामागें गेला. ९४ लहान बाळाचा छंद पुरविण्यासाठीं माता जशी स्वतः नाचते, तसा रघुनंदन आपल्या भक्ताचे कोड पुरविण्यासाठीं मायावी मृगाच्या मागें लागला. ९५ ज्या रामानें वानरांच्या गोष्टी ऐकूनहि मनांत विकल्प धरिला नाहीं तो जर सीतेच्या शब्दासाठीं मृगाच्या मागें धांवला तर त्यांत नवल कसलें ! ९६ एखाद्या सामान्य भक्तांचें भलतें-सलतें वचनहि रघुनंदन खोटें मानीत नाहीं, म्हणूनच तो मृगाच्या मागें पायीं धांवला. ९७ ज्याच्या चरणाची अति-सूक्ष्म धूळ शंकरादि आपल्या मस्तकावर धारण करितात, तो सीतेच्या वचनासाठीं मृगामागें धांवला ९८ व मार्गांतील पाषाणांना पावन केलें. त्याच्या चरणाला अनन्य शरण होऊन भक्त सद्भावानें वंदन करितात.९९ कलि-युगांत भक्तजन याप्रमाणें त्या महापुरुषाच्या चरणाला वंदन करून व त्याचें स्तवन करून परम पावन व नित्य मुक्त होतात. ४००.

राजन्–हे राजा, **युगवर्तिभिः मनुजैः**–त्या त्या युगांतील मनुष्यांकडून, **एवं युगानुरूपाभ्यां**–अशा प्रकारच्या युगानुरूप नाम-रूपांनीं, **भगवान् इज्यते**–भगवान पूजिला जातो. **हरिः श्रेयसां ईश्वरः**–कारण हरि सर्व श्रेयांचा ईश्वर आहे. ३५.

याप्रमाणें कृतयुगापासून कलियुगापर्यंत या नाम, रूप व अवतारानीं त्या त्या युगांतील पुरुषांनीं सद्भावानें आपल्या श्रेयासाठीं श्रीहरीचें पूजन करावें. १ त्यांतील कलियुगाची थोरवी ऋषीश्वरांनीं सद्भावानें गणिली आहे. चारी मुक्ति हरिकीर्तनाच्या केवळ दासी आहेत. ४०२.

कलिं सभाजयन्त्यार्या गुणज्ञाः सारभागिनः । यत्र संकीर्तनेनैव सर्वः स्वार्थोऽभिलभ्यते ॥ ३६ ॥

अवधारीं राया सर्वज्ञा । धन्य धन्य कलियुग जाणा । जेथ सर्वस्वार्थ हरिकीर्तना । नामस्मरणासाठीं होती ॥ ३ ॥ कलियुगीं दोष बहुत । केवीं कीर्तनें होय स्वार्थ । तेथें दोषत्यागें जे गुण घेत । ते नित्य मुक्त हरिकीर्तनीं ॥ ४ ॥ हरीकीर्तनें शुद्ध चित्त । दोषत्यागें गुण संग्रहीत । ऐसे सारभागी कलियुगांत । परममुक्त हरिकीर्तनें ॥ ५ ॥ कलीच्या गुणांतें जाणते । नामें मोक्ष जोडणें येथें । जाणोनि करिती कीर्तनातें । ते जाण निश्चितें नित्यमुक्त ॥६॥ कलियुगीं हेंची सार । नाम स्मरावें निरंतर । करिती नामाचा निजगजर । ते मुक्त नर नृपनाथा ॥ ७ ॥

श्लोक संमत ॥ ध्यायन्कृते यजन्यज्ञैस्त्रेतायां द्वापरेऽर्चयन् ।
यदाप्नोति तदाप्नोति कलौ संकीर्त्य केशवम् ॥ १ ॥

कलियुगीं शमदमादिसाधन । त्रेतायुगीं वेदोक्त यज्ञ । द्वापरीं आगमोक्त पूजन । तंत्रविधान विधियुक्त ॥ ८ ॥ यापरी त्रियुगीं जना । परम संकटसाधना । करितांही परी मना । अणुमात्र जाणा उपरमु नव्हे ॥ ९ ॥ तीं अवघींच साधनें । कलीनें लाजविलीं कीर्तनें । जेथ गातां नाचतां आपणें । वश्य करणें परमात्मा ॥ ४१० ॥ आखरीं हुंबळीगुणें । ऐकतां गोवळांचें गाणें । देव भुलला जीवेंप्राणें । त्यांसवें नाचे स्वानंदें ॥ ११ ॥ कृष्ण कान्हो गोपाळा । या आरुप नामांचा चाळा । घेऊनि गर्जती वळोवेळां । तेणें घनसांवळा सुखावे ॥ १२ ॥ तेणें सुखाचेनि संतोषें । देवो परमानंदें उल्हासे । एवं

—या चार युगांमध्यें कलीच श्रेष्ठ आहे असें आतां मुनि सांगतो—

गुणज्ञाः आर्याः कलिं सभाजयन्ति—कलीचा गुण जाणणारे श्रेष्ठ पुरुष त्याची पूजा करितात. (पण कलीमध्यें दोषांचें बाहुल्य असतांना ते कलीचा सत्कार कसा करितात ? उत्तर—) सारभागिनः—कारण ते गुणांशाचें ग्रहण करणारे असतात. (तो गुण कोणता ? उत्तर—) यत्र संकीर्तनेन एव सर्वः स्वार्थः अभिलभ्यते—ज्या कलियुगांत केवळ संकीर्तनानेंच तो स्वार्थ प्राप्त होतो. [त्याविषयीं ' ध्यायन् कृते० ' इत्यादि वचन प्रसिद्ध आहे व त्याचा अर्थ पुढें भावार्थांत येणार आहे] ३६.

हे सर्वज्ञ राजा, ऐक. कलियुग धन्य धन्य आहे कारण त्यांत हरिकीर्तन व नामस्मरण यांनीं सर्व स्वार्थ साधतात. ३ कलियुगांत पुष्कळ दोष आहेत. तेव्हां कीर्तनानें स्वार्थ कसा साधणार ! पण त्यांतील दोष टाकून जे गुणांचें ग्रहण करितात ते हरिकीर्तनानें नित्य मुक्त होतात. ४ हरिकीर्तनानें चित्तशुद्धि होते. दोष टाकून गुणांचा संग्रह करणारे गुणज्ञ कलियुगांत कीर्तनानें परममुक्त होतात. ५ कलीचे गुण जाणणारे ' नामानेंच मोक्ष साधतो ' हें जाणून हरिकीर्तन करितात व निश्चयानें नित्यमुक्त होतात. ६ निरंतर नामस्मरण करणें हेंच कलियुगांत सार आहे. यास्तव हे नृपनाथा, जे पुरुष हरिनामाचा गजर करितात, ते मुक्त होतात. ४०७.

कृते ध्यायन्—कृतयुगांत ध्यान करणारा, त्रेतायां यज्ञैः यजन्—त्रेतायुगांत यज्ञांनीं पूजा करणारा, द्वापरे अर्चयन्—द्वापरयुगांत पूजन करणारा, यत् आप्नोति—ज्या फळाला प्राप्त होतो, तत्—तेंच फल, कलौ केशवं संकीर्त्य आप्नोति—कलीयुगांत केशवाच्या कीर्तनानें प्राप्त होतें.

कृतयुगांत शमदमादिसाधन, त्रेतायुगांत वेदोक्त यज्ञ, द्वापरांत वेदोक्त पूजन व यथाशास्त्र तांत्रिक विधान, ८ याप्रमाणें तीन्ही युगांत लोक जरी अतिशय कठीण साधनें आचरीत असले तरी त्यांच्या मनाला अणुमात्र शांति मिळत नाहीं. ९ त्या सर्व साधनांना कलियुगांत कीर्तनानें लाजविलें. ज्या कीर्तनांत गात, नाचत परमात्म्याला वश करतां येतें, ४१० गुरांच्या गोठणीवर हुंबरी, हमामा या गुणांनीं युक्त असें गवळ्यांचें गान ऐकतांच देव त्यांच्या गाण्यावर इतका लुब्ध झाला कीं, त्यांच्याबरोबर आपणाहि आनंदानेंच नाचूं लागला. ११ कृष्ण, कान्हा, गोपाळ या अडाणी नांवाचा छंद घेऊन गोपाळ वारंवार गर्जना करितात. त्यानें तो घनश्याम सुखावतो. १२ त्याच्या अंतःकरणाला भरतें

कलियुगीं कीर्तनवशें । भक्त अनायासें उद्धरतीं ॥१३॥ कीर्तन आवर्तनमेळीं । जळती पापांच्या वडवाळी । भक्त उद्धरती तत्काळीं । हरिनामें कलि दाटुगा ॥ १४ ॥ कलियुगीं हेचि थोरी । नामसंकीर्तना वारी । चहूं वर्णां मुक्त करी । तेथ न विचारी स्त्री शूद्र ॥ १५ ॥ वेदु अत्यंत कृपणु जाला । त्रिवर्णांचे कानीं लागला । स्त्रीशूद्रादिकांसीं अबोला । धरूनि ठेला अद्यापि ॥ १६ ॥ तें वेदाचें अतिन्यून । उद्धरी हरिनामकीर्तन । स्त्री शूद्र अंत्यंज जन । उद्धरण हरिनामें ॥ १७ ॥ कीर्तनें स्वधर्मु वाढे । कीर्तनें स्वधर्मु जोडे । कीर्तनें परब्रह्म आतुडे । मुक्ति कीर्तनापुढें लाजोनि जाय ॥ १८ ॥ कीर्तनानंदें चारी मुक्ती । हरिभक्तातें वरूं येती । भक्त त्यांतें उपेक्षिती । तरी पायां लागती दास्यत्वें ॥ १९ ॥ एवढी कलियुगीं प्रचीती । कीर्तनाची परम ख्याती । राया जाण गा निश्चितीं । विकल्प चित्तीं झणें धरिसी ॥ ४२० ॥ कृत-त्रेताद्वापरासी । निषेधु नाहीं नामासी । कलियुगीं नामापाशीं । चारी मुक्ती दासी स्वयें होती ॥ २१ ॥

न ह्यतः परमो लाभो देहिनां भ्राम्यतामिह । यतो विन्देत परमां शान्तिं नश्यति संसृतिः ॥ ३७ ॥

जे जन्ममरणांच्या आवर्तीं । पडिले संसारीं सदा भ्रमती । त्या प्राणियां कलियुगाप्रती । कीर्तनें गती नृपनाथा ॥ २२ ॥ कलियुगीं कीर्तनासाठीं । संसाराची काढूनि कांटी । परम शांतिसुखसंतुष्टीं । पडे मिठी परमानंदीं ॥ २३ ॥ ऐसा कीर्तनीं परम लाभु । क्षिणतां सुरनरां दुर्लभु । तो कलियुगीं झाला सुलभु । यालागीं सभाग्यां लोभु हरिकीर्तनीं ॥ २४ ॥ कीर्तनास्तव चारी मुक्ती । भक्तांपासीं वोळंगती । हें न घडे कोणी म्हणती । ऐक ते स्थिती नृपनाथा ॥ २५ ॥ कीर्तनीं हरिनामाचा पाठा । तेणें देवासी संतोष मोठा । वेगीं सांडूनि वैकुंठा । धांवे अवचटा कीर्तनामाजीं ॥ २६ ॥ हरिकीर्तनीं लोभतां

येतें. याप्रमाणें कलियुगांत भक्त कीर्तनाच्या योगानें सहज उद्धरून जातात. १३ वारंवार कीर्तन केल्यानें पापांच्या राशी जळून जातात. हरिनामानें भक्त कलियुगांत तरून जातात. १४ कलियुगांत हीच थोरवी आहे. नामसंकीर्तनानें चारहि वर्ण मुक्त होतात. तेथें स्त्री, शूद्र हा भेदभाव नाहीं. १५ वेद अतिशय कृपण झाला व तो तीन वर्णांच्या कानांत गुणगुणूं लागला. त्यानें स्त्रीशूद्रांबरोबर अजूनपर्यंत अबोला धरला आहे. १६ तो वेदाचा गौणपणा हरिकीर्तनानें दूर केला. हरिस्मरणानें स्त्री, शूद्र व अंत्यज यांचा उद्धार केला. १७ कीर्तनानें स्वधर्म वाढतो, जोडतो आणि परब्रह्मप्राप्ति होते. मुक्तीला कीर्तनापुढें लाज वाटते. १८ कीर्तनाच्या आनंदानें चारी मुक्ति हरिभक्ताला वरावयास येतात. भक्तांनीं जरी त्यांची उपेक्षा केली तरी त्या त्यांच्या पायां पडून दासी होतात. १९ असा कलियुगांतील अनुभव आहे. कीर्तनाची अशी परम ख्याति आहे. हे राजा, हें तूं निश्चित जाण. ४२० त्याविषयीं मनांत मुळींच विकल्प धरूं नकोस. कृत, त्रेता, द्वापर या युगांत नामाचा निषेध नाहीं, पण कलियुगांत हरिनामाजवळ चारी मुक्ति स्वतःच दासी होऊन रहातात. ४२१.

इह भ्राम्यतां देहिनां—या संसारचक्रांत भ्रमण करणाऱ्या जीवांना, अतः परमः लाभः न हि—कलियुगांत ईश्वराचें संकीर्तन करावयास मिळणें याहून दुसरा श्रेष्ठ लाभ नाहींच. यतः परमां शान्तिं विन्देत—त्या संकीर्तनामुळें जीवाला परम शांति मिळते, संसृतिः नश्यति—व संसाराचा नाश होतो. ३७.

हे राजा, जे जन्ममरणाच्या भोंवऱ्यांत सांपडून संसारांत सदा भ्रमण करितात त्या प्राण्यांना कलियुगांत कीर्तनानें गति मिळते. २२ कलियुगांत कीर्तनामुळें संसाराचें कुंपण—प्रतिबंध नाहींसें होतें व परम शांतिसुख प्राप्त होतें. २३ असा कीर्तनांत परम लाभ आहे. त्यासाठीं इतर युगांत देव व मनुष्य फार शिणतात, तरी त्यांना तो मिळत नाहीं. पण कलियुगांत तो सुलभ झाला आहे. म्हणून भाग्यवानांना हरिकीर्तनाचा लोभ सुटतो. २४ कीर्तनामुळें भक्तांपाशीं चारी मुक्ति येतात, हें म्हणणें कित्येकांना खरें वाटत नाहीं. म्हणून हे राजा, मी तुला त्यांची वस्तुस्थिति सांगतों, तीं ऐक. २५ कीर्तनांत हरिनामाचा घोष चालतो. त्यामुळें देवाला मोठा संतोष होतो व तो त्वरेनें वैकुंठ सोडून अकस्मात् कीर्तनांत प्रकट होतो. २६ देवाला हरिकीर्तनाचा मोठा लोभ आहे;

देवो । विसरला वैकुंठासी जावों । तोचि आवडला ठावो । भक्तभावो देखोनी ॥ २७ ॥ जेथ राहिला यदुनायक । तेथचि ये वैकुंठलोक । यापरी मुक्ति सलोक । कीर्तनें देख पावती भक्त ॥ २८ ॥ नामकीर्तननिजगजरीं । भक्तां निकट धांवे श्रीहरी । तेचि समीपतामुक्ति खरी । भक्तांच्या करीं हरिकीर्तनें । ॥ २९ ॥ कीर्तनें तोषला अधोक्षज । भक्तां प्रत्यक्ष गरुडध्वज । श्याम पीतवासा चतुर्भुज । तें ध्यान सहज ठसावें ॥ ४३० ॥ भक्त कीर्तनकरी जेणें ध्यानें । तें ध्यान दृढ ठसावें मनें । तेव्हां देवांचीं निजचिन्हें । भक्तें पावणें संपूर्ण ॥ ३१ ॥ श्याम चतुर्भुज पीतांबरधारी । शंखचक्रादि आयुधें करीं । हे सरूपता भक्तांतें वरी । कीर्तनगजरीं भाळोनी ॥ ३२ ॥ तेव्हां देव भक्त समसमान । समान अवयव सम चिन्ह । भावें करितां हरिकीर्तन । एवढें महिमान हरिभक्तांचें ॥ ३३ ॥ दोघां एकत्र रमा देखे । देवो कोण तेंही नोळखे । ब्रह्मा नमस्कारी चवकें । देवो तात्त्विकें न कळे त्यासी ॥ ३४ ॥ भावें करितां हरिकीर्तन । तेणें संतोषे जनार्दन । उभयतां पडे आलिंगन । मिठी परतोन सुटेना ॥ ३५ ॥ तेव्हां सबाह्यांतरीं । देवो प्रगटे चराचरीं । दुजें देखावया संसारीं । सर्वथा उरी उरेना ॥ ३६ ॥ वृत्ति स्वानंदीं निमग्न । परतोनि कदा नव्हे भिन्न । सायुज्यमुक्ति यास जाण । जेणें दुजेपण असेना ॥ ३७ ॥ ऐशी लाहूनि पूर्ण सायुज्यता । तो जैं करी हरिकथा । ते कथेची तल्लीनता । जीवां समस्तां अतिप्रिय ॥ ३८ ॥ यापरी हरिकीर्तनापासीं । चारी मुक्ती होती दासी । भक्त लोधले हरिभजनासी । सर्वथा मुक्तीसी न घेती ॥ ३९ ॥ एवं योगयागादि तपसाधनें । पोरटीं केलीं हरिकीर्तनें । कलियुगीं नामस्मरणें । जड उद्धरणें हरिकीर्तनीं ॥ ४४० ॥

कृतादिषु प्रजा राजन् कलाविच्छन्ति संभवम् । कलौ खलु भविष्यन्ति नारायणपरायणाः ॥ ३८ ॥

त्यामुळें तो वैकुंठाला जाण्याचेंहि विसरतो. भक्ताचा भाव पाहून तेंच स्थान त्याला प्रिय झालें आहे. २७ जेथें यदुनायक येऊन राहिला तेथें वैकुंठलोक येतो. याप्रमाणें लोकांसह भक्ताला कीर्तनानें मुक्ति प्राप्त होतात. २८ नामसंकीर्तनाच्या गजरानें श्रीहरि भक्ताजवळ धांवतो. तीच खरी समीपता मुक्ति असून हरिकीर्तनानें ती भक्तांच्या हातांत येते. २९ कीर्तनानें भगवान् संतुष्ट झाला म्हणजे भक्तांना तो साक्षात् दिसतो व त्यांच्या अंतःकरणांत श्यामसुंदर, पीतांबरधारी, चतुर्भुज, भगवानाचें ध्यान सहज ठसतें. ४३० भक्त ज्या ध्यानानें कीर्तन करितो, तेंच ध्यान त्याच्या मनांत दृढ ठसतें व देवाचीं सर्व चिन्हें भक्ताला प्राप्त होतात. ३१ श्यामसुंदर, चतुर्भुज, पीतांबरधारी, शंखचक्रादि आयुधें हातीं धारण करणारा अशा प्रकारची ही सरूपता कीर्तनगजराला भाळून भक्ताला वरते. ३२ त्यावेळीं देव व भक्त एकरूप होतात. दोघांचें अवयव व चिन्हें एकसारखींच होतात. प्रेमानें हरिकीर्तन केलें असतां हरिभक्तांचें एवढें महात्म्य वाढतें. ३३ देव व भक्त यांना लक्ष्मी एकत्र पहाते व यांतील देव कोठला हेंहि तिला ओळखतां येत नाहीं. ब्रह्मदेव आश्चर्यानें नमस्कार करितो. कारण त्यालाहि खरा देव कोणता हें कळत नाहीं. ३४ भावानें हरिकीर्तन केल्यानें जनार्दन संतुष्ट होतो व या दोघांची अक्षय मिठी पडते. ३५ त्यावेळीं चराचरामध्यें सबाह्य अभ्यंतर देव प्रकट होतो. मग संसारामध्यें दुसरें कांहीं पहावयास उरतच नाहीं. ३६ वृत्ति स्वानंदांत निमग्न होते. मग ती परतून त्यापासून भिन्न कधीं होत नाहीं. हीच सायुज्य मुक्ति होय. त्यांत द्वैतभाव रहात नाहीं. ३७ अशा पूर्ण सायुज्यतेला प्राप्त होऊन भक्त जेव्हां हरिकथा करितो तेव्हां त्या कथेंतील तल्लीनता सर्व जीवांना प्रिय होते. ३८ याप्रमाणें चारी मुक्ति हरिकीर्तनाच्या दासी होतात. पण हरिभजनाला लुब्ध झालेले भक्त त्यांचा केव्हांहि अंगीकार करीत नाहींत. ३९ याप्रमाणें योग, याग, तप इत्यादि सर्व साधनांना हरिकीर्तनानें निराधार केलें आहे. कलियुगांत हरिकीर्तनांतील नामस्मरणानें जडजीवांचा उद्धार होतो. ४४०.

राजन्—हे राजा, कृतादिषु प्रजाः—कृत; त्रेता, द्वापर युगांतील लोक, कलौ संभवं इच्छन्ति—कलियुगांत जन्म इच्छितात. कलौ खलु नारायणपरायणाः भविष्यन्ति—कारण कलियुगांत ते नारायणपरायण होतील. ३८.

कीर्तनासाठीं चारी मुक्ती । हेचि कलियुगीं मुख्य भक्ती । यालागीं इंद्रादिक देवपंक्ती । जन्म इच्छिती कलियुगीं ॥ ४१ ॥ स्वर्ग नव्हे भोगस्थान । हें विषयांचें बंधस्थान । कलियुगीं सभाग्य जन । जन्मोनि कीर्तन हरीचें करिती ॥ ४२ ॥ तेथींच्या जन्मा देव सकाम । तेथ कृतादि युगींचे उत्तमोत्तम । प्रजा अवश्य वांछिती जन्म । कीर्तनधर्मे निजभजना ॥ ४३ ॥ कृतयुगींचे सभाग्य जन । यागीं पावले स्वर्गस्थान । तेही कलियुगींचें जाण । जन्म आपण वांछिती ॥ ४४ ॥ कृत त्रेत आणि द्वापर । तेथीलही मुख्य नर । कलियुगीं जन्म तत्पर । निरंतर वांछिती ॥ ४५ ॥ तैंचे लोक करिती गोष्टी । चारी पुरुषार्थ कीर्तनासाठीं । कलियुगीं हे महिमा मोठी । धन्य धन्य सृष्टीं कलियुग ॥ ४६ ॥ जे असती धन्यभागी । ते जन्म पावती कलियुगीं । ऐसें कलीच्या जन्मालागीं । नरसुरउरगीं उत्कंठा ॥ ४७ ॥ तरावया दीन जन । कलीमाजीं श्रीनारायण । नामें छेदी भवबंधन । तारी हरिकीर्तन सकळांसी ॥ ४८ ॥ यालागीं कलिमाजीं पाहीं । श्रद्धा हरिकीर्तनाच्या ठायीं । जन तरती सुखोपायीं । संदेहो नाहीं नृपनाथा ॥ ४९ ॥ कलियुगीं बहुसाल नर । होतील नारायणीं तत्पर । भक्तीचें भोज विचित्र । स्त्री शूद्र माजविती ॥ ४५० ॥

क्वचित् क्वचिन्महाराज द्रविडेषु च भूरिशः । ताम्रपर्णी नदी यत्र कृतमाला पयस्विनी ॥ ३९ ॥
कावेरी च महापुण्या प्रतीची च महानदी । ये पिबान्ति जलं तासां
मनुजा मनुजेश्वर । प्रायो भक्ता भविष्यान्ति वासुदेवेऽमलाशयाः ॥ ४० ॥

विशेषें द्रविड देशाचे ठायीं । अतिशयें भक्ति वाढेल पाहीं । तेणेंही तीर्थविशेष भुयी । ते ठायीं अतिउत्कट ॥ ५१ ॥ ताम्रपर्णीच्या तीरीं । हरिभक्ती अगाध थोरी । कृतमालेच्या परिसरीं । उत्साहेंकरीं हरिभक्ति नांदे ॥ ५२ ॥ निर्मळजळा पयस्विनी । जीचिये पयःप्राशनीं । वृत्ति वाढे हरिचरणीं ।

कीर्तनानें चारी मुक्ति मिळतात. कीर्तन हीच कलियुगांतील मुख्य भक्ति आहे. यासाठीं इंद्रादि देव कलियुगांत जन्म इच्छितात. ४१ स्वर्ग हें भोगाचें स्थान नव्हे, तर तें विषयाचें बंधस्थान आहे. म्हणून भाग्यवान जीव कलियुगांत जन्म घेऊन हरिकीर्तन करितात. ४२ कलियुगांतील जन्माची देवसुद्धां जर इच्छा करितात तर कृतादियुगांतील उत्तमोत्तम लोक कीर्तनधर्मानें भजन करण्यासाठीं कलियुगांत जन्म घेण्याची इच्छा करितील यांत आश्चर्य कसलें ! ४३ कृतयुगांतील ज्या भाग्यवान लोकांनीं यज्ञ करून स्वर्ग मिळविला, तेहि कलियुगांत जन्मण्याची इच्छा करितात. ४४ कृत, त्रेता व द्वापर या युगांतील प्रसिद्ध पुरुष कलियुगांत जन्म मिळावा असें निरंतर इच्छितात. ४५ त्या युगांतील लोक बोलतात कीं, चारी पुरुषार्थ कीर्तनानें मिळतात. हाच कलियुगाचा मोठा महिमा आहे. सृष्टीमध्यें कलियुग धन्य धन्य होय. ४६ जे पुण्यवान असतात तेच कलियुगांत जन्मतात. अशी कलियुगांत जन्म मिळविण्यासाठीं मनुष्य, देव, नाग यांना उत्कंठा असते. ४७ कलियुगांत दीनजनांचा उद्धार करण्यासाठीं श्रीनारायणनामस्मरणानें भवबंधाचा छेद करितो. हरिकीर्तन सर्वांना तारितें. ४८ हे राजा, यासाठीं कलीमध्यें हरिकीर्तनावर श्रद्धा ठेवण्यानें लोक सहज तरून जातात, यांत मुळींच संशय नाहीं. ४९ कलियुगांत अनेक प्रकारचे लोक नारायणतत्पर होतील, आणि स्त्री, शूद्र भक्तीचें विलक्षण माहात्म्य वाढवितील. ४५०.

महाराज—हे महाराज, क्वचित् क्वचित्-कलियुगांत इतरत्र कोठें कोठें नारायणपरायण लोक होतील. द्रविडेषु च भूरिशः-पण द्रविड देशांत मात्र पुष्कळ होतील. यत्र—ज्या द्रविड देशामध्यें, ताम्रपर्णी नदी कृतमाला पयस्विनी च महापुण्या कावेरी च महानदी प्रतीची—ताम्रपर्णी नदी, कृतमाला नदी, पयस्विनी, अतिपवित्र कावेरी व महानदी प्रतीची या पांच नद्या आहेत. मनुजेश्वर—हे राजा, ये मनुजाः तासां जलं पिबन्ति—जे मानव त्यांचें जल पितात, ते अमलाशयाः—ते शुद्धचित्त होत्साते, प्रायः वासुदेवे भक्ताः भविष्यान्ति—प्रायः वासुदेवाचे भक्त होतील. ३९–४०

द्रविड देशांत विशेषेकरून हरिभक्ति अतिशय वाढेल. त्यांतूनहि त्या देशांत तीर्थविशेषभूमि अतिशय उत्कृष्ट आहे. ५१ ताम्रपर्णी नदीच्या तीरांवरील हरिभक्तीची थोरवी अगाध आहे. कृतमालेच्या सभोंवार हरिभक्ति उत्साहानें नांदते. ५२ पयस्विनीचें निर्मल जल प्राशन केलें असतां हरिचरणाकडे वृत्ति लागते व भगवद्भजनांत

भगवद्भजनीं दृढ बुद्धी ॥ ५३ ॥ देखतां कावेरीची थडी । पळती पापांचिया कोडी । जेथ श्रीरंगु वसे आवडीं । तेथें भक्ति दुथडीं उद्भट नांदे ॥ ५४ ॥ प्रतीचीमाजीं देतां बुडी । चित्तशुद्धि जोडे रोकडी । भजन वाढे चढोवढी । भक्तीची गुढी वैकुंठीं उभारे ॥ ५५ ॥ ऐकें नरचूडामणी । या पंचनदींचिया तीर्थस्नानीं । अथवा पयःप्राशनीं । भगवद्भजनीं दृढ बुद्धी ॥ ५६ ॥ या तीर्थांचें केल्या दर्शन । होय कलिमलक्षालन । केल्या स्नान पयःप्राशन । भगवद्भजन उल्हासे ॥ ५७ ॥ दर्शन स्पर्शन स्नान । या तीर्थांचें करितां जाण । वासुदेवीं निर्मळ भजन । नित्य नूतन दृढ वाढे ॥ ५८ ॥ यापरी जे भगवभक्त । ते ऋणत्रयासी निर्मुक्त । सुरनरपितरां पंगिस्त । हरिभक्त कदा नव्हती ॥ ५९ ॥

देवर्षिभूताप्तनृणां पितॄणां न किंकरो नायमृणी च राजन् ।
सर्वात्मना यः शरणं शरण्यं गतो मुकुन्दं परिहृत्य कर्तम् ॥ ४१ ॥

शरणागतां निजशरण्यं । मुकुंदाचे श्रीचरण । सद्भावें रिघाल्या शरण । जन्ममरण बाधीना ॥ ४६० ॥ जेथ बाधीना जन्ममरण । तेथें देव ऋषी आचार्य पितृगण । यांच्या ऋणांचा पाड कोण । ते झाले उत्तीर्ण भवद्भजनें ॥ ६१ ॥ जो विनटला हरिचरणीं । तो कोणाचा नव्हे ऋणी । जेवीं परसाचिये मिळणीं । लोह काळेपणीं निर्मुक्त ॥ ६२ ॥ सकळ पापांपासूनी । सुटिजे जेवीं गंगास्नानीं । तेवीं विनटल्या हरि-चरणीं । निर्मुक्त त्रैऋणीं भगवद्भक्त ॥ ६३ ॥ भावें करितां भगवद्भक्ती । सकळ पितर उद्धरती । ऋषीश्वरां नित्य तृप्ती । भगवद्भक्ति स्वानंदें ॥ ६४ ॥ स्वानंदें भगवद्भक्ती । तेणें सर्व भूतें सुखी होती ।

बुद्धि दृढ होते. ५३ कावेरी नदीचा तीर पहातांच कोट्यवधि पापें पळून जातात. जेथें श्रीरंग आवडीनें रहातो तेथें भक्ति दोन्ही तीरांवर मोठ्या उत्कर्षानें नांदते. ५४ प्रतीची नदीमध्यें बुडी मारतांच चित्तशुद्धि सत्वर होते. भजन चढाओढीनें वाढतें आणि भक्तीचा ध्वज वैकुंठांत उभारतो. ५५ हे नृपश्रेष्ठा, ऐक. या पांच नद्यांत स्नान केल्यानें किंवा त्यांचें जल प्राशन केल्यानें भगवद्भजनाविषयीं बुद्धि दृढ होते. ५६ या तीर्थांचें दर्शन केलें असतां कलिमलाचें-पापाचें क्षालन होतें. तीर्थांत स्नान केलें असतां किंवा आचमन केलें असतां भगवद्भजनाविषयीं उल्हास वाढतो. ५७ या तीर्थांचें दर्शन, प्राशन, स्नान केलें असतां वासुदेवाच्या निर्मळ भजनाची बुद्धि नित्य अधिकच वाढत जाते. ५८ असे जे भगवद्भक्त असतात, ते तीन्ही ऋणांपासून मुक्त होतात. हरिभक्त देव, पितर व ऋषि यांच्या अधीन कधींहि नसतात. ४५९.

—विधिनिषेधातीत भक्ताची कृतकृत्यता सांगतात—

हे राजन्—हे राजा, यः कर्तं परिहृत्य—जो आपल्या कर्तव्याचा किंवा भेदाचा परिहार करून, शरण्यं मुकुंदं सर्वात्मना शरणं गतः—आश्रय करण्यास योग्य अशा मुकुंदाला शरण गेला, अयं न ऋणी—तो ऋणी नाहीं. देवर्षिभूताप्तनृणां पितॄणां न किंकरः—तो देव, ऋषि, भूतें, आप्त मनुष्यें व पितर यांचा किंकर नाहीं. [अभक्त देव, ऋषि, भूतें, आपल्या कुटुंबांतीलच पोषणीय मनुष्यें व इतर पंचयज्ञदेवता यांचा ऋणी असतो, म्हणूनच तो त्यांचा दास असतो. त्यामुळें नित्य पंचयज्ञादि करितो. पण सर्व भावानें भगवानाला शरण गेलेला भक्त तसा त्यांचा ऋणी व किंकर नसतो.] ४१.

शरणागतांना आश्रय करण्यास योग्य असे जे मुकुंदाचे श्रीचरण त्यांस सद्भावानें शरण गेलें असता जन्म-मरणाची पीडा होत नाहीं. ४६० जेथें जन्म-मरणाचा बाध नाहीं तेथें देव, ऋषि, आचार्य, पितर यांच्या ऋणाची काय कथा ! ते भगवद्भजनानेंच उद्धरून गेलेले असतात. ६१ लोखंड जसें परिसाला लागतांच त्याचा काळा रंग निघून जातो, तसा जो भक्त हरिचरणांत रंगला तो कोणचाहि ऋणी नाहीं. ६२ गंगास्नानानें सर्व पापांपासून मनुष्य जसा मुक्त होतो, तसाच भगवद्भक्त हरिचरणीं तल्लीन झाला असतां तिन्ही ऋणांपासून मुक्त होतो. ६३ सद्भावानें भगवद्भक्ति केली असतां सर्व पितरांचा उद्धार होतो. भगवद्भक्तीच्या आनंदानें ऋषीश्वर नित्य तृप्त होतात ६४ व सर्व भूतें सुखी होतात. पुत्रानें भगवद्भक्ति केली असतां आप्त व माता-पितर उद्धरून

पुत्रें केल्या भगवद्भक्ती । आप्त उद्धरती मातापितरें ।। ६५ ।। सकळ देवांचा नियंता । अतिउल्हासें त्यातें भजतां । देवऋणाची वार्ता । भगवद्भक्तां बाधीना ।। ६६ ।। ज्यांसी अनन्य भगवद्भजन । ते कदा नव्हती कर्माधीन । कर्म ज्याचे आज्ञाधीन । त्या हरीसी शरण जो झाला ।। ६७ ।। तो नव्हे कर्माचा सेवक । नव्हे देवांचा पाइक । नव्हे प्राकृताचा रंक । अनन्य भाविक हरिभक्त ।। ६८ ।। जो हरीचा शरणागत । तो कोणाचा नव्हे अंकित । कर्माकर्मीं तो अलिप्त । नित्यमुक्त ऋणत्रयासी ।। ६९ ।। वासुदेव सर्वां भूतीं । हे दृढ ठसावे प्रतीती । यालागीं अलिप्त कर्मगती । सकळऋणनिर्मुक्ती भगवद्भक्तां ।।४७०।।

स्वपादमूलं भजतः प्रियस्य त्यक्तान्यभावस्य हरिः परेशः ।
विकर्म यच्चोत्पतितं कथंचिद्धुनोति सर्वं हृदि सन्निविष्टः ।। ४२ ।।

सांडूनि देहाच्या अभिमाना । त्यजूनि देवतांतरभजना । जे अनन्य शरण हरिचरणां । ते कर्मबंधना नाकळती ।। ७१ ।। यापरी जे अनन्य शरण । तेचि हरीसी पढियंते पूर्ण । हरिप्रियां कर्मबंधन । स्वप्नींही जाण स्पर्शों न शके ।। ७२ ।। राया म्हणसी भगवद्भक्त । विहितकर्मीं नित्य निर्मुक्त । ते जरी विकर्म आचरत । तरी प्रायश्चित्त न बांधी त्यांसी ।। ७३ ।। जेवीं पंचाननाचें पिलें । न बजे मदगजांचेनि वेढिलें । तेवीं हरिप्रियीं विकर्म केलें । त्यांसी न बचे बांधिलें यमाचेनी ।। ७४ ।।

जातात. ६५ सर्व देवांचा जो नियामक प्रभु त्याचें अति उल्हासानें भजन केलें असतां भक्ताला देवऋणाची वार्ता बाधत नाहीं. ६६ जे अनन्यभावानें भगवद्भजन करितात, ते कधीं कर्मांच्या अधीन होत नाहींत. कर्मच उलट हरिशरण झालेल्या भक्ताच्या आज्ञेंत रहातें. ६७ अनन्य शरण झालेला भाविक हरिभक्त कर्मांचा सेवक, देवांचा चाकर व अज्ञ प्राकृत जनांचा दास होत नाहीं. ६८ हरीचा शरणागत कोणाच्या अंकित होत नाहीं. कर्म व अकर्मापासून तो अलिप्त असतो. ऋणत्रयापासून सदा मुक्त असतो. ६९ सर्व भूतांमध्यें वासुदेव आहे, हा आत्मसाक्षात्कार त्याच्या मनांत दृढ ठसतो. त्यामुळें तो भक्त कर्मांपासून अलिप्त रहातो. भगवद्भक्त सर्व ऋणांपासून मुक्त असतो. ४७०.

—याप्रमाणें भक्ताच्या विहित कर्मांची निवृत्ति सांगून निषेधाच्या निमित्तानें प्राप्त झालेल्या प्रायश्चित्ताचीहि निवृत्ति सांगतात—

त्यक्तान्यभावस्य—देहादि किंवा देवतान्तर यांतील भाव ज्यानें टाकिला आहे, **स्वपादमूलं भजतः**—आपल्या चरणकमलाचें भजन करणारा, **प्रियस्य**—व त्यामुळेंच स्वतःला प्रिय असलेला अशा भक्ताचें, **यत् च कथंचित् उत्पतितं विकर्म**—जे प्रमादादि कारणानें उत्पन्न झालेलें निषिद्ध कर्म, **तत् सर्वं**—त्या सर्वांचें, **हृदि सन्निविष्टः परेशः हरिः धुनोति** भक्ताच्या हृदयांत प्रविष्ट झालेला परमेश्वर हरि निवारण करितो. [अनन्य चित्तानें भजन करणाऱ्या भगवद्भक्ताची निषिद्ध प्रवृत्ति अगोदर संभवतच नाहीं. त्यांतूनहि अनवधानामुळें जरी कदाचित् त्याच्या हातून कांहीं विकर्म घडलें तरी हरि त्याचें निवारण करितो. अहोपण, यम त्याला क्षमा करणार नाहीं म्हणून म्हणाल तर तो हरि परेश आहे. म्ह० तो सर्व ईश्वरांचाहि ईश्वर आहे. 'अहोपण, श्रुति व स्मृति या माझ्याच आज्ञा आहेत,' असें भगवद्वचन असल्यामुळें भगवान् आपल्या आज्ञेचा भंग कसा सहन करील ! असें कोणीं म्हणेल म्हणून 'भक्ताच्या हृदयांत प्रवेश झालेला' असें म्हटलें आहे. वस्तूची शक्ति आपलें कार्य करितांना दुसऱ्याच्या इच्छेची अपेक्षा करीत नाहीं. असा याचा भावार्थ.] ४२.

देहाभिमान टाकून, इतर देवतांचें भजन सोडून जे हरिचरणांना अनन्य शरण होतात ते भक्त कर्मबंधनांत पडत नाहींत. ७१ याप्रमाणें जे अनन्यशरण असतात, तेच हरीचे पूर्ण आवडते होतात व हरीच्या लाडक्या भक्तांना कर्मबंधन स्वप्नांतहि स्पर्श करूं शकत नाहीं. ७२ हे राजा, भगवद्भक्त नित्य-नैमित्तिक कर्मांपासून नित्य मुक्त असतो. तो जर निषिद्ध कर्म आचरीत असला तर काय होते ? असें जर विचारशील, तर ऐक. निषिद्ध आचरण करणाऱ्या भगवद्भक्ताला प्रायश्चित्ताचाहि प्रतिबंध नाहीं. ७३ ज्याप्रमाणें सिंहाचा छावा उन्मत्त हत्तीकडूनहि वेढला जात नाहीं, त्याप्रमाणें हरिभक्तानें विकर्म जरी आचरिलें तरी यम त्याला बद्ध करूं शकत

स्मरतां एक हरीचें नाम। महापातक्यां वंदी यम। मा हरीचे पढियंते परम। तयां विकर्मे यम केवीं दंडी ॥ ७५ ॥ ॥ आशंका ॥ वेदाज्ञा विष्णूची परम। वेदें विहिले धर्माधर्म। भक्त आचरतां विकर्म। केवीं वेदाज्ञानेम न बांधी त्यांसी ॥ ७६ ॥ जेवीं रायाचा सेवक आप्त। तो द्वारपाळां नव्हे अंकित। तेथ रायाचा पढियंता सुत। त्यांचा पंगिस्त तो केवीं होय ॥ ७७ ॥ हरिनामाचें ज्यासी स्मरण। वेद त्याचे वंदी चरण। मा जो हरीचा पढियंता पूर्ण। त्यासी वेदविधान कदा न बांधी ॥ ७८ ॥ भक्तांपासूनि विकर्मस्थिती। कदा न घडे गा कल्पांतीं। अवचटें घडल्या दैवगती। त्या कर्मा निर्मुक्ति अच्युतस्मरणें ॥ ७९ ॥ बांधूं न शके कर्माकर्म। ऐसा कोण भागवतधर्म। ते भक्तीचें निजवर्म। उत्तमोत्तम अवधारीं ॥ ४८० ॥ त्यजूनि देहाभिमानवोढी। सर्वां भूतीं हरिभक्ति गाढी। तो कर्माकर्में पायीं रगडी। मुक्ति पाय झाडी निजकेशीं ॥ ८१ ॥ तो ज्याकडे कृपादृष्टीं पाहे। त्याचें निर्दळे भवभये। तो जेथ म्हणे तेथ राहे। लवलाहें भक्ति हरीची ॥ ८२ ॥ त्याचेनि अनुग्रहकरीं। देव प्रगटे दीनाच्या अंतरीं। त्याच्या कर्माकर्मांची बोहरी। स्वयें श्रीहरी करूं लागे ॥ ८३ ॥ जेवीं प्रगटल्या दिनमणी। अंधार जाय पळोनी। राम प्रगटल्या हृदयभुवनीं। कर्माकर्मधुणी सहजची ॥ ८४ ॥ भगवंताची नामकीर्ती। याचि नामें परम भक्ति। भक्तीपाशीं चारी मुक्ति। दासीत्वें बसती नृपनाथा ॥ ८५ ॥ ऐकोनि भक्तीची पूर्ण स्थिती। रोमांचित झाला नृपती। आनंदाश्रु नयनीं येती। सुखावलिया वृत्ती डुल्लतु ॥ ८६ ॥ सांगतां वैदेहाची स्थिती। नारदु सुखावे निजचित्तीं। तो उल्हासें वसुदेवाप्रती। सांगे समाप्ति इतिहासाची ॥ ८७ ॥

नारद उवाच—धर्मान्भागवतानित्थं श्रुत्वाऽथ मिथिलेश्वरः।
जायन्तेयान् मुनीन् प्रीतः सोपाध्यायो ह्यपूजयत् ॥ ४३ ॥

नाहीं. ७४ हरिनामाचें स्मरण करणाऱ्या महापातक्यालाहि यम वंदन करितो. मग जे हरीचे आवडते भक्त त्यांना विकर्मासाठीं यम कसा दंड करील ! ७५ अहोपण, वेद ही विष्णूची श्रेष्ठ आज्ञा आहे. वेदानें धर्म-अधर्म सांगितले आहेत. असें असतां भक्त जर निषिद्ध आचरण करूं लागला तर वेदाज्ञा त्याला कशी बाधत नाहीं ? ७६ अहो ! राजाचा प्रिय सेवकहि जर द्वारपाळांच्या अंकित होत नाहीं, तर राजाचा आवडता मुलगा त्यांच्या अंकित कसा होणार ! ७७ हरिनामाचें स्मरण करणाऱ्या भक्ताच्या चरणांना वेद वंदन करितो. मग जो हरीचा अत्यंत आवडता भक्त त्याला वेदाज्ञा बंध कसा करणार ! ७८ भक्तांच्या हातून निषिद्ध आचरण कल्पांतींहि घडत नाहीं. कदाचित् दैवयोगानें कधींकाळीं घडलेंच तर तो अच्युतस्मरणानें त्या कर्मापासून मुक्त होतो. ७९ कर्म-अकर्महि बांधूं शकत नाहीं. असा भागवतधर्म कोणता ? म्हणून विचारशील तर हे नृपश्रेष्ठा, त्या भक्तीचें उत्तम वर्म ऐक. ४८० ज्यानें देहाभिमान टाकिला आहे, ज्याची सर्व भूतांमध्यें दृढ हरिभक्ति आहे. तो भक्त कर्म-अकर्माला पायाखालीं चिरडून टाकितो. मुक्ति आपल्या केशानें त्याचे पाय झाडिते. ८१ तो ज्याच्याकडे कृपादृष्टीनें पहातो, त्याचें भवभय नाहींसें होतें. तो म्हणेल तेथें हरिभक्ति उभी रहाते. ८२ त्याचा अनुग्रह होतांच देव दीनजनांच्या हृदयांत प्रकट होतो आणि स्वतः श्रीरंग त्यांच्या कर्माचें भस्म करूं लागतो. ८३ सूर्योदय होतांच अंधार जसा पळून जातो, तसाच राम हृदयांत प्रकट झाला असतां कर्म-अकर्माचा सहजच निरास होतो. ८४ भगवंताचें नामसंकीर्तन हीच परम भक्ति होय. भक्तीजवळ चारहि मुक्ति दासी होऊन रहातात. ८५ भक्तांची अशी पूर्ण स्थिति ऐकून राजा रोमांचित झाला. नेत्र आनंदाश्रूंनीं भरले. आनंदानें तो डोलूं लागला. ८६ वैदेहाचें वर्णन करीत असतां नारदालाहि फार हर्ष झाला. तो वसुदेवाला उल्हासानें इतिहासाची समाप्ति सांगूं लागला. ४८७.

नारदः उवाच—नारद म्हणाला,—इत्थं भागवतान् धर्मान् श्रुत्वा—याप्रमाणें भागवतधर्म ऐकून, अथ सोपाध्यायः हि मिथिलेश्वरः प्रीतः—त्यानंतर उपाध्यायासहवर्तमानच जनकराजा संतुष्ट होऊन, जायंतेयान् मुनीन् अपूजयत्—जयंतीपुत्र मुनींची पूजा करिता झाला. ४३.

नारद इतिहास सांगतु । तेवींच आनंदें डुल्लतु । तेणे आनंदें बोलतु । भक्तीचें मथितु वसुदेवाप्रती ॥ ८८ ॥ यापरी जयंतीसुतीं । भगवंताची उद्भट भक्ती । सांगितली परम प्रीतीं । मिथिलेशाप्रती निजबोधें ॥ ८९ ॥ एकोनि त्याचिया वचना । सुख जालें विदेहाचिया मना । मग अतिप्रीतीं पूजना । जयंतीनंदनां पूजिता झाला ॥ ४९० ॥ श्रवणें जाली अतिविश्रांती । तेणें पूजेलागीं अतिप्रीती । विदेहा उल्हासु चित्तीं । स्वानंदस्थितीं पूजिता झाला ॥ ९१ ॥ पूजेचा परम आदरु । जयंतीनंदनां केला थोरू । उपाध्याय जो अहल्याकुमरु । तेणेंही अत्यादरु पूजेसी केला ॥ ९२ ॥

ततोऽन्तर्दधिरे सिद्धाः सर्वलोकस्य पश्यतः । राजा धर्मानुपातिष्ठन्नवाप परमां गतिम् ॥ ४४ ॥

यापरी ते भागवतश्रेष्ठ । नवही जाण अतिवरिष्ठ । समस्तांदेखतांचि स्पष्ट । झाले अदृष्ट ऊर्ध्वगमनें ॥ ९३ ॥ ते भागवतधर्मस्थिती । अनुष्ठूनि भगवद्भक्ती । राजा पावला परम गती । पूर्णप्राप्ती निजबोधें ॥ ९४ ॥ भावें करितां भगवद्भक्ती । देहीं प्रगटे विदेहस्थिती । ते पावोनि जनक नृपती । परम विश्रांती पावला ॥ ९५ ॥

त्वमप्येतान्महाभाग धर्मान् भागवतान् श्रुतान् । आस्थितः श्रद्धया युक्तो निःसङ्गो यास्यसे परम् ॥ ४५ ॥

सकळ भाग्यांचिया पंक्ती । जेथें ठाकल्या येती विश्रांती । ते वासुदेवा भाग्यस्थिती । तुझ्या घराप्रती क्रीडत ॥ ९६ ॥ वसुदेवा तुझेनि नांवें । देवातें वासुदेव म्हणावें । तेणें नामाचेनि गौरवें । जनांचे आघवे निरसती दोष ॥ ९७ ॥ येवढ्या भाग्याचा भाग्यनिधी । वसुदेवा तूंचि त्रिशुद्धी । तुवां भागवतधर्माचा विधी । आस्तिक्यबुद्धी अवधारिला ॥ ९८ ॥ श्रद्धेनें केलिया वस्तुश्रवणा । मननयुक्त

नारद आनंदानें डुलूं लागला. हर्षानें वसुदेवाला भक्तीचें रहस्य सांगूं लागला. ८८ याप्रमाणें जयंतीसुतानें विदेहदेशाच्या राजाला स्वानुभवयुक्त उत्कट भगवद्भक्ति परम प्रीतीनें सांगितली. ८९ त्याचें वचन ऐकून राजा जनक फार संतोषला व त्यानें अतिशय प्रेमानें जयंतीनंदनांचें पूजन केलें. ४९० त्याचें श्रवणानें अत्यंत समाधान झालें. त्यामुळें राजाला पूजा करण्यास अतिशय उल्हास वाटला व निजानंदानें त्यानें पूजा केली. ९१ जयंतीनंदनांनीं मोठ्या आदरानें पूजेचा स्वीकार केला. अहल्येचा पुत्र जो शतानंद, जनकाचा पुरोहित त्यानेंहि अति आदरानें त्यांची पूजा केली. ४९२.

ततः—त्यानंतर, सिद्धाः—ते सिद्ध, सर्वलोकस्य पश्यतः—सर्व लोक पहात असतां, अन्तर्दधिरे—अंतर्धान पावले. धर्मान् उपातिष्ठन् राजा—आणि धर्माचें अनुष्ठान करणारा राजा, परमां गतिं अवाप—परमगतीला प्राप्त झाला. ४४.

याप्रमाणें ते अति श्रेष्ठ नऊहि भगवद्भक्त सर्व सभाजन पहात असतां आकाशमार्गानें अंतर्धान पावले. ९३ त्यांनीं वर्णिलेली भगवद्भक्ति आचरून राजा परमगतीला गेला. त्याला आत्मबोधाची पूर्ण प्राप्ति झाली. ९४ श्रद्धेनें भगवद्भक्ति केली असतां जी विदेहावस्था प्राप्त होते, त्या स्थितीला प्राप्त होऊन जनकराजा परम विश्रांतीचा अनुभव घेऊं लागला. ४९५.

हे महाभाग—महाभाग वसुदेवा, त्वं अपि एतान् श्रुतान् भागवतान् धर्मान् आस्थितः—तूं सुद्धां या श्रवण केलेल्या भागवतधर्मांचें अनुष्ठान करून, श्रद्धया युक्तः— श्रद्धेनें युक्त होऊन, निसङ्गः—सर्व आसक्तिशून्य होऊन, परं यास्यसे-परमात्म्याला प्राप्त होशील. ४५.

हे वसुदेवा, सर्व भाग्यांच्या पंक्ति जेथें नेमक्या विश्रांति घेण्यास येतात, ती भाग्यस्थिति तुझ्या घरांत खेळत आहे. ९६ तुझ्या वसुदेव या नांवावरून देवाला वासुदेव हें नांव प्राप्त झालें. त्या नांवाच्या महात्म्यानें लोकांचे सर्व दोष नाश पावतात. ९७ एवढ्या मोठ्या भाग्याचा ठेवा हे वसुदेवा, खरोखर तूंच आहेस. तूं भागवतधर्माचा विधि भक्तिपूर्वक ऐकिला आहेस. ९८ श्रद्धेनें सद्वस्तूचें श्रवण करून मननयुक्त धारणा धरल्यास

धरावी धारणा। तैं निःसंग होऊनियां जाणा। पावसी तत्क्षणा निजधामासी ॥ ९९ ॥ जया निजधामाच्या ठायीं। कार्य कारण दोन्ही नाहीं। त्या परम पदाचें ठायीं। निजसुखें पाहीं सुखरूप होसी ॥ ५०० ॥

युवयोः खलु दम्पत्योर्यशसा पूरितं जगत् । पुत्रतामगमद्यद्वां भगवानीश्वरो हरिः ॥ ४६ ॥

तुम्हां दांपत्याचिये कीर्ती। यशासी आली श्रीमंती। तुमचें यश त्रिजगतीं। परमानंदें क्षिती परिपूर्ण झाली ॥ १ ॥ ज्यालागीं कीजे यजन। ज्यालागीं दीजे दान। ज्यालागीं कीजे तपाचरण। योगसाधन ज्यालागीं ॥ २ ॥ जो न वर्णवे वेदां शेषा। जो दुर्लभ सनकादिकां। त्या पुत्रत्वें यदुनायका। उत्संगीं देखा खेळविसी ॥ ३ ॥ जो कळिकाळाचा निजशास्ता। जो ब्रह्मादिकांचा नियंता। जो संहारकाचा संहर्ता। जो प्रतिपाळिता त्रिजगतीं ॥ ४ ॥ जो सकळ भाग्यांचें भूषण। जो सकळ मंडणां मंडण। षड्गुणांचें अधिष्ठान। तो पुत्रत्वें श्रीकृष्ण सर्वांगीं लोळे ॥ ५ ॥

दर्शनालिङ्गनालापैः शयनासनभोजनैः। आत्मा वां पावितः कृष्णे पुत्रस्नेहं प्रकुर्वतोः ॥ ४७ ॥

परब्रह्ममूर्ती श्रीकृष्ण। सादरें करितां अवलोकन। तेणें दृष्टी होय पावन। डोळ्यां संपूर्ण सुखावबोधु ॥ ६ ॥ कृष्णमुखींचीं उत्तरें। प्रवेशतां कर्णद्वारें। पवित्र झालीं कर्णकुहरें। कृष्णकुमरें अनुवादें ॥ ७ ॥ आळवितां श्रीकृष्ण कृष्ण। अथवा कृष्णेंसीं संभाषण। तेणें वाचा झाली पावन। जैसें गंगा-

---

तूं निःसंग होऊन तत्काल परमपदाला प्राप्त होशील. ९९ त्या परमपदांत कार्यकारणभाव दोन्ही नाहींत. त्या परमपदामध्यें तूं निजसुखाचा अनुभव घेऊन सुखरूप होशील. ५००.

—' ही केवल शास्त्रप्रक्रिया सांगितली आहे. परंतु तुम्ही दोघें तर आसक्तीनेंच कृतार्थ झाला आहां' असें नारद सांगतो—

युवयोः खलु दम्पत्योः यशसा—खरोखर तुम्हां पतिपत्नींच्या यशानें, जगत् पूरितं— जगत् भरून गेलें आहे, यत्-कारण कीं, भगवान् ईश्वरः हरिः–षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वर हरि, वां पुत्रतां अगमत्—तुम्हां दोघांच्या पुत्रत्वाला प्राप्त झाला आहे. ४६.

तुम्हां उभयतांच्या कीर्तीनें यशाला श्रीमंती आली आहे. तुमचें यश त्रिभुवनांत पसरलें आहे. परमानंदानें ही पृथ्वीहि परिपूर्ण भरली आहे. १ ज्याच्यासाठीं यज्ञयाग करावयाचा, ज्याच्यासाठीं दान द्यावयाचें, ज्याच्यासाठीं तप आचरावयाचें, ज्याच्यासाठीं योगसाधन करावयाचें, २ ज्याचें वर्णन वेदाला व शेषालाहि करवत नाहीं व जो सनकादिकांसहि दुर्लभ, त्याला हे यदुनायका! तूं पुत्राच्या नात्यानें मांडीवर खेळवीत आहेस. ३ जो कळिकाळाला शासन करणारा, जो ब्रह्मादिकांचें नियमन करणारा, जो यमाचा संहार करणारा व त्रैलोक्याचा पालन करणारा, सर्व भाग्यांचें भूषण, सर्व मंडणांचें मंडण, महागुणांचा आधार तो श्रीकृष्ण पुत्र या भावनेनें तुझ्या सर्वांगावर लोळतो! ५०५.

—' इतरांप्रमाणें तुम्हां दोघांना सर्वकर्मार्पणादि भागवतधर्मांनीं चित्तशुद्धि संपादन करावयास नको. कारण पुत्राच्या पालनपोषणानेंच तुम्हांला भागवतधर्मसर्वस्वाची प्राप्ति झाली आहे' असें नारद पुढील श्लोकांत म्हणतो—

कृष्णे पुत्रस्नेहं प्रकुर्वतोः वां—कृष्णावर पुत्र म्हणून स्नेह करणाऱ्या तुम्हां उभयतांच्या, दर्शनालिङ्गनालापैः शयनासनभोजनैः—दर्शन, अलिंगन, संभाषण, निजविणें, बसविणें, जेवूं घालणें इत्यादि उपायांनीं, आत्मा पावितः—तुमचें चित्त शुद्ध झालें आहे. ४७.

परब्रह्ममूर्ति श्रीकृष्णाचें आदरानें अवलोकन केलें असतां दृष्टि पावन होते व नेत्रांना सुखाचा अनुभव येतो. ६ कृष्णाच्या मुखांतील शब्द कानीं पडतांच कर्णरंध्रें पवित्र होतात. ७ संतप्ताला जसें गंगाजल शांत करितें, तसें श्रीकृष्णाला ' कृष्ण कृष्ण ' असें आळविलें असतां, किंवा कृष्णाशीं संभाषण केलें असतां वाणी

जीवन संतप्तां ॥ ८ ॥ नाना यागविधीं यजिती ज्यातें । तेथ न घे जो अवदानातें । तो वारितांही दोहीं हातें । बैसे सांगातें भोजनीं कृष्ण ॥ ९ ॥ जो दुर्लभु योगयागीं । तो वेळ राखे भोजनालागीं । मुखींचें शेष दे तुम्हांलागीं । लागवेगीं बाललीला ॥ ५१० ॥ तेणें संतप्तसंतोखी । तोही ग्रास घाली तुम्हां मुखीं । तुम्हांऐसें भाग्य त्रिलोकीं । नाहीं आणिकीं अर्जिलें ॥११॥ तेणें कृष्णशेषामृतें । रसना विटों ये अमृतातें । मा इतर रसा गोड तेथें । कोण म्हणतें म्हणावया ॥ १२ ॥ तेणें श्रीकृष्णरसशेषें । अंतर-शुद्धि अनायासें । जें नाना तपसायासें । अतिप्रयासें न लभे कदा ॥ १३ ॥ देतां कृष्णासी चुंबन । तेणें अवघ्राणें घ्राण पावन । चुंबितांचि निवे मन । स्वानंदपूर्ण उल्हासे ॥ १४ ॥ तुम्हां बैसले देखे आसनीं । कृष्ण सवेग ये धांवोनी । मग अंकावरी बैसोनि । निजांगमिळणीं निववी कृष्णु ॥ १५ ॥ तेणें श्रीकृष्णाचेनि स्पर्शें । सर्वेंद्रियीं कामु नासे । तेणें कर्मेंचि अनायासें । होय आपैसें निष्कर्म ॥ १६ ॥ सप्रेम भावें संलग्न । देतां श्रीकृष्णासी आलिंगन । तेणें देहाचें देहपण । मीतूंस्फुरण हारपे ॥ १७ ॥ शयनाच्या समयरूपीं । जना गाढ मूढ अवस्था व्यापी । ते काळीं तुह्मां समीपीं । कृष्ण सद्रूपीं संलग्न ॥ १८ ॥ योगी भावना भावून । कर्म कल्पिती कृष्णार्पण । तुमचीं सकळ कर्मं जाण । स्वयें श्रीकृष्ण नित्य भोक्ता ॥ १९ ॥ पुत्रस्नेहाचेनि लालसें । सकळ कर्मं अनायासें । स्वयें श्रीकृष्ण सावकाशें । परम उल्हासें अंगीकारी ॥ ५२० ॥ तुमची पवित्रता सांगों कैसी । पवित्र केलें यदु-वंशासी । पुत्रत्वें लाळूनि श्रीकृष्णासी । जगदुद्धारासी कीर्ति केली ॥ २१ ॥ नाम घेतां वसुदेवसूनु । स्मरतां देवकीनंदनु । होय भवबंधनच्छेदनु । ऐसें पावनु नाम तुमचें ॥ २२ ॥ तुम्ही तरा अना-यासीं । हें नवल नव्हे विशेषीं । केवळ जे कां कृष्णद्वेषी । ते वैरी अनायासीं विरोधें तरती ॥ २३ ॥

पावन होते. ८ ज्याला अनेक प्रकारें यज्ञ करून पूजितात, तेथें जो यज्ञभाग घेत नाहीं, तोच श्रीकृष्ण दोन्ही हातांनीं निवारण केलें तरी तुमच्या बरोबर जेवायला येऊन बसतो. ९ जो यज्ञयागानेंहि दिसणें दुर्मिळ, तो भगवान् श्रीकृष्ण जेवणाच्या वेळेसाठीं टपून बसतो आणि तोंडांतलें उष्टें बाललीलेनें तुम्हांला देतो. ५१० त्रिविध-तापांचा उपशम करणारा तो तुमच्या तोंडांत घांस देतो. तुमच्यासारखें भाग्य तिन्ही लोकांत दुसऱ्या कोणालाहि लाधलें नाहीं. ११ त्या कृष्णाच्या मुखांतील अवशिष्ट अमृतानें जिव्हेला खऱ्या अमृताचाहि वीट येतो. मग त्या-पुढें इतर रसांना गोड कोण म्हणणार ! १२ जी चित्तशुद्धि अतिप्रयासानें व विविध तपानेंहि कधीं प्राप्त होत नाहीं, ती श्रीकृष्णरसशेषानें अनायासें प्राप्त होते. १३ श्रीकृष्णाला चुंबन दिलें असतां मन पूर्ण स्वानंदानुभव घेतें. त्याचें अवघ्राण केलें असतां घ्राण पावन होतें. १४ तुम्हांला आसनावर बसलेलें पाहून श्रीकृष्ण गडबडीनें धांवत येतो व मांडीवर बसून आपल्या आलिंगनानें तुह्मांला तृप्त करितो. १५ श्रीकृष्णाच्या स्पर्शानें सर्व विषयवासना नाहींशा होतात, आणि त्या कर्मानेंच आपोआप निष्कर्म होतें. १६ भक्तीनें श्रीकृष्णाला कडकडून अलिंगन दिलें असतां, देहावरील ममत्व, अहंबुद्धि व आपपर भाव नाहींसे होतात. १७ झोपेमध्यें इतर जनांना गाढ मूढ अवस्था व्यापिते, पण त्यावेळींहि श्रीकृष्ण आपल्या सद्रूपानें तुमच्याशीं संबद्ध असतो. १८ योगी आपल्या भावनेनें सर्व कर्में कृष्णार्पण केलीं आहेत, असें कल्पितात; पण तुमचीं सर्व कर्में श्रीकृष्ण स्वतः नित्य भोगितो. १९ पुत्र-प्रेमाच्या आवडीनें श्रीकृष्ण अनायासें सर्व कर्में मोठ्या उल्हासानें स्वीकारितो. ५२० तुमच्या पवित्रतेचें काय वर्णन करावें ? तुम्हीं श्रीकृष्णाचें पुत्राच्या भावनेनें लालनपालन करून यदुवंश पावन केलात व जगाच्या उद्धारासाठीं कीर्ति केलीत. २१ वसुदेवपुत्राचें नांव घेतांच व देवकीनंदनाचें स्मरण करितांच भवबंधनाचा छेद होतो, असें तुमचें नांव पवित्र आहे. २२ तेव्हां तुम्ही अनायासें तरून जाल यांत कांहीं आश्चर्य नाहीं. पण श्रीकृष्णद्वेष्टेहि विरोधी भक्तीनें सहज तरून जातात. ५२३.

वैरेणे यं नृपतयः शिशुपालपौण्ड्रशाल्वादयो गतिविलासविलोकनाद्यैः ।
ध्यायन्त आकृतधियः शयनासनादौ तत्साम्यमापुरनुरक्तधियां पुनः किम् ॥ ४८ ॥

शिशुपाल दंतवक्त्र । पौंड्रकशाल्वादि महावीर । कृष्णासीं चालविती वैर । द्वेषें मत्सरें ध्यान करिती ॥ २४ ॥ घनश्याम पीतांबर कटे । विचित्रालंकारीं कृष्णु नटे । गदादि आयुधीं ऐसा वेठे । अतिबळें तगटे रणभूमीसी ॥ २५ ॥ ऐसें वैरवशें उद्भट । कृष्णध्यान उत्कट । ते वैरभावें वरिष्ठ । तद्रूपता स्पष्ट पावले द्वेषें ॥ २६ ॥ कंसासी परम भय जाण । अखंड लागलें श्रीकृष्णध्यान । अन्नपान शयनासन । धाकें संपूर्ण श्रीकृष्ण देखे ॥ २७ ॥ कंसासुर भयावेशें । शिशुपाळादिक महाद्वेषें । सायुज्य पावले अनायासें । मा श्रद्धाळु कैसें न पावती मोक्ष ॥ २८ ॥ तुम्ही तरी परम प्रीती । चित्तें वित्तें आत्मशक्ती । जीवें वोवाळां श्रीपती । पायां ब्रह्मप्राप्ती तुमच्या लागे ॥ २९ ॥ पूर्ण प्राप्ती तुम्हांपासीं । ते तुमची न कळे तुम्हांसी । बाळक मानितां श्रीकृष्णासी । निजलाभासी नाडणें ॥ ५३० ॥

माऽपत्यबुद्धिमकृथाः कृष्णे सर्वात्मनीश्वरे । मायामनुष्यभावेन गूढैश्वर्ये परेऽव्यये ॥ ४९ ॥

तुम्ही बाळकु माना श्रीकृष्ण । हा भावो अतिकृपण । तो परमात्मा परिपूर्ण । अवतरला निर्गुण कृष्णावतारें ॥ ३१ ॥ यासी झणें म्हणाल लेंकरूं । हा ईश्वराचा ईश्वरू । सर्वात्मा सर्वेश्वरू । योगियां

—नारद वसुदेव व देवकी यांचें चित्तशोधन कैमुतिक न्यायानें स्पष्ट करितो—

शिशुपाल-पौण्ड्र-शाल्वादयः नृपतयः—शिशुपाल, पौण्ड्र, शाल्व इत्यादि राजे, **यं**—ज्या श्रीकृष्णाचें, **शयन-आसनादौ**—शय्येवर निजले असतां, आसनावर बसले असतां, **वैरेण**—वैरानेंहि, **ध्यायन्तः**—ध्यान करीत होत्साते व, **गति-विलास-विलोकनाद्यैः**—कृष्णाची गति, विलास, अवलोकन इत्यादिकांनीं, **आकृतधियः**—ज्यांची बुद्धि तत्तदाकार झाली असे होत्सातेहि जर, **तत्साम्यं आपुः**—कृष्णाच्या सारूप्याला प्राप्त झाले आहेत तर मग, **किं पुनः अनुरक्तधियाम्**—ज्यांची बुद्धि श्रीकृष्णावर अनुरक्त आहे त्यांना त्याचें सारूप्य प्राप्त झाल्यास आश्चर्य कसलें ? ४८.

शिशुपाल, दंतवक्त्र, पौण्ड्र, शाल्व इत्यादि महावीर श्रीकृष्णाशीं वैर करून मत्सरानें व द्वेषानें त्याचें ध्यान करितात. २४ घनश्याम, पीतांबरधारी, विचित्र अलंकारांनीं नटलेला, गदादि आयुधांनीं सज्ज झालेला असा श्रीकृष्ण आपल्या अतुल सामर्थ्यानें रणभूमीवर उभा रहातो. २५ अशा उत्कट वैरानें ते महावैरी त्याचें निरंतर ध्यान करीत असूनहि त्याच्या द्वेषानेंच ते तद्रूपास प्राप्त झाले. २६ कंसाला परम भयानें श्रीकृष्णाचें अखंड ध्यान लागलें, त्याला धाकामुळें आसनीं, भोजनीं, शयनीं सर्वत्र श्रीकृष्ण दिसूं लागला. २७ भयामुळें कंसादि असुर व तीव्रद्वेषामुळें शिशुपाळादि राजे सायुज्य मुक्तीला अनायासें प्राप्त झाले. मग श्रद्धाळु भक्त मुक्त कसे होणार नाहींत ? २८ तुम्ही तर परमप्रीतीनें तन, मन व धन श्रीपतीवरून ओवाळून टाकीत आहांत, त्यामुळें ब्रह्मप्राप्ति तुमच्या पायांशीं लोटांगण घालीत आहे. २९ तुमच्यापाशींच पूर्णप्राप्ति आहे. पण ती तुमची तुम्हांलाच कळत नाहीं. श्रीकृष्णाला तुम्ही बाळक समजतां, पण हें स्वार्थाला मुकणेंच आहे. ५३०.

—'अहोपण, पुत्रावरील प्रेम जर मोक्षाचें साधन असेल तर सर्वच मुक्त होतील' अशी आशंका घेऊन नारद म्हणतो—

सर्वात्मनि ईश्वरे कृष्णे अपत्यबुद्धिं मा अकृथाः—सर्व भूतांचा आत्मा व ईश्वर अशा कृष्णामध्यें तूं 'हा माझा पुत्र आहे' अशी बुद्धि ठेवूं नकोस. (तो श्रीकृष्ण कसा ?) **मायामनुष्यभावेन गूढैश्वर्ये परे अव्यये**—आपल्या मायाख्य अचिन्त्य शक्तीनें मनुष्यभावानें ज्यानें आपले ऐश्वर्य गुप्त ठेविलें आहे, अशा अव्यय व परात्पर कृष्णावर तूं अपत्य स्नेह ठेवूं नकोस. ४९.

तुम्ही श्रीकृष्णाला बाळक मानितां, पण ही भावना अति क्षुद्र आहे. कारण तो निर्गुण परमात्माच कृष्णरूपानें अवतरला आहे. ३१ त्याला तुम्ही कदाचित् लेंकरूं म्हणाल, पण तो ईश्वराचाहि ईश्वर, सर्वात्मा,

योगींदु श्रीकृष्ण स्वामी ॥ ३२ ॥ हा अविकारु अविनाशु । परात्परु परमहंसु । इंद्रियनियंता हृषीकेशु । जगन्निवासु जगदात्मा ॥ ३३ ॥ मायामनुष्यवेषाकृती । हा भासताहे सकळांप्रती । गूढऐश्वर्य महामूर्ती । व्यापक त्रिजगतीं गुणातीतु ॥ ३४ ॥

भूभारासुरराजन्यहंतवे गुप्तये सताम् । अवतीर्णस्य निर्वृत्यै यशो लोके वितन्यते ॥ ५० ॥

काळयवनादि असुर । कां जरासंधादि महावीर । अथवा राजे अधर्मकर । अतिभूभार सेना ज्यांची ॥ ३५ ॥ तो उतरावया धराभार । धर्म वाढवावया निर्विकार । संतसंरक्षणीं शार्ङ्गधर । पूर्णावतार श्रीकृष्ण ॥ ३६ ॥ प्रतिपाळावया निजभक्तांसी । सुख द्यावया साधूंसी । अवतरला यदुवंशीं । हृषीकेशी श्रीकृष्ण ॥ ३७ ॥ तो असुरगजपंचाननु । सज्जनवनआनंदघनु । तुमच्या उदरीं श्रीकृष्णु । अवतार पूर्णु पूर्णांशेंसीं ॥ ३८ ॥ उद्धरावया त्रिजगती । थोर उदार केली कीर्ती । ज्याच्या अवताराची ख्याती । पवाडे पढती ब्रह्मादिक ॥ ३९ ॥ तरावया अतिदुस्तर । ज्याची कीर्ति गाती सुरनर । परमादरें ऋषीश्वर । कृष्णचरित्र सर्वदा गाती ॥ ५४० ॥ ज्याचें नाम स्मरतां भक्त । कळिकाळ नागवत । तो अवतार श्रीकृष्णनाथ । तुम्हांआंत प्रगटला ॥ ४१ ॥ श्रीकृष्ण परब्रह्मैकनिधी । त्यासी पाहूं नका बाळबुद्धी । इतुकेन तुम्ही भवाब्धी । जाणा त्रिशुद्धी तरलेती ॥ ४२ ॥ ऐसी श्रीकृष्ण अवतारकथा । नारद वसुदेवा सांगतां । शुक म्हणे गा नृपनाथा । विस्मयो समस्तां थोर झाला ॥ ४३ ॥

शु० उ०— एतच्छ्रुत्वा महाभागो वसुदेवोऽतिविस्मितः । देवकी च महाभागा जहतुर्मोहमात्मनः ॥ ५१ ॥

सर्वेश्वर, योग्यांचा योगींद्र, असा श्रीकृष्ण प्रभु आहे. ३२ तो विकारशून्य, अविनाशी, परात्पर, परमहंस, इंद्रियांचें नियमन करणारा हृषीकेश, जगन्निवास, जगदात्मा, ३३ मायेनें सर्वांना मनुष्यरूपधारी भासत आहे. त्याचें ऐश्वर्य गूढ आहे. तो आपल्या गुणातीत व्यापक स्वरूपानें सर्व जगाला व्यापितो. ५३४.

—'पण ईश्वर मानुष कसा होईल ? तसेंच जगदुत्पत्यादि करणाऱ्या त्या ईश्वराचें पूतनाशोषणादि कर्म एखाद्या आश्चर्यासारखें कसें निरूपिलें जातें ? ' अशी आशंका घेऊन नारद म्हणतो—

भूभारासुरराजन्यहंतवे—भूभारभूत असुर, हेच क्षत्रिय राजे, त्यांना मारण्यासाठीं, सतां गुप्तये निर्वृत्यै च—सज्जनांच्या रक्षणासाठीं व मोक्षासाठीं, अवतीर्णस्य यशः लोके वितन्यते— अवतीर्ण झालेल्या त्याचें यश लोकामध्यें विस्तारिलें जातें. ५०.

काळयवनादि असुर, जरासंधादि महावीर, अधर्माचरणी राजे व त्यांची सेना भूमीला अत्यंत भारभूत झाली होती. ३५ तो पृथ्वीचा भार उतरण्यासाठीं, निर्विकार धर्म वाढविण्यासाठीं व संतांचें रक्षण करण्यासाठीं शार्ङ्गधर पूर्णावतार श्रीकृष्ण आहे. ३६ आपल्या भक्तांचें रक्षण करण्यासाठीं, साधूंना सुखविण्यासाठीं यदुवंशांत हृषीकेश श्रीकृष्ण अवतरला आहे. ३७ तो असुररूपी हत्तींचा नाश करणारा सिंह, सज्जनरूपी वनावर आनंदाचा वर्षाव करणारा मेघ, तुमच्या उदरीं आपल्या पूर्णांशानें अवतीर्ण झाला आहे. ३८ ज्यानें तिन्ही लोकांचा उद्धार करण्यासाठीं फार मोठी कीर्ति केली, त्याच्या अवताराची ख्याति ब्रह्मदेवादिकहि स्तवितात, ३९ अति दुस्तर असा हा संसारसागर तरून जाण्यासाठीं ज्याची कीर्ति मनुष्यें गातात, ऋषीश्वर मोठ्या आदरानें श्रीकृष्णचरित्र वर्णितात, ५४० ज्याचें नामस्मरण करितांच भक्तांचा कळिकाळ नाश पावतो, तो श्रीकृष्णनाथ तुम्हांमध्यें प्रकट झाला. ४१ श्रीकृष्ण परब्रह्मरूप ठेवा आहे. त्याच्या ठिकाणीं बालकाची भावना ठेवूं नका. खरोखर तुम्ही येवढ्यानेंच संसारसागर तरून जाल. ४२ याप्रमाणें श्रीकृष्णावताराची कथा नारदानें वसुदेवाला सांगितली असतां, हे राजा, शुकाचार्य म्हणतात कीं, ती ऐकून सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें. ५४३.

श्रीशुकः उवाच—श्रीशुकाचार्य म्हणाले, एतत् श्रुत्वा—हें ऐकून, महाभागः वसुदेवः अतिविस्मितः—महाभाग्यवान् वसुदेव अतिशय विस्मित झाला. महाभागा देवकी च—आणि महाभाग्यवती देवकीहि विस्मित झाली. तौ आत्मनः मोहं जहतुः—त्या दोघांनीं आपला मोह टाकिला. ५१.

निमिजायंत मुनिगण । इतिहास पुरातन जीर्ण । कृष्ण परमात्मा ब्रह्म पूर्ण । नारद आपण निरूपी हर्षे ॥ ४४ ॥ शुक ह्मणे परीक्षिती । ऐकोनि नारदवचनोक्ती । देवकीवसुदेवो चित्तीं । अतिविस्मितीं तटस्थ ॥४५॥ तया नारदाचेनि वचनें । कृष्ण परमात्मा बोलें येणें । देवकी वसुदेव निजमनें । दोघें जणें विस्मित ॥ ४६ ॥ तीं परम भाग्यवंत दोन्ही । जो पुत्रस्नेहो होता श्रीकृष्णीं । तो सांडोनियां तत्क्षणीं । कृष्णपरब्रह्मपणीं निश्चयो केला ॥ ४७ ॥ श्रीकृष्णीं ब्रह्मभावो । धरितां निःशेष मोहस्नेहो । हृदयींचा निघोनि गेला पहा हो । ब्राप नवलावो भाग्याचा ॥ ४८ ॥

इतिहासमिमं पुण्यं धारयेद्यः समाहितः । स विधूयेह शमलं ब्रह्मभूयाय कल्पते ॥ ५२ ॥

जो निमिजायंतसंवादु । वसुदेवा सांगे नारदु । हा इतिहास अतिशुध्दु । जीवशिवभेदच्छेदकु ॥ ४९ ॥ सावधानपणें श्रोता । तल्लीन होऊनि तत्वतां । हे इतिहासाची कथा । सादरता जो परिसे ॥ ५५० ॥ तेणें सकळ पुण्यांचिया राशी । श्रवणें जोडिल्या अहर्निशीं । तो गा पुरुष अवश्यतेसी । ब्रह्मप्राप्तीसी सत्पात्र ॥ ५१ ॥ सार्थक एक एक पद । परिसतां होय अंतर शुद्ध । यालागीं पावे ब्रह्मपद । परमानंद निजबोधें ॥ ५२ ॥ हे पंचाध्यायी म्हणणें घडे । पंचवक्त्र चंद्रचूडें । एकादशाचें ज्ञान गाढें । वर्णावया फुडें ध्वज उभविला ॥ ५३ ॥ हे पंचाध्यायी नव्हे जाण । एकादशाचे पंचप्राण । उपदेशावया शुद्ध ज्ञान । सामोरे आपण स्वभक्तां आले ॥ ५४ ॥ हे पंचाध्यायी नव्हे केवळ । पंचम आलापे शुककोकिळ । एकादश वसंतमूळ । भक्त अलिकुळ आलापवी स्वयें ॥ ५५ ॥ हाही नव्हे प्रकार । हे शर्करा पंचधार । चाखों धाडिलीं सत्वर । ज्ञानगंभीर निजभक्तां ॥५६॥ हे पंचाध्यायी नव्हे सिद्ध । एकादशाचे पंच गंध । भक्त आंवतावया शुद्ध । धाडिली प्रसिद्ध गंधाक्षता ॥५७॥ एकादश अतिविवेकी । यावया पंचाध्यायी पालखी ।

निमिराजा व जयंतीपुत्र मुनिवर्य यांच्या संवादाचा हा पुरातन इतिहास नारद हर्षानें वसुदेवास सांगता झाला. ४४ शुकाचार्य म्हणाले–हे परिक्षिती राजा, हें नारदाचें वचन ऐकून देवकी व वसुदेव मनांत अत्यंत विस्मित झालीं. ४५ 'कृष्ण परमात्माच अवतरला आहे' या नारदाच्या शब्दांनीं त्या दोघांना फार चकित केलें. ४६ तीं दोघेंहि फार भाग्यवान् होतीं. श्रीकृष्णावर त्यांचा जो पुत्रस्नेह होता, तो त्यांनीं सोडून दिला व त्याचक्षणीं तीं त्याच्याकडे परब्रह्माच्या दृष्टीनें पाहूं लागलीं. ४७ श्रीकृष्णाचें ठिकाणीं ब्रह्मभावना दृढ केली असतां अंतःकरणांतील मोहरूपी स्नेह निःशेष निघून जातो, हें मोठें आश्चर्यकारक भाग्य आहे. ५४८.

यः समाहितः–जो शांतचित्त होऊन, **इमं पुण्यं इतिहासं धारयेत्**–हा पवित्र इतिहास मनांत धारण करील, **सः इह शमलं विधूय**–तो याच देहांत मोहाचें निरसन करून, **ब्रह्मभूयाय कल्पते**–ब्रह्म होण्यास समर्थ होतो. ५२. (५)

हा निमि-जायंतांचा संवाद नारदानें वसुदेवाला सांगितला. जीव-शिवांच्या भेदाचा छेद करणारा हा अति शुद्ध इतिहास ४९ जो श्रोता तल्लीन होऊन सावधान चित्तानें ऐकतो, ५५० तो त्या श्रवणानें रात्रंदिवस पुण्याच्या राशी जोडतो व ब्रह्मपदाला अवश्य प्राप्त होतो. ५१ यांतील अर्थपूर्ण असा एकेक शब्द जरी ऐकिला तरी चित्तशुद्धि होते व त्यामुळें श्रोता परमानंदरूप ब्रह्मपदाला प्राप्त होतो. ५२ हे पांच अध्याय म्हणजे शंकराचीं पांच मुखेंच आहेत. एकादशस्कंधांतील गूढ ज्ञानाचें वर्णन करण्यासाठीं ही पताकाच उभारिली आहे. ५३ ही पंचाध्यायी नव्हे तर जणूंकाय एकादशस्कंधाचे पंचप्रमाणच शुद्ध ज्ञानाचा उपदेशच करण्यासाठीं भक्तांना सामोरे आले आहेत. ५४ ही केवळ पंचाध्यायी नव्हे तर शुकाचार्यरूपी कोकिळ असून ती पंचमसुराच्या आलापानें एकादशस्कंधरूपी वसंतऋतूंत भक्तरूपीभ्रमरांकडून आपोआप आलाप करवीत आहे. ५५ हाहि दृष्टान्त योग्य नाहीं. ज्ञानगंभीर भक्तांना चाखण्यासाठीं ही पंचधारायुक्त साखरच पाठविली आहे. ५६ हा पांचवा अध्याय नव्हे तर एकादशस्कंधांतील पांच प्रकारचें चंदन उगाळून भक्तांना निमंत्रण करण्यासाठीं जणूंकाय गंधाक्षताच धाडली आहे. ५७ किंवा भक्तांविषयीं अत्यंत कृपाळु

पुढें धाडिली कवतुकीं । निजभक्तविखीं कृपाळुवें ॥ ५८ ॥ हे कृष्णउद्धवधर्ममात्रा । अर्धोदयो महायात्रा । ते यात्रेलागीं हांकारा । पंचाध्यायी खरा साधकां करी ॥ ५९ ॥ श्रीकृष्णउद्धवमेळा । देखोनि ब्रह्मसुखाचा सोहळा । तो सांगों आली कळवळा । भक्तांजवळां पंचाध्यायी ॥ ५६० ॥ अहंकाराचें मेट होतें । तें उठवूनि श्रीकृष्णनाथें । केलें आत्मतीर्थें मुक्त । अभयहस्तें उद्धवासी ॥ ६१ ॥ ते मुक्ततीर्थनवाई । पुढें सांगों आली पंचाध्यायी । संसारश्रान्त जे जे कांहीं । ते धांवा लवलाहीं विश्रांतीसी ॥ ६२ ॥ कृष्णउद्धवगोडगोष्टी । हे निर्विकल्प कपिलाषष्ठी । ते पर्वकाळकसवटी । सांगों उठाउठीं पंचाध्यायी आली ॥ ६३ ॥ उद्धवालागीं भवसागरीं । उतरावया पायउतारीं । भागवतमिषें श्रीहरी । सुगम सोपारी पायवाट केली ॥ ६४ ॥ पव्हणियाहूनि पायउतारा । भागवतधर्म अतिसोपारा । तो मार्गु दावावया पुरा । हांकारी स्त्रीशूद्रां पंचाध्यायी ॥ ६५ ॥ पुढील निरूपणआवडी । अतिशयें वाढे चढोवढी । ते कृष्णवाक्यरसगोडी । पंचाध्यायी फुडी साधावया सांगे ॥ ६६ ॥ कृष्णउद्धवसंवादीं । होईल परब्रह्मगवादी । साधकमुमुक्षूंची मांदी । धांवे त्रिशुद्धी निजसुखार्थ ॥ ६७ ॥ परब्रह्म झालें सावेव । स्वरूपसुंदर ज्ञानगौरव । मनोहर रूपवैभव । स्वर्गींचे देव पाहों येती ॥ ६८ ॥ तो देवांचा स्तुतिवादु । सवेंचि उद्धवाचा निर्वेदु । कृष्णउद्धवमहाबोधु । जेणें परमानंदु बोसंडे ॥ ६९ ॥ ते पुढील अध्यायीं कथा । रसाळ सांगेन आतां । अवधान द्यावें श्रोतां । ग्रंथार्था निजबोधें ॥ ५७० ॥ स्वयें वावडी करूनि पूर्ण । तिसी उडविजे जेवीं आपण । मग उडालेपणें जाण । आपल्या आपण संतोषिजे ॥ ७१ ॥ तेवीं मजनावें कविता । करूनि स्वयें सद्गुरु वक्ता । एवं वदवूनियां ग्रंथार्था । श्रोतेरूपें सर्वथा संतोषे स्वयें ॥ ७२ ॥ तो एकपणेंवीण एकला एका । दुजेनवीण जनार्दनु सखा । तेणें पुढील ग्रंथआवांका । विशदार्थें देखा विवंचिला ॥ ७३ ॥

अशा प्रभूनें अति विवेकी भक्तांना आणण्यासाठीं ही पालखीच पाठविली आहे. ५८ ही श्रीकृष्ण-उद्धवरूपधर्ममात्रा आहे. अर्धोदय पूर्वींची महायात्रा आहे. त्या यात्रेसाठीं ही पंचाध्यायी साधकांकडून घोष करवीत आहे. ५९ श्रीकृष्ण-उद्धव यांच्या मेळ्यांतील ब्रह्मसुखाचा सोहळा पाहून ही पंचाध्यायी मोठ्या कळवळ्यानें भक्तांना सांगावयास त्यांच्यापाशीं आली आहे. ५६० श्रीकृष्णानें अहंकाराचें नाकें उठविलें व उद्धवाला अभयहस्तानें आत्मतीर्थाच्या योगानें मुक्त केलें. ६१ त्या मुक्ततीर्थाची नवलवार्ता सांगण्यासाठीं हा पांचवा अध्याय पुढें आला व जे जे संसारानें श्रांत झाले असतील त्या सर्वांनीं येथें विश्रांति घेण्यासाठीं लवकर धांवून यावें, असें तो सांगत आहे. ६२ उद्धव-श्रीकृष्णांच्या गोड गोष्टी म्हणजे जणूंकाय कपिलाषष्ठीचाच योग, ती पर्वकाळाची बातमी देण्यासाठींच ही पंचाध्यायी लगबगीनें प्रवृत्त झाली आहे. ६३ उद्धवाला हा भवसागर तरून जाण्यासाठीं श्रीहरीनें भागवताच्या रूपानें ही सुगम व सोपी पायवाटच केली. ६४ पोहून जाण्यापेक्षां ही भागवतधर्माची पायवाट अधिक सोपी, म्हणून तो मार्ग दाखविण्यासाठीं हा पांचवा अध्याय स्त्री-शूद्रांना मोठमोठ्यानें हांका मारीत आहे. ६५ याच्यापुढील निरूपण उत्तरोत्तर अधिक चित्ताकर्षक आहे. कृष्णवाक्यांच्या रसाची गोडी चाखावयास ही पंचाध्यायी सांगत आहे. ६६ कृष्ण-उद्धवांच्या संवादांत परब्रह्माचें अन्नछत्रच उघडेल. तेथें स्वतःच्या सुखासाठीं साधकमुमुक्षूंच्या झुंडी धांवतील. ६७ परब्रह्म सावयवरूपानें अवतरलें आहे- तें त्याचें सुंदर स्वरूप, त्याच्या ज्ञानाचें गौरव व मनोहर रूपवैभव पहावयास स्वर्गांतील देव येतात. ६८ देवांचा तो स्तुतिवाद, लगेच उद्धवाचें वैराग्य व श्रीकृष्णानें उद्धवाला केलेला महाबोध, त्यांच्यायोगानें परमानंदाला भरती येते. ६९ तीच रसाळ कथा मी पुढल्या अध्यायांत सांगेन. तरी श्रोत्यांनीं आपल्याला बोध होण्यासाठीं अर्थाकडे लक्ष ठेवावें. ५७० आपण पतंग तयार करावा, तो आपणच उडवावा आणि तो उंच उडाला म्हणजे आपणच संतोष मानावा, ७१ त्याप्रमाणें स्वतः सद्गुरु वक्ता माझ्या नांवानें हें काव्य रचून, त्यायोगें हा ग्रंथार्थ वदवून, श्रोत्यांच्या रूपानें स्वतःच सर्वथा संतुष्ट होतो. ७२ जो एकच एक अद्वितीय जनार्दन सखा त्यानेंच पुढील ग्रंथ विशद अर्थानें माझ्याकडून रचविला आहे. ७३

नातळोनि दुजेपण । एका जनार्दना शरण । धरोनि श्रोत्यांचे चरण । पुढील अनुसंधान पावेल ॥ ७४ ॥ एकाजनार्दन नांवें देख । दों नांवीं स्वरूप एक । हें जाणे तो आवश्यक । परमसुख स्वयें पावे ॥ ७५ ॥ एकाजनार्दना शरण । त्याची कृपा परिपूर्ण । पंचाध्यायी निरूपण । झाली संपूर्ण जनार्दनकृपा ॥५७६॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे वसुदेवनारदसंवादे एकाकारटीकायां पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥

अध्याय सहावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ओं नमो श्रीजनार्दन । भावार्थें नमितां चरण । जनांसहित मीपण । नाहींच जाण स्वयें केलें ॥ १ ॥ लिंगदेहाचें मर्दन । तेंचि जनाचें अर्दन । यालागीं नामें जनार्दन । प्रगट जाण प्रसिद्धी ॥ २ ॥ तुझी ऐशीच करणी । कर्म कर्ता नुरवूनी । सुखें नांदविसी जनीं । समाधानीं जनार्दना ॥ ३ ॥ सुखेंचि तुझें नाम घेतां । घातु करिसी जीविता । जीऊ घेऊनि तत्त्वतां । होसी सर्वथा कृपाळु ॥ ४ ॥ तुझे नामाचें प्रबळ बळ । माथा नुधविती कळिकाळ । चारी मुक्ति केवळ । होती निश्चळ निजदासी । ॥ ५ ॥ नामें एवढें ढसाळ देणें । त्या तुझें स्वरूप कवण जाणे । सांडूनि जाणणें नेणणें । निवांत राहणें तत्त्वतां ॥ ६ ॥ तुझा स्तुतिवादु करणें । तंव परतलीं श्रुति-पुराणें । तेथ माझें आरिख बोलणें । कोठें कोणें सारावें ॥ ७ ॥ तुझा स्तुतिवादु तें मौन । तुझा कळवळा तें कीर्तन । कांहीं न

द्वैतभावाला स्पर्शहि न करितां एकनाथ जनार्दनस्वामींना शरण जाऊन, श्रोत्यांचें चरण धरून, पुढील कथानक सांगेल. ७४ एकनाथ व जनार्दन हीं नांवें दोन, पण दोघांचें स्वरूप एकच आहे, असें जो जाणतो तो परम-सुखाला प्राप्त होतो. ७६ एकनाथानें जनार्दन स्वामींना शरण जाऊन त्यांच्याच पूर्णकृपेनें या पंचाध्यायीचें निरूपण संपविलें, ही त्यांचीच कृपा होय. ५७६. (५)

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित
टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह निमिजायंतसंवादांतील
वसुदेव-नारदसंवादनांवाचा पांचवा अध्याय समाप्त झाला.

हे जनार्दनस्वामी ! तुला नमस्कार असो. भक्तिभावानें तुझ्या चरणांना वंदन करतांच जनांसह ‘ मीपणा ’ आपोआप नाहींसा होतो. १ सूक्ष्म देहाचा नाश म्हणजेच जनांचा नाश होय. म्हणून तूं ‘ जनार्दन ’ या नांवानें प्रसिद्ध झालास. २ हे जनार्दना ! तुझी करणी अशीच आहे. कर्म व कर्ता यांना न उरवितां तूं जनांमध्यें सुखानें नांदत आहेस. ३ प्रेमानें तुझें नांव घेतांच तूं ‘ जीवपणाच ’ नाहींसा करितोस. जीवाचें हरण करून मग खरोखर कृपा करितोस. ४ तुझ्या नांवाचें सामर्थ्य मोठें दांडगें आहे. त्यामुळें कळिकाळहि डोकें वर काढीत नाहीं. चारी मुक्ति केवळ दासी होऊन मुकाट्यानें रहातात. ५ तुझ्या नांवाचा प्रभाव जर एवढा मोठा आहे, तर तुझें स्वरूप कोण जाणूं शकणार ? तेव्हां जाणणें व न जाणणें हीं दोन्हीं सोडून स्वस्थ बसावें, हें बरें. ६ तुझी स्तुति गाण्यांत श्रुति व पुराणेंहि थकलीं, तेथें माझें बोबडें बोलणें कोणाला व कसें रुचणार ! यास्तव हे श्रीकृष्णा ! गप्प बसणें हेंच तुझें